उद्धवें चित्तीं दृढ धरिलें ॥ ९८ ॥ ते भजनक्रियेचा प्रश्न । पुढिले अध्यायीं जाण । उद्धव पुसेल आपण । जेणें श्रीकृष्ण संतोषे ॥ ९९ ॥ उद्धव पुसेल गोड गोठी । जेणें श्रीकृष्ण सुखावे पोटीं । तेणें स्वानंदें निजपुष्टी । भजनहातवटी सांगेल ॥ ५०० ॥ उपासनाकांडरहस्य पूर्ण । मुख्य क्रियायोगनिरूपण । समूळ आगमलक्षण । स्वमुखें श्रीकृष्ण सांगेल ॥ १ ॥ ते कथेसी अवधान । श्रोतां द्यावें सावधान । एका तुष्टला जनार्दन । स्वानंदघन निजबोधें ॥ ५०२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीका ऐलगीतोपाख्यानं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे ऐलगीतं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

अध्याय सत्ताविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐ नमो देव सहज निज । तूं चतुर्भुज अष्टभुज । तूं विश्वात्मा विश्वभुज । गुरुत्वें तुज गौरव ॥ १ ॥ निजशिष्याचिया भावार्था । तूं गुरुनामें अभयदाता । अभय देऊनि तत्त्वतां । भवभयव्यथा निवारिसी ॥ २ ॥ निवारूनि निजजन्ममरण । आपण्या भेटसी आपण । तेव्हां गुरुशिष्यनामीं संपूर्ण । तुझें एकपण आभासे ॥ ३ ॥ तें एकपण पाहतां दिठीं । एका जनार्दनीं पडे मिठी । गुरुत्वें कोंदे सकळ सृष्टी । स्वानंदपुष्टीं जग नांदे ॥ ४ ॥ तो स्वानंदैकचिद्घन । जगद्गुरु जनार्दन । एका जनार्दना शरण । एकीं एकपण दृढ केलें ॥ ५ ॥ दृढ केलें जें एकपण । तेंही सद्गुरु

वचन उद्धवानें नीट लक्षांत ठेविलें. ९८ त्या भजनविधीचा प्रश्न उद्धव पुढील अध्यायांत विचारणार आहे. त्यामुळें कृष्णाला अत्यंत संतोष होईल. ८९ ज्यायोगें श्रीकृष्णाला आनंद होईल, असा गोड प्रश्न उद्धवानें विचारिला असतां तो त्या संतोषाच्या भरांत भजनाचा मार्ग सांगेल. ५०० उपासनाकांडाचें पूर्ण रहस्य, असें कर्ममार्गाचें मुख्य निरूपण व वेदाचें सर्व लक्षण आपल्या मुखानें सांगेल. १ त्या कथेकडे आतां श्रोत्यांनीं लक्ष द्यावें. स्वानंदघन एकनाथ-जनार्दन आत्मबोधानें संतुष्ट झाला आहे. ५०२.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील ऐलगीत नांवाचा सव्विसावा अध्याय समाप्त झाला.

हे सहज निजदेवा ! तुला नमस्कार असो. तूं चतुर्भुज, अष्टभुज आहेस. तूं विश्वात्मा विश्वभुज आहेस. तुझा गुरुत्वानेंच गौरव करितों. १ आपल्या शिष्यावरील भक्तिप्रेमासाठीं गुरूच्या नांवानें अभय देऊन भवभयाची व्यथा तूंच निवारितोस. २ जन्म-मरणांचें निवारण करून तूं स्वतःच स्वतःला भेटतोस. तेव्हां गुरु व शिष्य या नांवांनीं तुझें पूर्णपणें ऐक्य दिसतें. ३ तें ऐक्य दृष्टीस पडतांच एकनाथ व जनार्दन हें एकरूप होतात. ही सगळी सृष्टि गुरुत्वानें भरून जाते व सगळें जगत् स्वानंदांत नांदूं लागतें. ४ असा तो स्वानंदैकचिद्घन जगद्गुरु जनार्दन आहे. त्या जनार्दनाला एकनाथ शरण आहे. त्यानें एकामध्येंच एकपण दृढ केलें. ५ व तें दृढ केलेलें एकपणहि

झाला पूर्ण । तेथें खुंटलें मीतूंपण । एका जनार्दन एकत्वें ।। ६ ।। यापरी एकाकी एकला । एका जनार्दनें कवयिता केला । तो एकादशाचा पावला । सहजलीला एकत्वबोध ।। ७ ।। त्या एकत्वाची निजस्थिती । पावला पुरूरवा भूपती । दृढ अनुतापविरक्ती । भगवद्भक्ती सत्संगें ।। ८ ।। हें सव्विसावे अध्यायीं जाण । स्वमुखें बोलिला श्रीकृष्ण । सत्संगें भगवद्भजन । तेणें वैराग्य पूर्ण साधकां ।। ९ ।। न करितां भगवद्भक्ती । कदा नुपजे विरक्ती । विरक्तीवीण भगवत्प्राप्ती । नव्हे कल्पांतीं साधकां ।। १० ।। ऐसें बोलिला श्रीकृष्ण । तें उद्धवें जीवीं धरून । भगवद्भक्ति पूजाविधान । क्रियायोग जाण पुसत ।। ११ ।।

उ०उ०–क्रियायोगं समाचक्ष्व भवदाराधनं प्रभो । यस्मात्त्वां ये यथाऽर्चन्ति सात्वताः सात्वतर्षभ ।। १ ।।

निजभक्तअनुग्रहार्थ । सत्वमूर्ति तूं श्रीअनंत । तुझे निजभक्त जे सात्वत । ते तुज पूजित कोणे विधीं ।। १२ ।। तें साधूचें आराधन । तुझें क्रियायोग निजपूजन । कृपा करोनियां आपण । मज संपूर्ण सांगावें ।। १३ ।। म्हणसी आणिकांतें पुसावें । हें माझेनि सर्वथा नव्हे । तुज सांडूनि दूरी जावें । हे मजसी जीवें साहवेना ।। १४ ।। मी तुझा दास जीवेंभावें । तुझेनि प्रभुत्वगौरवें । मी कलिकाळा नागवें । कृपाप्रभवें तुझेनि ।। १५ ।। तूं कृपाळु कृपायुक्त । कृपेनें होसी भक्तांचा भक्त । त्या तुझा मी चरणांकित । सलगीं गुह्यार्थ स्वयें पुसें ।। १६ ।। इतुका करूनि अत्यादर । कां पुससी पूजाप्रकार । हा श्रेष्ठश्रेष्ठीं केला विचार । तो निजनिर्धार अवधारीं ।। १७ ।।

सद्गुरु स्वतःच झाला. तेथें एकनाथजनार्दनांच्या ऐक्यानें मीतूंपणा खुंटला. ६ त्याप्रमाणें जनार्दनानें एकरूप असलेल्या एकनाथाला कवि केलें. तेव्हां त्याला सहजच एकत्वाचें ज्ञान झालें. ७ त्या एकत्वाची स्थिति पुरूरवाराजालाहि प्राप्त झाली होती. त्याची विरक्ति, पश्चात्ताप व भगवद्भक्ति सत्संगानें दृढ झाली. ८ याचें वर्णन श्रीकृष्णानें साव्विसाव्या अध्यायांत स्वतः केलें आहे. सत्संगानें भगवद्भजन घडतें व त्यानें साधकाला पूर्ण वैराग्य येतें. ९ भगवद्भक्ति केल्यावांचून विरक्ति कदापि उपजत नाहीं आणि विरक्तीवांचून साधकाला भगवत्प्राप्ति कल्पांतींहि होणें शक्य नाहीं. १० असें जें श्रीकृष्ण बोलला तें उद्धवानें ध्यानांत ठेवून त्यानें भगवद्भक्तीचें पूजाविधान व कर्मयोग त्याला विचारिला. ११.

[या सत्ताविसाव्या अध्यायांत चित्ताला तत्काल प्रसन्न करणारा व सर्वकामप्राप्तीचा हेतु असा सांग क्रियायोग संक्षेपतः सांगितला आहे. ज्यांचें चित्त रागादिकांनी कालुषित झालेलें असतें त्यांना सत्संगादिकांची प्राप्ति कोठून होणार ! यास्तव त्यांच्यासाठीं 'श्रीकृष्णाचें पूजनच श्रेष्ठ आहे' हा मागील उपदेश आठवून उद्धव प्रश्न करीत आहे.]

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला–प्रभो–हे स्वामिन्, भवदाराधनं क्रियायोगं समाचक्ष्व–भव त्वदाराधनरूप क्रियायोग मला सांग. सात्वतर्षभ–हे यादव श्रेष्ठा ! ये सात्वताः (ते) यस्मात् त्वां अर्चन्ति–जे अधिकारी भक्त असतात ते कोणत्या कारणानें व कोणत्या प्रकारें तुझी पूजा करितात ! १.

आपल्या भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीं सत्त्वमूर्ति झालेला जो तूं श्रीअनंत, त्या तुझी पूजा तुझे भक्त कोणत्याप्रकारें करितात. ! १२ साधूंची आराधना व तुझें कर्मयोगानें पूजन, कोणत्या प्रकारानें करितात, हें कृपा करून मला सविस्तर सांग. १३ तूं म्हणशील कीं, दुसऱ्या कोणाला विचार, तर तें माझ्या हातून सर्वथा घडणार नाहीं. तुला सोडून दूर जावें हें माझ्या जीवाला सहन होत नाहीं. १४ मी तुझा जीवा-भावानें दास आहें. तुझ्या कृपाबलावर मी कलिकालालाहि नागवितों. हा तुझ्याच कृपेचा प्रभाव आहे. १५ तूं कृपाळू कृपायुक्त आहेस. कृपेनें तूं भक्तांचाहि भक्त होतोस. मी तुझा चरणांकित आहें. मी मित्रभावानें तुला स्वतः गुह्यार्थ विचारीत आहें. १६ पण इतका अत्यादर करून पूजेचा प्रकार कां विचारितोस ! श्रेष्ठ श्रेष्ठ लोकांनीं जो विचार केला आहे, तो ऐक. १७.

एतद्वदन्ति मुनयो मुहुर्निःश्रेयसं नृणाम् । नारदो भगवान् व्यास आचार्योऽङ्गिरसः सुतः ॥ २ ॥

पूर्वी वेदविचारनिष्ठ । सुरवर मुनिश्रेष्ठ । हेंचि अनुवादले स्पष्ट । अतिवरिष्ठ विवेकी ॥ १८ ॥ पूजाविधान प्रसिद्ध । बोलिला देवर्षि नारद । अंगिराचा पुत्र अगाध । देवगुरु प्रबुद्ध हेंचि बोले ॥ १९ ॥ जो व्यास सत्यवतीसुत । जो कां नारायण मूर्तिमंत । जेणें प्रकट केला वेदार्थ । जो विख्यात महाकवी ॥ २० ॥ पुराणकर्ता तो साङ्ग । यालागीं 'व्यासोच्छिष्टमिदं जग' । तेणेंही भगवत्पूजामार्ग । हा क्रियायोग बोलिजे ॥ २१ ॥ असो इतरांची चावटी । जो पितामह सकळ सृष्टी । जो जन्मला विष्णूच्या पोटीं । तेणेंही या गोष्टी दृढ केल्या ॥ २२ ॥

निःसृतं ते मुखाम्भोजाद्यदाह भगवानजः । पुत्रेभ्यो भृगुमुख्येभ्यो देव्यै च भगवान् भवः ॥ ३ ॥

तुवांचि कल्पाचिया आदीं । हेचि पूजाविधानविधीं । उपदेशिला पुत्रबुद्धीं । स्वयें त्रिशुद्धीं विधाता ॥ २३ ॥ तेणेंही कल्पादीसीं आपण । नाभिकमळासनीं बैसोन । भृगुकश्यपादि पुत्रांसी जाण । हें पूजाविधान उपदेशी ॥ २४ ॥ श्रीमहादेवेंही आपण । हें क्रियायोगविधिविधान । भावें भवानीसी जाण । केलें निरूपण एकांतीं ॥ २५ ॥

एतद्वै सर्ववर्णानामाश्रमाणां च संमतम् । श्रेयसामुत्तमं मन्ये स्त्रीशूद्राणां च मानद ॥ ४ ॥

एवं श्रेष्ठपरंपरा । तुवां प्रकट केली दीनोद्धारा । दीनदयाळु तूं खरा । याही विचारा अवधारीं ॥ २६ ॥ आश्रमधर्मविधिविधान । तेथ अधिकारी द्विजन्मे जन । त्यांसी कर्मबाधा बाधी गहन ।

पुढील चार श्लोकांनीं कर्मयोगाविषयीं पुनः विशेषतः प्रश्न करण्याचें कारण सांगतो—

मुनयः नृणां एतत् निःश्रेयसं वदन्ति—मुनि मनुष्यांना हें तुझें अर्चनच निःश्रेयस्कर आहे असें वारंवार सांगतात. **भगवान् नारदः आचार्यः व्यासः अङ्गिरसः सुतः च**—भगवान् आचार्य व्यास व अंगिरसाचा पुत्र बृहस्पति हेंच सांगतात.

प्राचीन वेदविचारनिपुण, अतिशय वरिष्ठ व विवेकी श्रेष्ठ देव व मुनि यांनीं हेंच स्पष्ट सांगितलें आहे. १८ देवर्षि नारदानें पूजाविधान सांगितलेलें प्रसिद्धच आहे. अंगिरसाचा पुत्र अगाध ज्ञानी जो देवगुरु त्यानेंहि हेंच सांगितलें आहे. १९ वेदार्थ प्रकट करणारा, सत्यवतीचा पुत्र, मूर्तिमंत नारायणच असा जो प्रसिद्ध महाकवि व्यास, २० ज्यानें साङ्ग पुराणें केल्यामुळें 'व्यासोच्छिष्टमिदं जगत्' म्ह० हें जगत् व्यासोच्छिष्ट आहे, (जगांत असें कोणतेंहि शास्त्र नाहीं कीं ज्याचा व्यासांच्या ग्रंथांत अंतर्भाव होत नाहीं.) असें म्हणतात. त्यानेंहि भगवानाच्या पूजेचा मार्ग असा हा कर्मयोग सांगितला आहे. असो; २१ इतरांची बडबड कशाला पाहिजे! जो सगळ्या सृष्टीचा पितामह, जो श्रीविष्णूचें अपत्य त्या ब्रह्मदेवानेंहि हीच गोष्ट दृढ केली आहे. २२.

यत् ते मुखाम्भोजात् निःसृतं भगवान् अजः भृगुमुख्येभ्यः पुत्रेभ्यः आह—जें तुझ्या मुखकमलापासून निघालें (म्ह० तूं ज्याचा उपदेश केला होतास) तेंच तुझें अर्चन भगवान् ब्रह्मदेवानें भृगुप्रभृति पुत्रांना सांगितलें. **भगवान् भवः देव्यै च**—व पूज्य शंकरानें पार्वतीला सांगितलें. ३.

कल्पाच्या आरंभीं तूंच स्वतः हाच पूजाविधानविधि ब्रह्मदेवाला पुत्रभावानें उपदेशिला होतास. २३ त्यानेंहि तुझ्या नाभिकमलावर बसून भृगु-कश्यपादि आपल्या पुत्रांस याच पूजाविधानाचा उपदेश केला. २४ त्याचप्रमाणें श्रीशंकरानें हाच कर्मयोगविधीचा प्रकार स्वतः एकान्तांत पार्वतीला सांगितला. २५.

मानद—हे मान देणाऱ्या ईश्वरा! **एतत् वै सर्ववर्णानां आश्रमाणां च स्त्रीशूद्राणां च श्रेयसां उत्तमं संमतं**—हेंच तुझें अर्चन सर्व त्रैवर्णिकांना व आश्रमांना आणि स्त्री-शूद्रांना श्रेय साधनांतील उत्तम साधन म्हणून संमत आहे. ४.

याप्रमाणें दीजनांचा उद्धार करण्यासाठीं तूं ही श्रेष्ठांची परंपरा सुरू केलीस. तूं खरोखर दीनदयाळ आहेस. याचाहि विचार ऐक. २६ आश्रमधर्मांच्या विधींचें जें विधान आहे, त्याचे अधिकारी ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य आहेत. त्यांच्या

गुंतले ब्राह्मण कर्मठत्वें ॥ २७ ॥ तैसें नव्हे तुझें भजन । भजनाधिकारी सर्व वर्ण । दीनोद्धारी भजन पूर्ण । स्त्रिया शूद्रजन उद्धरिले ॥ २८ ॥ कर्मीं गुंतले उत्तमोत्तम । भजनें उद्धरिले अधमाधम । भजनें सर्वांसही सुगम । भजनें स्वधर्म सार्थक ॥ २९ ॥ भजनमहिमा निःसीम । अधमा पदवी उत्तमोत्तम । भजनहीन जे उत्तमोत्तम । ते अधमाधम स्वयें होती ॥ ३० ॥ सर्व वर्ण आणि आश्रम । भगवद्भजनें गति उत्तम । हें भक्तीचें निजवर्म । भक्त निष्काम जाणती ॥ ३१ ॥ करूनियां भगवद्भक्ती । स्वयें भगवद्रूप होती । यालागीं भक्तांतें श्रीपती । अतिप्रीतीं मानितू ॥ ३२ ॥ तुझें भजनपूजन करितां । तूं निजभक्तांसी होसी त्राता । तूंचि भक्तांसी होसी सन्मानदाता । तें पूजनकथा मज सांग ॥ ३३ ॥

एतत्कमलपत्राक्ष कर्मबन्धविमोचनम् । भक्ताय चानुरक्ताय ब्रूहि विश्वेश्वरेश्वर ॥ ५ ॥

कमळनाभि नारायणा । भक्तविश्राम कमळवदना । कमलालया कमलनयना । विनंती श्रीकृष्णा अवधारीं ॥ ३४ ॥ तुवां पाहिल्या कृपादृष्टीं । तत्काळ पैं उठाउठी । सुटती कर्मबंधाच्या गांठी । स्वानन्द-पुष्टी निजभक्तां ॥ ३५ ॥ जेवीं घृताचें कठिणपण । क्षणें विरवी सूर्यकिरण । तेवीं कर्मबंधा निर्दळण । तुझें कृपावलोकन करी कृष्णा ॥ ३६ ॥ कां सैंधवाचा महागिरी । जेवीं विरे सिंधूमाझारीं । तेवीं कर्म-बंधा बोहरी । तुझी कृपा करी श्रीकृष्णा ॥ ३७ ॥ तुझी झालिया कृपादृष्टी । कर्माकर्मांसी पडे तुटी । जेवीं सूर्योदयापाठीं । नातुडे भेटी खद्योत ॥ ३८ ॥ तमीं दाटती खद्योतकोडी । तेवीं अज्ञानीं कर्मांची आवडी । तुझी कृपासूर्य जोडल्या जोडी । जाती बापुडीं विसरोनी ॥ ३९ ॥ ऐशिया निष्कर्मकृपायुक्त । तुझे नांदती निजभक्त । जे कां विषयीं अतिविरक्त । सदा अनुरक्त हरिचरणीं ॥ ४० ॥ तें पूर्णकृपेचें आयतन । तुझें

कर्माचरणांत चूक झाल्यास अतिशय दोष लागतो. त्यामुळें ब्राह्मण कर्मठपणांत गुंतून गेले. २७ परंतु तुझें भजन तसें नाहीं. सगळ्या वर्णांना तुझ्या भजनाचा अधिकार आहे. भजन दीनांचा पूर्ण उद्धार करितें. त्यानें स्त्री-शूद्रादिकांनाहि उद्धरिलें आहे. २८ उत्तमोत्तम लोक कर्मांत गुंतले आहेत; पण भजनानें अधमाधम लोकांचा उद्धार केला आहे. भजन सर्वांना सुलभ असून तें स्वधर्माचें साधन आहे. २९ निःसीम भजनाचा महिमा इतका आहे कीं, अधमहि उत्तमोत्तम पदाला जातात आणि जे उत्तमोत्तम लोक भजनहीन असतात ते स्वतःच अधमाधम पदाला प्राप्त होतात. ३० सगळे वर्ण आणि आश्रम यांना भगवद्भजनानें उत्तम गति मिळते. हें भक्तीचें गूढ वर्म निष्काम भक्तच काय ते जाणतात. ३१ ते भगवद्भक्ति करून स्वतःच भगवद्रूप होतात. यास्तव श्रीहरि भक्तांना अतिशय प्रिय मानितो. ३२ तुझें भजन-पूजन केलें असतां तूं आपल्या भक्तांचें रक्षण करितोस. आपल्या भक्तांना सन्मान देणाराहि तूंच आहेस. त्या तुझ्या पूजनाचा प्रकार मला सांग. ३३.

कमलपात्राक्ष—हे कमलनयना ! विश्वेश्वरेश्वर—हे सर्व ईश्वरांच्याहि ईश्वरा ! एतत् कर्मबन्धविमोचनं भक्ताय अनुरक्ताय च ब्रूहि—हे कर्मबन्धापासून सोडविणारें तुझें पूजन तुझा भक्त व तुजवर अनुरक्त असलेल्या मला सांग. ५.

हे कमलनाभा नारायणा ! भक्तविसाव्या कमलवदना ! कमलनिवासा ! कमलनयना ! हे श्रीकृष्णा ! माझी विनंति ऐक. ३४ तूं आपल्या कृपादृष्टीनें अवलोकन केलेंस कीं, कर्म-बंधनाच्या गांठी तत्काल तुटतात व तुझे भक्त स्वानंदानें पुष्ट होतात. ३५ तुपाचा घट्टपणा सूर्यकिरण जसे एका क्षणांत विरळवितात, त्याप्रमाणें हे कृष्णा ! तुझी कृपादृष्टि कर्मबंधाचें निरसन करिते. ३६ किंवा मिठाचा मोठा पर्वत जसा समुद्रामध्यें विरून जातो, त्याप्रमाणें हे श्रीकृष्णा ! ३७ तुझी कृपा कर्मबंधाचा नाश करिते. सूर्योदय झाला असतां काजव्याची जशी भेटहि होत नाहीं, ३८ त्याप्रमाणें तुझ्या कृपादृष्टीनें कर्म-अकर्मांचें निरसन होतें. अंधारांत कोट्यवधि काजवे चमकतात, त्याप्रमाणें अज्ञ लोकांना कर्मांची आवड असते. तुझा कृपासूर्य उगवला असतां ते बिचारे सगळीं कर्में विसरून जातात. ३९ अशा निष्कर्मकृपेनें युक्त असलेले तुझे जे भक्त असतात, ते विषयांविषयीं अतिशय विरक्त असतात व हरिचरणांवर अत्यंत आसक्त होतात. ४० यास्तव तुझ्या पूर्णकृपेचें स्थानच असें तें तुझें भजनपूजाविधान मला

भजनपूजाविधान । तें मज सांग कृपा करून । मी अतिदीन पैं तुझें ॥ ४१ ॥ म्हणसी तुज अधिकार नाहीं । परी मी शरण तुझ्या पायीं । शरणागताची तुझ्या ठायीं । उपेक्षा नाहीं श्रीकृष्णा ॥ ४२ ॥ तुवां उद्धरिलें पशुगीधगजांसी । गणिके तारिलें कुंटणीसी । तेचि कृपा करी आम्हांसी । हृषीकेशी कृपाळुवा ॥ ४३ ॥ म्हणसी ब्रह्मा शिव असतां सृष्टीं । मजचि पुसायाचि श्रद्धा मोठी । कैसेनि पां वाढली पोटीं । ऐक ते गोठी सांगेन ॥ ४४ ॥ ब्रह्मा जगाचा कर्ता होये । तोही विसरला निजात्मसोये । तो तुझ्या पोटा येऊनि पाहें । निजज्ञान लाहे तुझेनी ॥ ४५ ॥ शिव पायवणी वाहे माथां । तुझें नाम सदा जपतां । तुझे कृपेस्तव तत्त्वतां । तोही निजात्मता पावला ॥ ४६ ॥ यालागीं तूं ईश्वरांचा ईश्वर । नियंत्या नियंता सर्वेश्वर । विश्वीं विश्व विश्वंभर । विश्वेश्वर तूं कृष्णा ॥ ४७ ॥ यापरी तूं ज्ञाननिधी । पूर्ण बोधाचा उदधी । जेणें होय निजात्मसिद्धी । ते पूजाविधी मज सांग ॥ ४८ ॥ ऐसा भक्तवचनें तो संतोषला । पूर्ण निज-बोधें द्रवला । निजात्मकृपें कळवळला । काय बोलिला श्रीकृष्ण ॥ ४९ ॥

श्रीभ० उ०–नह्यन्तोऽनन्तपारस्य कर्मकाण्डस्य चोद्धव । संक्षिप्तं वर्णयिष्यामि यथावदनुपूर्वशः ॥ ६ ॥

ज्याचें ऐकतां वचन । वेदवाक्या पडे मौन । ज्याची करितां आठवण । मनपणा मन स्वयें मुके ॥ ५० ॥ जो वेदार्थप्रकाशक । जो अर्काचा आदि अर्क । तो उद्धवासी यदुनायक । स्वमुखें देख बोलत ॥ ५१ ॥ आगमनिगमोक्तप्रकार । माझी पूजाविधि सविस्तर । सांगतां अनन्त अपार । न कळे पार ब्रह्मादिकां ॥ ५२ ॥ उद्धवा ऐक पां तत्त्वतां । मी देवादिदेव झालों वक्ता । तरी पूजाविधानकथा ।

कृपा करून सांग. मी तुझा अत्यंत दीन किंकर आहें. ४१ तूं कदाचित् असें म्हणशील कीं, तुला अधिकार नाहीं; तर मी तुझ्या चरणांना शरण आलों आहें आणि हे श्रीकृष्णा ! शरण आलेल्याची तूं कदापि उपेक्षा करीत नाहींस. ४२ तूं सुग्रीव, जटायु, संपाति, गजेंद्र इत्यादि पशु-पक्षी-हत्ती यांचा व पिंगलेसारख्या वेश्येचाहि उद्धार केलास. तरी हे दयालु हृषीकेशी श्रीकृष्णा ! तशीच माझ्यावरहि कृपा कर. ४३ तूं म्हणशील कीं, ब्रह्मदेव-शंकर हे सृष्टीचे नियामक असतां मलाच विचारण्याची तुझ्या मनांत इतकी उत्कंठा कशामुळें उद्भवली ! तर त्याचेंहि कारण सांगतों, तें ऐक. ४४ ब्रह्मदेव एवढा जगाचा कर्ता, पण तोहि आत्मस्वरूप विसरला. त्यानें तुझ्या पोटीं जन्म घेऊन तुझ्याकडून आत्मज्ञान मिळविलें. ४५ तुझ्या चरणाचें तीर्थ जी भागीरथी तिला शंकर मस्तकावर वहातो. तुझ्या नांवाचा निरंतर जप करून तुझ्या कृपेमुळें त्यानें आत्मज्ञान मिळविलें. ४६ यास्तव हे श्रीकृष्णा ! तूं ईश्वरांचा ईश्वर, नियमन करणारांचा नियामक सर्वेश्वर आणि सगळ्या सृष्टींत विश्वाचें पालन करणारा विश्वेश्वरहि तूंच आहेस. ४७ अशा प्रकारचा तूं ज्ञानाचा ठेवा, आत्मज्ञानाचा महासागर आहेस. म्हणून ज्यायोगें आत्मज्ञान प्राप्त होतें, तो तुझा पूजाविधि मला सांग ! ४८ हें भक्ताचें बोलणें ऐकून श्रीकृष्ण संतुष्ट झाला. आत्मज्ञानानें त्याचें अंतःकरण भरून आलें. तो आत्मज्ञानाची कृपा करण्यास उत्सुक झाला व काय बोलला, (ते ऐका.) ४९.

श्रीभ० उ०–भगवान् म्हणाले–उद्धव–हे उद्धवा ! अनंतपारस्य कर्मकाण्डस्य अंतः न हि–ग्रंथतः ज्याचा अंत लागत नाहीं व अनुष्ठानानें ज्याचा सार कळत नाहीं. अशा कर्मकाण्डाचा म्ह० पूजा विधीचा अंत लागत नाहीं. म्हणून यथावत् अनुपूर्वशः संक्षिप्तं वर्णयिष्यामि–मी तो यथाशास्त्र क्रमानें संक्षेपतः सांगेन. ६

ज्याचें वचन ऐकून वेदवाणी मौन धरून बसली, ज्याची आठवण केली असतां मन आपल्या मनोधर्माला मुकलें, ५० जो वेदाचा अर्थ प्रकाशित करणारा, आदिसूर्याचाहि सूर्य, तो श्रीकृष्ण उद्धवाला आपल्या मुखानें सांगूं लागला ५१ वेद-शास्त्रांनीं सांगितलेला माझ्या पूजेचा प्रकार सविस्तर सांगूं लागल्यास तो इतका अनंत व अपार आहे कीं, ब्रह्मादिकांसहि त्याचा अंत लागत नाहीं. ५२ तथापि उद्धवा ! तूं तो थोडक्यांत ऐक. मी जरी देवाधिदेव

समूळ सर्वथा न सांगवे ॥ ५३ ॥ जरी झाले अतिसज्ञान । तरी पूजाविधिविधान । सांगावया समर्थपण । सर्वथा जाण असेना ॥ ५४ ॥ एवं पूर्वोक्तप्रकार । आगमनिगमनिजसार । निवडूनि संक्षेपाकार । तुज मी साचार सांगेन ॥ ५५ ॥ पूजाविधि निजसार । त्रिविध विधान त्रिप्रकार । ऐक त्यांचाही विचार । विधिउपचारविभागें ॥ ५६ ॥

वैदिकस्तांत्रिको मिश्र इति मे त्रिविधो मखः । त्रयाणामीप्सितेनैव विधिना मां समर्चयेत् ॥ ७ ॥

वेदींचे मंत्र वेदींचें अंग । वेदोक्त माझी पूजा साङ्ग । या नांव गा वैदिक मार्ग । आगमप्रयोग तो ऐक ॥ ५७ ॥ आगममंत्र आगमचि अङ्ग । माझी आगमोक्त पूजा साङ्ग । या नांव गा तंत्रमार्ग । मिश्रप्रसंग तो ऐक ॥ ५८ ॥ वेदींचे मंत्र तंत्रींचें अंग । एवं मिश्रित उभय विभाग । माझी पूजा निपजे साङ्ग । मिश्रमार्ग या नांव ॥ ५९ ॥ हे त्रिविधविधि पूजा साङ्ग । तो जाण माझा त्रिविध याग । येणें मी संतोषें श्रीरंग । पार्श्वदेशीं साङ्ग सपरिवार ॥ ६० ॥ ऐसें माझें त्रिविध भजन । जेथ ज्याची श्रद्धा पूर्ण । त्या विधि करितां पूजन । मज तृप्ति समान भावार्थें ॥ ६१ ॥ भावार्थें जें माझें पूजन । तेणें मी संतृप्त जनार्दन । हा आगमोक्त यज्ञ संपूर्ण । त्रिविध लक्षण समसाम्यें ॥ ६२ ॥ वैदिकादि त्रिविध गती । पूजितां तृप्त मी श्रीपती । पूजाधिकाराची स्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ६३ ॥

यदा स्वनिगमेनोक्तं द्विजत्वं प्राप्य पूरुषः । यथा यजेत भक्त्या श्रद्धया तन्निबोध मे ॥ ८ ॥

आहे तरी माझ्यानें समग्र पूजाविधानाचा प्रकार सांगवत नाहीं. ५३ एखादा अतिशय विद्वान् जरी असला, तरी त्याला पूजाविधिविधान सांगण्याचें सर्वथा सामर्थ्य नसतें. ५४ यास्तव पूर्वी सांगितल्याप्रमाणें वेद-शास्त्रांचें सार काढून तें मी तुला थोडक्यांत सांगतों. ५५ पूजाविधीचें सार वैदिक, तांत्रिक व मिश्र अशा तीन प्रकारचें आहे. त्यांच्या पूजेचा प्रकारहि सांगतों, ऐक. ५६.

वैदिकः तांत्रिकः मिश्रः इति मे त्रिविधः मखः–वैदिक, तांत्रिक व मिश्र अशी माझी तीन प्रकारची पूजा आहे. (ज्या पुरुषसूक्तादिकांमध्यें वैदिकच मंत्र व वैदिकच अंगें असतात, तो वैदिक, तांत्रिकहि तसाच व अष्टाक्षरादि हा मिश्र पूजाप्रकार आहे.) त्रयाणां ईप्सितेन एव विधिना मां समर्चयेत्–या तीन प्रकारांतील आपल्याला अभीष्ट असलेल्याच विधीनें माझें पूजन करावें. ७.

वेदांतील मंत्र, वेदांतील अंगें, माझी वेदोक्त साङ्ग पूजा याला वैदिकमार्ग म्हणतात. ५७ आगमोक्त मंत्र व अङ्गें यांनीं माझी पूजा करणें याला तंत्रमार्ग म्हणतात. आतां मिश्रविधान ऐक. ५८ वेदांतील मंत्र व आगमांतील अंगें याप्रमाणें दोहोंनीं मिश्र असलेली जी माझी साङ्ग पूजा, यालाच मिश्रमार्ग म्हणतात. ५९ अशी ही तीन प्रकारची साङ्गपूजा हाच माझा त्रिविध यज्ञ आहे. यानें माझे पार्षद व परिवार यांसह मज श्रीरंगाला संतोष होतो. ६० माझें असें तीन प्रकारचें भजन आहे. ज्यावर ज्याची पूर्ण श्रद्धा असेल त्या विधीनें त्यानें पूजन केलें असतां त्याच्या भक्ती-मुळें माझी सारखीच तृप्ति होते. ६१ भक्तिभावानें माझें पूजन केलें असतां मी जनार्दन संतुष्ट होतों. आगमोक्त यज्ञ एकसारखाच आहे. त्रिविध लक्षणांनीं युक्त असलेला हा आगमोक्त यज्ञ एकसारखाच आहे. ६२ वैदिकादि तीन प्रकारांनीं पूजन केलें असतां मी श्रीकृष्ण तृप्त होतों. पूजेच्या अधिकाराचा प्रकार मी तुला सांगतों, तो ऐक. ६३.

—जेव्हां त्रैवर्णिक पूजा करील तेव्हां त्यांतील विशेष सांगतात—

यदा पूरुषः स्वनिगमेन उक्तं द्विजत्वं प्राप्य मां भक्त्या श्रद्धया यथा यजेत तत् मे निबोध–जेव्हां गर्भा-पासून आठव्या, अकराव्या किंवा बाराव्या वर्षी पुरुष स्वतःच्या वेदानें सांगितलेल्या उपनयनास प्राप्त होतो, तेव्हां त्यानें मला भक्तीनें व श्रद्धेनें कसें पूजावें तें माझ्या तोंडून ऐक. ८.

द्विजन्मे जे तिन्ही वर्ण । त्यांचें अधिकारलक्षण । गर्भाष्टमीं उपनयन । तें अधिकारपूर्ण ब्राह्मण ॥ ६४ ॥ क्षत्रियांचा अधिकार शुद्ध । बारा वर्षां व्रतबंध । सोळा वर्षां प्रसिद्ध । व्रतबंध वैश्यांसी ॥ ६५ ॥ गायत्रीउपदेश पावोन । दुसरें जन्म उपनयन । या नांव सावित्रजन्म जाण । द्विजन्मे त्रिवर्ण वेदोक्तविधी ॥ ६६ ॥ वेदोक्त अधिकारलक्षण । या नांव उद्धवा जाण । आतां माझें पूजाविधिस्थान । ऐक संपूर्ण निजभक्ता ॥ ६७ ॥

अर्चायां स्थण्डिलेऽग्नौ वा सूर्ये वाऽप्सु हृदि द्विजे । द्रव्येण भक्तियुक्तोऽर्चेत्स्वगुरुं माममायया ॥ ९ ॥

माझें पूजावया अधिष्ठान । अष्टविध पूजास्थान । त्याचेंही निजलक्षण । उणखूण ते ऐक ॥ ३८ ॥ प्रियप्रतिमा पूजास्थान । हें माझें प्रथम अधिष्ठान । कां पृथ्वीतळीं स्थंडिलीं जाण । पूजास्थान दुसरें ॥ ६९ ॥ अग्नीचें तेज स्वरूप माझें । तें पूजास्थान जाण तिजें । सूर्यमंडळीं जे पूजा कीजे । तें चवथें माझें पूजास्थान ॥ ७० ॥ उदकीं जें माझें पूजन । तें पांचवें पूजास्थान । हृदयीं जें माझें आवाहन । तें पूजास्थान सहावें ॥ ७१ ॥ शालग्राम केवळ अचेतन । ब्राह्मण माझें स्वरूप सचेतन । तें अखंडत्वें ब्रह्मपूर्ण । पूजा सन्मान षोडशोपचार ॥ ७२ ॥ ब्राह्मणीं ज्याचा ब्रह्मभावो । तो परम भाग्याचा स्वयमेवो । ब्रह्मादिकां पूज्य पहा हो । मी देवाधिदेवो स्वयें वंदीं ॥ ७३ ॥ सकळ पूज्यांमाजीं जाण । मुख्यत्वें पूज्य ब्राह्मण । तें सातवें पूजास्थान । उद्धवा जाण अतिश्रेष्ठ ॥ ७४ ॥ सकळ पूज्यां पूज्यत्वें पूजा । जो वरिष्ठ वरिष्ठत्वें बोजा । जो विनटता आत्मा माझा । वंद्य गुरुराजा सर्वांसी ॥ ७५ ॥ सद्भावें ज्याचे धरितां चरण । मी सुखावें ब्रह्म पूर्ण । ज्याचें करितां स्तवन । मी परमात्मा जाण उल्हासें ॥ ७६ ॥ सद्गुरूचें

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन्हीं द्विजांचे अधिकार असे आहेत—ब्राह्मणांना गर्भापासून आठव्या वर्षीं उपनयन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. ६४ क्षत्रियांना बाराव्या वर्षी व्रतबंध करण्याचा अधिकार आहे व वैश्यांना सोळाव्या वर्षीं मौजीबंधनाचा अधिकार आहे. ६५ गायत्रीचा उपदेश करून उपनयनविधि, हा दुसरा जन्म म्हटला आहे. म्हणून त्याला सावित्रीजन्म असें म्हणतात. तीन्ही वर्णांचे लोक द्विज असल्यामुळें ते वेदोक्त विधीला योग्य आहेत. ६६ यालाच वेदोक्त अधिकारलक्षण म्हणतात. माझ्या प्रिय भक्ता उद्धवा ! आतां पूजाविधानाचें स्थान सांगतों, तें ऐक. ६७.

अर्चायां स्थण्डिले अग्नौ वा सूर्ये वा अप्सु हृदि द्विजे स्वगुरुं मां अमामया द्रव्येण भक्तियुक्तः अर्चेत्—प्रतिमादिक, स्थंडिल, अग्नि, सूर्य, जळ, हृदय व ब्राह्मण यांमध्यें मज स्वगुरूचें निष्कपटपणें पुष्पादि द्रव्यांनीं भक्तियुक्त होऊन पूजन करावें. ९.

माझ्या पूजेचीं आठ स्थानें आहेत. त्यांचें लक्षण व प्रकार ऐक. ६८ प्रतिमा हें माझें पूजेचें पहिलें स्थान. जमिनीवर चौकोनी ओटा करून पूजा करणें, हें दुसरें स्थान; ६९ अग्नीचें तेज हें माझेंच स्वरूप आहे, तें माझें तिसरें पूजास्थान. सूर्यमंडळाची जी पूजा करितात तें चवथें स्थान. ७० जलामध्यें जी माझी पूजा करितात, तें माझें पांचवें पूजास्थान. हृदयांत जें माझें आवाहन, तें सहावें स्थान. ७१ माझें अचेतन स्वरूप शालग्राम आहे व सचेतन स्वरूप ब्राह्मण होत. तें अखंड पूर्ण परब्रह्मच होय. म्हणून ब्राह्मणांची सन्मानानें षोडशोपचार पूजा करावी. ७२ ब्राह्मणांमध्यें ज्याची ब्रह्मभावना असते, तो स्वभावतःच अत्यंत भाग्यवान् जाणावा. कारण तो ब्रह्मदेवादिकांसहि पूज्य असतो. मी स्वतः देवाधिदेव त्याला वंदन करितो. ७३ सगळ्या पूज्यांमध्यें मुख्यत्वें ब्राह्मण पूज्य आहेत. हें अतिशय श्रेष्ठ सातवें पूजास्थान आहे. उद्धवा ! ७४ या सर्व पूजांमध्येंहि पूज्यत्वानें पूजण्यास योग्य, वरिष्ठांतील अतिवरिष्ट जो केवल माझा आत्माच, तो गुरुराज सर्वांमध्यें अत्यंत पूज्य आहे. ७५ मी स्वतः पूर्ण ब्रह्म असूनहि भक्तिभावानें त्यांचें चरण धरण्यांत मला मोठा संतोष होतो. त्यांची स्तुति केली असतां मज परमात्म्याला उल्हास वाटतो. ७६

नामस्मरण । निर्दळी भवभय दारुण । निवारोनि जन्ममरण । निववी संपूर्ण निजबोधें ॥ ७७ ॥ तो मी परमात्मा नारायण । गुरुरूपें प्रकटोनि जाण । परब्रह्माचें पूर्णपण । शिष्यद्वारा संपूर्ण प्रकाशक ॥ ७८ ॥ ब्रह्माचें परब्रह्मपण । सद्‌गुरूचेनि सत्य जाण । एव्हडें अगाध महिमान । अतिगहन गुरूचें ॥ ७९ ॥ एवं सद्‌गुरु ज्ञानघन । जो हरिहरां वंद्य पूर्ण । तो माझें सद्रूप अधिष्ठान । हें पूजास्थान आठवें ॥ ८० ॥ हें आठवें पूजास्थान । तें अखंड आठवे आठवण । तेणें आठवें साङ्ग संपूर्ण । उद्धवा जाण मी पूजिलों ॥ ८१ ॥ एवं ही आठही पूजास्थानें । तुज सांगीतलीं सुलक्षणें । तेथलीं पूजेचीं लक्षणें । तेंही भिन्नपणें सांगेन ॥ ८२ ॥ सकळ अधिष्ठानां गोडपण । जें पूजनीं होय संपूर्ण । तें पूजेचें मुख्य लक्षण । निजवर्म खूण ते ऐक ॥ ८३ ॥ सांडूनि लोकरंजनव्यापार । त्यजूनि दांभिक उपचार । दवडूनि शठत्वाचा व्यवहार । भजनतत्पर सद्भावें ॥ ८४ ॥ हें अष्टौ महापूजास्थान । तेथ अमायिक जें जें भजन । तें तें अतिगोड पूजन । उद्धवा जाण निश्चित ॥ ८५ ॥ एथ निष्कपट जे जे सेवा । ते ते अतिवल्लभ देवाधिदेवा । आतां पूजाविधि आघवा । ऐक बरवा सांगेन ॥ ८६ ॥

पूर्वं स्नानं प्रकुर्वीत धौतदन्तोऽङ्गशुद्धये । उभयैरपि च स्नानं मन्त्रैर्मृद्‌ग्रहणादिभिः ॥ १० ॥

मळत्याग दंतधावन । यथाकाळीं करूनि जाण । देहशुद्ध्यर्थ करूनि स्नान । मृत्तिकाग्रहणपूर्वक ॥ ८७ ॥ ऐसें झालिया मळत्यागस्नान । मग करावें मंत्रस्नान । वैदिक तांत्रिक विधान । दीक्षाग्रहण यथाविधी ॥ ८८ ॥ जैसा सद्‌गुरुसंप्रदावो । तैसा चालवावा आम्नावो । त्या विधीं स्नान करूनि पहाहो । निर्मळ भावो धरावा ॥ ८९ ॥

सन्ध्योपास्त्यादिकर्माणि वेदेनाचोदितानि मे । पूजां तैः कल्पयेत्सम्यक् सङ्कल्पः कर्मपावनीम् ॥ ११ ॥

सद्‌गुरूचें नामस्मरण भयंकर संसारभयाचा नाश करितें व जन्म-मरणांचें निवारण करून आत्मज्ञानानें तृप्त करितें. ७७ मी परमात्मा नारायण गुरुरूपानें प्रकट होऊन परब्रह्माचें पूर्णत्वशिष्यद्वारा प्रकाशित करितों. ७८ ब्रह्माचें ब्रह्मपण सद्‌गुरूच्या योगानेंच सत्य होतें. एवढा गुरूचा अगाध महिमा आहे. ७९ हरि-हरांसहि परम वंद्य असलेला, ज्ञानसंपन्न सद्‌गुरु माझ्या स्वरूपाचें अधिष्ठान आहे. हें माझें आठवें पूजास्थान आहे. ८० उद्धवा ! हें आठवें पूजास्थान अखंड आठवण ठेवितें. त्यामुळें त्याच्या स्मरणानेंच माझें सांग व संपूर्ण पूजन होतें. ८१ अशीं हीं आठ सुंदर पूजास्थानें मी तुला सांगितली. त्यांतील पूजेचे प्रकार तुला निराळे सांगेन. ८२ या सगळ्या अधिष्ठानांत ज्या पूजनांची आवड असते, तेंच पूजेचें मुख्य लक्षण समजावें. हेंच माझें खरें वर्म आहे. ८३ लोकांच्या रंजनाचे सर्व उद्योग सोडून, दांभिक व्यवहार टाकून, कपटाचें आचरण न करितां भक्तिभावानें माझें भजन करावें. ८४ उद्धवा ! मीं जीं आठ पूजास्थानें सांगितलीं, त्यांत निष्कपटपणानें पूजन करणें हेंच अत्यंत गोड पूजन होय. ८५ त्यांतील जी निष्कपट सेवा ती देवाधिदेवाला अत्यंत प्रिय आहे. आतां तुला पूजेचा सगळा विधि सांगतों, ऐक. ८६.

धौतदन्तः अङ्गशुद्धये पूर्वं स्नानं प्रकुर्वीत—ज्यानें दांत घासले आहेत अशा पुरुषानें शरीरशुद्धीसाठीं प्रथम स्नान करावें. उभयैः अपि मन्त्रैः मृद्‌ग्रहणादिभिः च स्नानं—वैदिक व तांत्रिक अशा दोन्ही प्रकारच्या मंत्रांनीं व मृत्तिकाग्रहणादिकांनीं स्नान करावें. १०.

मलविसर्जन, दांत घासून तोंड धुणें इत्यादि नित्य कार्यें योग्यवेळीं करून मृत्तिका घेऊन देहशुद्धीसाठीं स्नान करावें. ८७ अशाप्रकारें शुचिर्भूत होऊन मग मंत्रयुक्त स्नान करावें व वैदिक, तांत्रिकविधीनें यथाविधि दीक्षा घ्यावी. ८८ नंतर सद्‌गुरूच्या संप्रदायाप्रमाणें वेदपठण करावें व त्या विधीनें स्नान करून मनांत निर्मल भाव धरावा. ८९.

वेदेन आचोदितानि यानि सन्ध्योपास्त्यादिकर्माणि तैः सह सम्यक् सङ्कल्पः कर्मपावनीं मे पूजां कल्पयेत्—वेदानें उद्देशून पूर्णपणें सांगितलेली जी संध्योपासनादि कर्में त्यांसहवर्तमान ज्याचा परमेश्वराविषयींच संकल्प आहे अशा पुरुषानें कर्मांची निवृत्ति करणारी माझी पूजा करावी. ११.

वर्णाश्रमनिजविधींसी । वेदें संध्या बोलिली जैसी । ते ते वर्णाश्रमीं तैसी । नित्यनैमित्त्यैंसीं करावी ॥ ९० ॥ वेदोक्त आचरावें स्वकर्म । निःशेष त्यागावें निषिद्ध काम्य । या नांव शुद्ध स्वधर्म । उत्तमोत्तम अधिकारू ॥ ९१ ॥ वेदोक्त सांडणें स्वधर्म । हाचि मुख्यत्वें अति-अधर्म । हाता आलिया परब्रह्म । न त्यागितां कर्म स्वयें राहे ॥ ९२ ॥ स्वयें स्वधर्म जो सांडणें । ठाणें । स्वधर्में चित्तशुद्धि साधणें । यालागीं त्यागणें अहंता ॥ ९३ ॥ तेथें स्वधर्मकर्म कर्ता आचरतां । ऐसा भाव उपजे चित्ता । मी नव्हें एथ कर्मकर्ता । फळभोक्ता मी नव्हें ॥ ९४ ॥ देह जड मूढ अचेतन । त्यासी चेतवी जनीं जनार्दन । तेथ माझें मीपण कर्तेपण । सर्वथा जाण रिघेना ॥ ९५ या बुद्धीं जें कर्माचरण । तें भावार्थें भावी ब्रह्मार्पण । यापरी निरभिमान । माझें उपासन साधकां ॥ ९६ ॥ माझी प्रतिमा पूजाविधान । तें प्रथम माझें पूजास्थान । तें प्रतिमाक्रियालक्षण । ऐक संपूर्ण उद्धवा ॥ ९७ ॥

शैला दारुमयी लौही लेप्या लेख्या च सैकती । मनोमयी मणिमयी प्रतिमाष्टविधा स्मृता ॥ १२ ॥

अष्टधा प्रतिमास्थीती । ज्या पूजितां सद्यःश्रेय देती । ऐशिया प्रतिमांची जाती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ९८ ॥ गंडक्यादि शिळामूर्ती । कां दारु ब्रह्मकाष्ठव्यक्ती । अथवा सुवर्णादि धातुमूर्ती । सद्यः फळती साधकां ॥ ९९ ॥ मृत्तिकाकापडकीटणमूर्ती या नांव लेप्या म्हणिजेती । स्थंडिलीं लिहिल्या अतिप्रीतीं । त्या लेख्य मूर्ती पूजकां ॥ १०० ॥ वाळवेची जे केली मूर्ती । ती नांव सिकतामूर्ती म्हणती । तेही पूज्य गा निश्चितीं । सुवर्णव्यक्तीसमान ॥ १ ॥ मूर्ती रत्नमयी कां सोज्जळ । हिरा मरकत इंद्रनीळ । पद्मराग मुक्ता-फळ । या मूर्ती केवळ अतिपूज्य ॥ २ ॥ मूर्तींमाजीं अतिप्राधान्य । मनोमयी मूर्ती पावन । जिचें करितां

वर्णाश्रमविधीला अनुसरून वेदानें जशी संध्या सांगितली असेल, तशीच ती नित्यनैमित्तिक कर्मांसह त्या त्या वर्णांच्या व त्या त्या आश्रमांच्या माणसानें ती करावी. ९० वेदोक्त स्वकर्म आचरावें. निषिद्ध व काम्य कर्म निःशेष टाकावें. यालाच शुद्ध धर्म व उत्तमोत्तम अधिकार म्हणतात. ९१ वेदोक्त स्वधर्माचा त्याग करणें हा मुख्यत्वें अत्यंत अधर्म आहे. परब्रह्म एकदा हातीं आलें कीं, कर्मांचा त्याग केल्यावांचून तें थांबतें. ९२ स्वतःच स्वधर्माचा त्याग करणें हेंच मुख्य अधर्माचें ठाणें आहे. स्वधर्मानें चित्तशुद्धि साधण्यासाठीं अहंता टाकावी. ९३ स्वधर्माचरण आचरीत असतां 'मी या कर्माचा कर्ता नव्हें. फलाचा भोक्ताहि मी नव्हें' अशी भावना मनांत उपजली पाहिजे. ९४ देह जड, मूढ, अचेतन असून त्यास जनीं-जनार्दन चेतना देतो. तेव्हां माझें 'मीपण'—कर्तेपण त्यांत प्रवेश करीत नाहीं. ९५ अशा बुद्धीनें केलेलें कर्माचरण भक्तीमुळें ब्रह्मार्पणच होतें. याप्रमाणें साधकांना माझी निरभिमाने उपासना घडते. ९६ माझ्या प्रतिमेचें पूजन हेंच माझें पहिलें पूजास्थान आहे. उद्धवा ! त्या प्रतिमा कशाच्या कराव्या, त्याचें सगळें लक्षण तुला सांगतों, ऐक. ९७.

—आतां पुढील दीड श्लोकानें प्रतिमेचे प्रकार सांगतात—

शैला०.......मणिमयी–इति अष्टविधा प्रतिमा स्मृता–शिलामयी, काष्ठमयी, सुवर्णादि धातुमयी, मृत्तिका-चंदनादिकांनीं लिंपलेली, शाईनें भिंतीवर काढलेली, वाळूची, हृदयांत पूजा करावयाची झाल्यास मनोमयी व रत्नमयीं **अशी आठ प्रकारची** प्रतिमा सांगितली आहे. १२.

प्रतिमा आठ प्रकारच्या आहेत. ज्या पूजिल्या असतां तत्काल कल्याण होतें अशा प्रतिमांचे प्रकार तुला सांगतों. ऐक. ९८ शाळग्रामादि शिळेच्या मूर्ति, लाकडाच्या किंवा सुवर्णादि धातूंच्या मूर्ति साधकाला सत्वर पावतात. ९९ माती, कापड, लाख, मेण, लुकण यांनीं लिंपलेल्या मूर्तींना लेप्या म्हणतात; किंवा भिंतीवर अतिशय प्रेमानें काढलेलीं जीं चित्रें, त्यांना लेख्य मूर्ति म्हणतात. १०० वाळूची जी मूर्ति करितात, तिला सिकता मूर्ति म्हणतात. तीहि सुवर्ण मूर्तींसारखीच पूज्य आहे. १ रत्नांची सुंदर मूर्ति, हिरा, पांच, इंद्रनील मणि, पद्मराग, मोतीं यांच्या मूर्ति अत्यंत पूज्य होत. २ सर्व प्रकारच्या मूर्तींमध्यें अतिशय श्रेष्ठ मनोमय मूर्ति पावन आहे. तिची उपासना

उपासन । समाधान साधकां ॥ ३ ॥ तेंचि प्रतिमापूजाविधान । स्थावरजंगमलक्षण । तेही अर्थीचें निरूपण । विशद श्रीकृष्ण सांगत ॥ ४ ॥

चलाचलेति द्विविधा प्रतिष्ठा जीवमन्दिरम् । उद्वासावाहने न स्तः स्थिरायामुद्धवार्चने ॥ १३ ॥

चेतनाचेतनप्रकार । जडातें जीववी साचार । जीवशब्दें चिन्मात्र । मुख्य परमेश्वर बोलिजे ॥ ५ ॥ भक्तभावार्थें साचार । त्या जीवाचें निजमंदिर । प्रतिमा जंगम स्थावर । आगमशास्त्रसंमतें ॥ ६ ॥ तेथ स्थावरमूर्तिपूजन । साधकें करितां आपण । न लगे आवाहनविसर्जन । तेथ अधिष्ठान स्वयंभ ॥ ७ ॥

अस्थिरायां विकल्पः स्यात् स्थण्डिले तु भवेद्द्वयम् । स्नपनं त्वविलेप्यायामन्यत्र परिमार्जनम् ॥ १४ ॥

जंगम प्रतिमांच्या ठायीं । आवाहनविसर्जन पाहीं । एकीं आहे एकीं नाहीं । ऐक तेही विभाग ॥ ८ ॥ शालग्राममूर्तीसी जाण । स्वयंभ माझें अधिष्ठान । तेथ आवाहनविसर्जन । सर्वथा जाण लागेना ॥ ९ ॥ शालग्रामाचा कुटका । ज्याचे पूजेसी आहे फुटका । तेथ परमात्मा निजसखा । सर्वदा देखा नांदत ॥ ११० ॥ इतर मूर्ती जंगम जाण । तेथ आवाहनविसर्जन । साक्षेपें करावें आपण हें विधि विधान । आगमोक्त ॥ ११ ॥ स्थंडिलीं मूर्तिआवाहान । सर्वेचि पूजांतीं विसर्जन । हें उभय भावनाविधान । स्थंडिलीं जाण आवश्यक ॥ १२ ॥ आपुले हृदयींचा चिद्घन । मूर्तीमाजीं कीजे आवाहन । पूजांतीं करूनि विसर्जन । देव हृदयीं जाण ठेवावा ॥ १३ ॥ एथ आपणचि ब्रह्म परिपूर्ण । हेंचि व्हावया

करीत असतां साधकाला समाधान वाटतें. ३ आतां त्या प्रतिमेचें पूजाविधान व चल आणि अचल मूर्तींचें लक्षण याविषयींचेंच निरूपण श्रीकृष्ण स्पष्ट करून सांगत आहे. १०४.

चला-अचला इति द्विविधा प्रतिष्ठा जीवमन्दिरं—चल व अचल अशी दोन प्रकारची प्रतिमा हेंच भगवानाचें मंदिर आहे. (ज्यामध्यें भगवान् आधिक्यानें रहातो ती प्रतिष्ठा किंवा प्रतिष्ठेनें म्ह० प्राण प्रतिष्ठेनें दोन्ही प्रकारच्या प्रतिमा भगवानाचें मंदिर होतें, असा अर्थ ' प्रतिष्ठाजीवमन्दिरं ' हें एक सामासिक पद मानून करावा. आतां या पुढील दीड श्लोकानें प्रतिमाभेदानें पूजेचा विशेष सांगतात—) उद्धव-हे उद्धवा ! स्थिरायां अर्चने उद्वासावाहने न स्तः-स्थिर प्रतिमेमध्यें पूजन करावयाचें झाल्यास आवाहन व विसर्जन करूं नये. १३.

चेतन-अचेतनांचा प्रकार असा आहे. जो ज्ञानस्वरूप जीवशब्दानें जडाला सजीव करितो त्याला मुख्य परमेश्वर म्हटलें आहे. ५ भक्त भक्तीच्यायोगें जीवाचें मंदिर आहे आणि वेद-शास्त्रांच्या संमतीनें त्याच्याच स्थावर-जंगम प्रतिमा केलेल्या आहेत. ६ त्यांत साधकानें स्थावर मूर्तीचें पूजन केलें असतां तिचें अवाहन-विसर्जन करावें लागत नाहीं. कारण हृदयांत त्याचें स्वयंभूच अधिष्ठान असतें. १०७.

अस्थिरायां विकल्पः स्यात्—अस्थिर प्रतिमेमध्यें पूजन करतांना त्यांचा विकल्प मानावा. [शालग्राममध्यें आवाहन व विसर्जन करूं नये. वाळूच्या प्रतिमेंत करावें. इतर प्रतिमेंत करावें किंवा करूं नये !] स्थण्डिलेतु द्वयं भवेत्—स्थण्डिलामध्यें दोन्ही होतात. अविलेप्यायां तु स्नपनं मृण्मयी व लेख्या यावांचून इतर प्रतिमांना स्नान घालावें. अन्यत्र परिमार्जनं विलेप्या व लेख्या या प्रतीमामध्यें केवल मार्जन करावें. १४.

शालग्रामादि जंगम प्रतिमांतील कांहीं प्रतिमांना आवाहन-विसर्जन आहे व कांहींना नाहीं, तोहि प्रकार ऐक. ८ शालग्रामाच्या मूर्तीला माझें स्वयंभू आधिष्ठानत्व असतें, म्हणून त्यास आवाहन-विसर्जनाची गरज नसते. ९ शालग्रामाचा फुटका तुकडा जरी पूजेला असला तरी तेथें आत्मसखा परमात्मा सतत नांदत असतो. ११० इतर ज्या चलमूर्ति आहेत त्यांना आवाहन-विसर्जन आहे, तें साक्षेपानें करावें, असें शास्त्रोक्त विधान आहे. ११ स्थंडि-लावरील प्रतिमेंत म्ह० मातीच्या ओट्यावर किंवा भिंतीवर काढलेल्या चित्रांत आवाहन करावें व पूजा होतांच विसर्जन करावें. हे दोन भावनाविधि स्थंडिलावर अवश्य करावें. १२ हृदयस्थ परमात्म्याचें मूर्तींत आवाहन करावें व पूजा झाल्यावर त्याचें पुनः हृदयांत स्थापन करावें. १३ यांत आपणच परिपूर्ण ब्रह्म आहोंत याची साधकाला

निजस्मरण । आवाहनविसर्जनें जाण । निजात्मआठवण साधकां ॥ १४ ॥ हा आगमींचा निजात्मभावो । आपणचि आपला देवो । आपला आपण पूजक पहा वो । हो निजात्मआठवो निजपूजे ॥ १५ ॥ देव होऊनि देव पूजिजे । हे निजात्मपूजा गोड खाजें । उपासनाकांडव्याजें । उद्धवासी दीजे श्रीकृष्णें ॥ १६ ॥ हे निजात्मता निजगोडी । प्रतिपदीं न लभतां रोकडी । उपासना तडातोडी । कोण कोरडी सोशील ॥ १७ ॥ हें आगमींचें निजगुह्य जाण । प्रतिपदीं सुखसंपन्न । साधक स्वयें होती चिद्घन । हे तेंचि उपासन उद्धवा ॥ १८ ॥ ऐसें ऐकतां कृष्णवचन । उद्धव स्वानंदें झाला पूर्ण । धावोनि धरिलें श्रीकृष्णचरण । म्हणे समूळ निरूपण मज सांग ॥ १९ ॥ तंव देव म्हणे स्थिर राहें । जें हें आगमोक्त गुह्य आहे । तें माझे कृपेवीण पाहें । प्राप्त नोहे साधकां ॥ १२० ॥ आगमोक्त गुह्य गहन । असो हें माझें गुप्तधन । तुवां पुशिलें पूजाविधान । ऐक सावधान उद्धवा ॥ २१ ॥ लेप्या लेख्या ज्या मूर्ति जाण । त्यांसी करावेना स्नान । इतरां मूर्तिंसी स्नपन । यथाविधान करावें ॥ २२ ॥

द्रव्यैः प्रसिद्धैर्मद्यागः-प्रतिमादिष्वमायिनः । भक्तस्य च यथालब्धैर्हृदि भावेन चैव हि ॥ १५ ॥

पूजक सकाम होय चांग । तैं पूजाद्रव्य व्हावें सांग । पूजासाधन झालिया व्यंग । फळ निर्व्यंग उपजेना ॥ २३ ॥ भक्त निष्काम बाडेंकोडें । तैं पूजाद्रव्याचें सांकडें । सर्वथा कांहीं न पडे । भक्तभावो आवडे भगवंता ॥ २४ ॥ तेथ अनायासें जें प्राप्त । तेणें भगवंत होय तृप्त । तोचि पूजायाग यथोक्त जाण निश्चित उद्धवा ॥ २५ ॥ निष्कामवृत्तीं फल मूल । दूर्वांकुर कां निर्मळ जळ । इतुकेन पूजायाग

आठवण करून देण्यासाठीं आवाहन-विसर्जन करावें. म्हणजे साधकाला आत्मस्वरूपाची आठवण होते. १४ शास्त्राचा गूढ अर्थ असा आहे कीं, आपणच आपला पूजक आहों. त्यामुळें आपल्या पूजेनेच आत्मस्वरूपाची आठवण होते. १५ देव होऊन देव पूजणें हें आत्मस्वरूपांतील गोड खाजें आहे. तें उपासनाकांडाच्या निमित्तानें श्रीकृष्णानें उद्धवाला दिलें. १६ ही आत्मस्वरूपाची गोडी पावलों-पावलीं जर मिळाली नांहीं तर उपासनेची कोरडी खटपट कोण सोसणार ! १७ हें शास्त्राचें गूढ रहस्य आहे. उद्धवा ! ज्यायोगें साधक पावलों-पावलीं सुख-संपन्न व ज्ञानयुक्त होतात, तीच ही उपासना आहे. १८ हें श्रीकृष्णाचें वचन ऐकून उद्धवाला अतिशय आनंद झाला. त्यानें धांवत जाऊन श्रीकृष्णाचें पाय धरिले व म्हणाला कीं, देवा, आरंभापासून याचेंच सविस्तर निरूपण कर. १९ तेव्हां श्रीकृष्ण म्हणाला कीं, तूं स्वस्थ बैस ! हें शास्त्रोक्त रहस्य माझ्या कृपेवांचून साधकाला प्राप्त होत नाहीं. १२० उद्धवा ! हें शास्त्रांतील गहन रहस्य राहूं दे. तें माझें गुप्त धन आहे. पण तूं जें पूजाविधान विचारिलेंस तेंच अगोदर सावधान चित्तानें ऐक. २१ चंदनादिकांचा लेप केलेल्या किंवा चित्र काढिलेल्या ज्या प्रतिमा असतात, त्यांस स्नान घालूं नये. इतर मूर्तींना यथाविधि स्नान घालावें. १२२.

—आतां सकाम निष्काम भेदानें विशेष सांगतात—

अमायिनः भक्तस्य प्रतिमादिषु यथालब्धैः प्रसिद्धैः द्रव्यैः मद्यागः—माझ्या निष्काम भक्ताची प्रतिमादिकांमध्यें यथासंभव मिळालेल्या अतिशय उत्तम चंदनादि द्रव्यांनीं माझी पूजा होते. हृदि च भावेन एव हि—पण त्यावेळीं चंदनादि द्रव्य मुळींच मिळत नाहीं, तेव्हां हृदयांत कल्पित चंदनादि द्रव्यांनीं पूजा करावी. [किंवा हृदयामध्यें जर माझी पूजा करावयाची असेल तर ती मनोमय द्रव्यांनीं करावी.] १५.

पूजक जर सकाम असेल तर पूजासाहित्य यथासांग असावें. कारण पूजेच्या साधनांत उणीव असली, तर पूर्ण फल मिळत नाहीं. २३ परंतु भक्त जर निष्काम असेल तर त्यानें मिळेल त्या पूजासामग्रीनें आवडीनें पूजा करावी. त्यांत जरी कांहीं कमतरता पडली तरी त्याच्यावर संकट येत नाहीं. भगवंताला भक्तांचा भाव प्रिय असतो. २४ त्याला अनायासानें जें मिळतें, त्यानें भगवान् तृप्त होतो. उद्धवा ! तोच खरोखर यथोक्त पूजाविधि समजावा. २५ निष्काम

सकळ । होय अविकळ मद्भावें ॥ २६ ॥ जेथ माझा सद्भाव दृढ । तेथ उपचारांचा कोण पाड । भक्तांचा भावचि मज गोड । सुख सुरवाड मद्भक्तीं ॥ २७ ॥ बाह्य उपचार जे कां देहीं । ते प्रतिमामूर्तिपूजेसी पाहीं । मानसपूजेंचे तंव ठायीं । वाणी नाहीं उपचारा ॥ २८ ॥ तेथ मनचि होय माझी मूर्ती । मनोमय उपचारसंपत्ती । निर्लोभें जे मज अर्पिती । तेणें मी श्रीपति संतुष्ट ॥ २९ ॥ प्रतिमादि अष्टौ पूजास्थान । यथोक्त पूजेचें विधान । तुज मी सांग सांगेन । देईं अवधान उद्धवा ॥ १३० ॥

स्नानालंकरणं प्रेष्ठमर्चायामेव तूद्धव । स्थण्डिले तत्त्वविन्यासो वह्नावाज्यप्लुतं हविः ॥ १६ ॥
सूर्ये चाभ्यर्हणं प्रेष्ठं सलिले सलिलादिभिः ।

प्रतिमामूर्ति पूजास्थान । ते मूर्तीस जें महास्नपन । या नांव बोलिजे स्नान । साङ्ग भूषण मुकुटादी ॥ ३१ ॥ जे लोकीं उत्तम प्रकार । कां आपणासी जे प्रियकर । जे जे अनर्घ्य अळंकार । तेणें श्रीधर पूजावा ॥ ३२ ॥ स्नान भोजन अलंकार । साङ्ग पूजा सपरिकर । हा प्रतिमापूजाप्रकार । ऐक विचार स्थंडिलाचा ॥ ३३ ॥ स्थंडिलीं जें पूजास्थान । तेथ तत्त्वांचें धरोनि ध्यान । करावें तत्त्व विन्यासलेखन । पूजाविधान या हेतू ॥ ३४ ॥ आत्मतत्त्वादी विवंच । स्थंडिलीं विवंचूनि साच । हृदय शिर शिखा कवच । नेत्र अस्त्र दिशंच निजपूजा ॥ ३५ ॥ अग्नीचे ठायीं जें पूजन । तेथ माझें करूनि ध्यान । आज्यकृत हविर्हवन । हें पूजाविधान अग्नीचें ॥ ३६ ॥ अग्नि देवांचें वदन । येणें विश्वासें संपूर्ण । हविर्द्रव्यें करितां हवन । अग्निपूजन या हेतू ॥ ३७ ॥ सूर्याच्या ठायीं प्रकाशमान ।

वृत्तीनें व मद्भावानें फल, मूल, दुर्वांकुर किंवा स्वच्छ जल जरी अर्पण केलें, तरी त्यांत सगळा निर्दोष पूजाविधि येतो. २६ जेथें माझ्यावरील भक्ति दृढ आहे, तेथें पूजेच्या बाह्य उपचारांची काय प्रतिष्ठा ! भक्ताचा भावच मला गोड वाटतो. मद्भक्तीनेंच मला अतिशय सुख होतें. २७ प्रतिमा पूजेलाच बाह्य उपचारांची आवश्यकता असते. मानसपूजेंत उपचारांना तोटा नाहीं. २८ कारण त्यांत मनच माझी मूर्ति आणि मनोमयच उपचारसंपत्ति ! जें भक्त मला निष्काम बुद्धीनें ती अर्पण करितात, त्यांवर मी श्रीपति संतुष्ट होतों. २९ उद्धवा ! आतां प्रतिमादि जीं आठ पूजास्थानें आहेत, त्यांच्या पूजेचा यथोक्त प्रकार मी तुला सविस्तर सांगतों, तरी लक्ष देऊन ऐक. १३०.

—पुढील दीड श्लोकानें अधिष्ठानभेदानें मुख्य विचार सांगतात—

उद्धव–हे उद्धवा ! तु अर्चायां एव स्नानालंकरणं प्रेष्ठं–प्रतिमेमध्येंच स्नान, अलंकार घालणें इत्यादि उपचार अत्यंत इष्ट आहेत. स्थण्डिले तत्त्वविन्यासः–स्थंडिलामध्यें योग्यस्थानीं अंगदेवता व प्रधानदेवता यांची त्या त्या देवतांच्या मंत्रांनीं स्थापना करणें, अत्यंत इष्ट आहे. वह्नौ आज्यप्लुतं हविः–अग्नींत घृतयुक्त हवि अत्यंत इष्ट आहे. सूर्ये च अभ्यर्हणं प्रेष्ठं–सूर्यामध्यें उपस्थान अर्घादि अत्यंत श्रेष्ठ आहे. सलिले सलिलादिभिः–जलामध्येंच तर्पणादिकांच्या योगानें पूजन करावें. १६.

प्रतिमा मूर्ति हें एक पूजास्थान आहे. त्या मूर्तीला जें महास्नान घालणें त्याला स्नान म्हणतात. त्या मूर्तीला मुकुटादि सांग भूषणें घालावीं. ३१ लौकिकांत जेवढे उत्तम प्रकार आहेत किंवा आपल्याला ज्याची अतिशय आवड असेल अशा मूल्यवान् भूषणांनीं श्रीहरीची पूजा करावी. ३२ स्नान, भोजन, अलंकार यांनीं यथासांग पूजा करणें हा प्रतिमापूजेचा विधि झाला. आतां स्थंडिलाचा प्रकार ऐक. ३३ स्थंडिलाचें जें पूजास्थान असतें, त्यांत तत्त्वाचें ध्यान धरून त्यांत तत्त्वविन्यासलेखन करावें, तत्त्वाचें आकार काढावे. हेंच त्याचें पूजाविधान होय. ३४ आत्मतत्त्वादिकांचें विवेचन करून हृदय, मस्तक, शिखा, कवच, नेत्र, अस्त्र इत्यादि चित्र रेखून त्यांचें दिशाबंधन करून पूजा करावी. ३५ अग्नीचें जें पूजन त्यांत माझें ध्यान धरून तुपाची आहुति देऊन होम करणें; हेंच अग्निपूजन होय. ३६ अग्नि हें देवांचें मुख आहे, अशा पूर्ण श्रद्धेनें हविर्द्रव्याचें हवन केलें असतां त्यानें अग्निपूजन होतें. ३७

मंडळात्मा सूर्यनारायण । तेथ सौरमंत्र उपस्थान । पूजाविधान या हेतू ॥ ३८ ॥ विचारितां श्रुतीचा अर्थ । आपोनारायण साक्षात । येथ पूजाविधान यथोक्त । जळीं जळयुक्त तर्पण ॥ ३९ ॥ हृदयीं जें माझें पूजास्थान । तेथें मनें मनाचें अर्चन । मनोमय मूर्ति संपूर्ण । पूजाविधान मानसिक ॥ १४० ॥ माझें मुख्यत्वें अधिष्ठान । ब्रह्ममूर्ती जे ब्राह्मण । तेथील जें पूजाविधान । आज्ञापालन दासत्वें ॥ ४१ ॥ ब्रह्मासी ज्याचेनि ब्राह्मण । तो सद्गुरु माझें पूजास्थान । सर्वार्थी श्रेष्ठ पावन । तेथील पूजन तें ऐसें ॥ ४२ ॥ जीवें सर्वस्वेंसीं आपण । त्यासी रिघावें अनन्य शरण । त्याच्या वचनासी प्राण । निश्चयें जाण विकावा ॥ ४३ ॥ गुरुची नीचसेवा सेवन । आवडीं करणें आपण । हेंचि तेथील पूजाविधान । येणें सुख संपूर्ण साधकां ॥ ४४ ॥ सद्गुरूसेवा करितां पाहीं । ब्रह्मसायुज्य लागे पायीं । गुरुसेवेपरतें कांहीं । श्रेष्ठ नाहीं साधन ॥ ४५ ॥ सद्गुरुस्वरूप तें जाण । अखंडत्वें ब्रह्म पूर्ण । तेथें आवाहन विसर्जन । सर्वथा आपण न करावें ॥ ४६ ॥ निष्कपटभावें संपूर्ण । सद्गुरूसी जो अनन्य शरण । त्याचे मीही वंदीं चरण । येथवरी जाण तो धन्य ॥ ४७ ॥ निर्लोभभावें सहज । पूजितां तोषे अधोक्षज । त्या भावाचें निजगुज । स्वयें यदुराज सांगत ॥ ४८ ॥

श्रद्धयोपाहृतं प्रेष्ठ भक्तेन मम वार्यपि ॥ १७ ॥

भूर्यप्यभक्तोपहृतं न मे तोषाय कल्पते । गंधो धूपः सुमनसो दीपोऽन्नाद्यं च किंचन ॥ १८ ॥

माझ्या ठायीं अतिप्रीतीं । श्रद्धायुक्त अनन्य भक्तीं । भक्त भावें जळ अर्पिती । तेणें मी श्रीपति सुखावें ॥ ४९ ॥ तो जळबिंदु यथासुखें । म्यां मुखीं झेलिजे आदिपुरुखें । तंव भक्तिभावाचेनि हरिखें ।

सूर्यामध्यें प्रकाशणारा मंडलात्मा जो सूर्यनारायण त्याचें सौरमंत्रानें स्तवन करणें हेंच सूर्यपूजन होय. ३८ श्रुतीच्या अर्थाचा विचार केला असतां जल हाच नारायण आहे. (नारायण शब्दाची व्युत्पत्ति गी. भा. पृ. १ वर सविस्तर दिली आहे) त्याचें यथाविधि पूजन म्हणजे जलांत जळाचें तर्पण करणें. ३९ हृदयांत जें माझें पूजास्थान आहे, तेथें मनाचें पूजन करावें. मनोमय मूर्तीचें मनोमय पूजासाहित्यानें पूजन करावें. १४० माझें मुख्य अधिष्ठान जे ब्राह्मण, त्यांची दास्यत्वानें आज्ञा पाळणें हाच पूजेचा प्रकार आहे. ४१ ज्याच्यामुळें ब्रह्माला ब्रह्मपण आलें, ते सद्गुरू माझें सर्वांत श्रेष्ठ पूजास्थान आहे. तेथलें पूजन असें आहे–४२ आपण जीवाभावानें त्यांस सर्वस्वीं शरण जावें. त्यांच्या वचनासाठीं आपला प्राण विकावा. ४३ गुरूची अगदीं हलक्या प्रतीची सेवाहि आपण मोठ्या आवडीनें करावी. हाच त्यांच्या पूजेचा प्रकार आहे. यानें साधकाला पूर्ण सुख होतें. ४४ सद्गुरूची सेवा केली असतां ब्रह्मसायुज्य पायां पडत येतें. सद्गुरूच्या सेवेहून दुसरें श्रेष्ठ साधनच नाहीं. ४५ सद्गुरूचें स्वरूपच मुळीं अखंड पूर्ण ब्रह्म आहे. त्यांचें अवाहन-विसर्जन केव्हांहि करूं नये. ४६ निष्कपटपणानें सद्गुरूला अनन्य शरण जाणाऱ्यांच्या चरणांना मी देखील वंदन करितों. इतका तो धन्य आहे. ४७ निरपेक्ष बुद्धीनें सहज पूजन केलें असतां भगवान् संतुष्ट होतो. त्याच्या भक्तींतील रहस्य स्वतः श्रीकृष्ण सांगत आहे. १४८.

—सर्वसाधारण पूजन सांगतात—

भक्तेन श्रद्धया उपाहृतं वारि अपि मम प्रेष्ठं–भक्तानें श्रद्धेनें अर्पिलेलें जलहि मला अतिशय प्रिय आहे. **अभक्तोपहृतं भूरि अपि मे तोषाय न कल्पते**–अभक्तानें अर्पण केलेलें पुष्कळ द्रव्यहि माझ्या संतोषाचें कारण होत नाहीं. **गन्ध०...च किंचन**–चंदन, धूप, फुले, दीप नैवेद्य इत्यादि कांहींहि जरी अभक्तानें अर्पण केलें, तरी तें मला संतुष्ट करीत नाहीं. १७-१८.

माझ्यावर अत्यंत प्रेम ठेवून, श्रद्धायुक्त अनन्य भक्तीनें जे भक्त मला नुसतें जल अर्पण करितात, त्यांच्या त्या जलानेंहि मज श्रीपतीला संतोष होतो. ४९ तो जलाचा थेंब मोठ्या प्रेमानें मी आदिपुरुष आपल्या मुखांत झेलून घेतों व भक्ति-

मी सुखरूप सुखें सुखावें देख ॥ १५० ॥ माझें त्रैलोक्यासी सुख । ऐसा मीही सुखरूप देख । त्या मज होय परम संतोख । भाविकांचें उदक सेवितां ॥ ५१ ॥ त्या जळबिंदूचिया साठीं । रमा नावडे गोमटी । ब्रह्मा जन्मला माझे पोटीं । तोही शेवटीं नावडे ॥ ५२ ॥ भाविकांचेनि उदकलेखें । मज वैकुंठही झालें फिकें । शेषनयनींचीं निद्रासुखें । त्यांचींही तुकें उतरलीं ॥ ५३ ॥ भाविकांच्या उदकापुढें । मज आणिक कांहीं नावडे । तेथही गंधादि पूजा जोडे । नैवेद्य चोखडे रसयुक्त ॥ ५४ ॥ ते पूजेचिये सुखप्राप्ती । उपमा नाहीं त्रिजगतीं । ऐसा भाविकांचिये भक्तीं । मी श्रीपति सुखावें ॥ ५५ ॥ भावें करितां भगवद्भक्ती । मी कृतकृत्य झालों निश्चितीं । ऐशिया निश्चयें जो भावार्थी । त्याचेनि जळें संतृप्ति मज होय ॥ ५६ ॥ येर जो अभक्त दंभस्थितीं । जीवीं द्रव्याशा बाह्य विरक्ती । लौकिकप्रतिष्ठेपुरती । माझी भक्ति जो मिरवी ॥ ५७ ॥ ऐशिया अभक्ताचिया स्थितीं । छत्र चामर गजसंपत्ती । मज अर्पितांही अभक्तीं । सुखलेश चित्तीं उपजेना ॥ ५८ ॥ क्षीरनीर निवडी राजहंस । तेथ निसूं दीधला कापुस । तेवीं अभक्तजनीं संतोष । मी हृषीकेश पावेना ॥ ५९ ॥ कागाची गायनकळा । जेवीं तोषेना किन्नरशाळा । तेवीं अभक्ताची भजनलीला । माझी चित्कळा तोषेना ॥ १६० ॥ जेवीं रजस्वलेचें पक्कान्न । उत्तम परी तें अतिहीन । तेवीं अभक्तांचें भजन । कदा जनार्दन स्पर्शेना ॥ ६१ ॥ ज्या भजना नाताळे नारायण । ऐसें जें अभक्तांचें भजन । तेणें भजनें जनार्दन । अणुमात्र जाण तोषेना ॥ ६२ ॥ एवं भक्तभक्तजनमार्ग । दावूनि अधिकाराचे भाग । आतां समूळ पूजामार्ग । सांग श्रीकृष्ण सांगत ॥ ६३ ॥

शुचिः सम्भृतसम्भार प्राग्दर्भैः कल्पितासनः । आसीनः प्रागुदग्वाऽर्चेदर्चायामथ संमुखः ॥ १९ ॥

भावाच्या आनंदानें मी सुखी होतों. १५० त्रैलोक्याला सुखी करणारा जो मी, त्या मलाहि भाविक भक्तांचें जल सेवन करून संतोष होतो. ५१ त्या जलबिंदूपुढें मला सुंदर रमाहि आवडत नाहीं. माझ्या पोटीं जन्मलेला ब्रह्मदेवहि त्या जलापुढें गौण वाटतो. ५२ भाविकांच्या जलबिंदूपुढें मला वैकुंठहि फिकें वाटतें. शेषशायीच्या अंगावर निजण्याचें महत्त्वहि त्यापुढें कमी वाटूं लागतें. ५३ भाविकांच्या उदकापुढें मला दुसरें कांहींहि आवडत नाहीं. त्यांतहि गंध-पुष्पयुक्त पूजा व मिष्टान्नाचा नैवेद्य असला कीं, ५४ मग त्या पूजेच्या सुखाला त्रिभुवनांत उपमाच नाहीं. असा भाविकांच्या भक्तीनें मी श्रीहरि सुखी होतों. ५५ श्रद्धेनें माझी भक्ति केली असतां मी कृतकृत्य होतों. अशा निश्चयानें जो माझी भक्ति करितो, त्यांच्या नुस्त्या पाण्याच्या थेंबानेंहि मी संतुष्ट होतो. ५६ इतर जे दांभिक असतात ते अभक्त होत. त्यांच्या मनांत द्रव्याची इच्छा असते व बाहेरून विरक्ति दाखवितात व लौकिकप्रतिष्ठेपुरतीच ते माझी भक्ति मिरवितात. ५७ अशा अभक्तानें मला छत्र-चामरासह गजान्त लक्ष्मी जरी अर्पण केली, तरी माझ्या मनांत संतोषाचा लेशहि उपजत नाहीं. ५८ राजहंस दूध आणि पाणी यांची निवड करितो; म्हणून त्याला जर कापूस फोडायला दिला, तर तो जसा व्यर्थ आहे, तसा मी हृषीकेश अभक्तांच्या पूजेनें प्रसन्न होत नाहीं. ५९ कावळ्याचें गायन जसें किन्नरासारख्या गवयाला तोषवीत नाहीं, त्याप्रमाणें अभक्तांच्या भजनप्रकारानें मला संतोष होत नाहीं. १६० रजस्वलेचा स्पर्श झालेलें मिष्टान्न उत्तम जरी असलें तरी तें जसें त्याज्य त्याप्रमाणें अभक्तांच्या भजनाला जनार्दन स्पर्शहि करीत नाहीं. ६१ ज्या भजनाला नारायण स्पर्श करीत नाही असें जें अभक्तांचें भजन, त्या भजनानें जनार्दनाला मुळींच संतोष होत नाहीं. ६२ याप्रमाणें भक्त व अभक्त यांच्या भजनाचे मार्ग व अधिकाराचे भेद दाखवून तदनुसार आतां श्रीकृष्ण समूळ पूजामार्ग सांगत आहे. १६३.

याप्रमाणे अधिकारादि व्यवस्था सांगून आतां पूजेचा प्रकार सांगतात—

शुचिः प्राक् सम्भृतसम्भारः दर्भैः कल्पितासनः प्राक् उदक् वा आसीनः अथ संमुखः अर्चायां अर्चेत्— स्नानादिकांनीं पवित्र होऊन, पूजेला आरंभ करण्यापूर्वीं ज्यानें सर्व पूजासाहित्य आपल्या जवळ तयार करून घेतलें आहे. प्रागग्र दर्भांनीं ज्यानें आपलें आसन तयार केलें, अशा पुरुषानें पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करून स्थिर प्रतिमेच्या समोर बसून तिची पूजा करावी. १९.

करूनि मंगळ स्नान आपण । वैदिक तांत्रिक मंत्रस्नान । सारूनि नित्यविधान । शुचित्वपण या नांव ॥ ६४ ॥ मग देवपूजासंभार । शोधूनि करावे पवित्र । यथास्थानीं पूजाप्रकार । गंधादि उपचार ठेवावे ॥ ६५ ॥ श्वेतकंबल चैलाजिन । पूर्वदर्भाग्रीं आसन । पूर्वामुख बैसावें आपण । अथवा जाण उदङ्मुख ॥ ६६ ॥ स्थावरमूर्ति पूजितां देख । आसन करावें मूर्तिसंमुख । हा आसनविधि निर्दोख । पूजान्यासादिक हरि सांगे ॥ ६७ ॥

कृतन्यासः कृतन्यासां मदर्चां पाणिना मृजेत् । कलशं प्रोक्षणीयं च यथावदुपसादयेत् ॥ २० ॥

विधियुक्त घालूनि आसन । गुरूसी करावें नमन । परमगुरु परमेष्ठीसी जाण । अभिवंदन अतिप्रीतीं ॥ ६८ ॥ जो मंत्र प्राप्त आपणास । त्या मंत्राचे देहीं करावे न्यास । मंत्रमूर्ति आणोनि ध्यानास । पूजा मानस करावी ॥ ६९ ॥ जे मूर्ति आली ध्यानासी । तेचि आणावया प्रतिमेसी । हातीं धरोनियां अर्चेसी । करावें न्यासासी प्रतिमाअंगीं ॥ १७० ॥ कलश आणि प्रोक्षणीय जाण । साधावीं यथाविधान । जळें करोनियां पूर्ण । दूर्वादि चंदन द्रव्ययुक्त ॥ ७१ ॥

तदद्भिर्देवयजनं द्रव्याण्यात्मानमेव च । प्रोक्ष्य पात्राणि त्रीण्यद्भिस्तैस्तैर्द्रव्यैश्च साधयेत् ॥ २१ ॥

तें प्रोक्षणपात्रीचें जळ । नखोदक न करूनि निर्मळ । तेणें पूजासंभार सकळ । कुशाग्रें केवळ प्रोक्षावा ॥ ७२ ॥ तेणें प्रोक्षावें देवसदन । आपणासी करावें प्रोक्षण । प्रोक्षोनि देवपूजास्थान । पूजाविधान मांडावें ॥ ७३ ॥ पाद्य-अर्घ्य-आचमनीयें । तदर्थ मांडावीं पात्रत्रयें । जळें पूर्ण करोनि पाहें । भिन्न द्रव्य आहे पात्रत्रयासी ॥ ७४ ॥ श्यामाक दूर्वा अब्ज विष्णुक्रांता । पाद्यपात्रीं हें द्रव्यशुद्धता

आपण स्वतः मंगल स्नान व वैदिक, तांत्रिक मंत्रस्नान करून नित्यकर्म करावें. यालाच शुचिर्भूतपणा म्हणतात. ६४ नंतर देवपूजेचें साहित्य घांसून, पुसून, धुवून निर्मल करावें. गंधपुष्पादि पूजेचें साहित्य जेथल्या तेथें ठराविक जागीं ठेवावें. ६५ पांढरी घोंगडी (किंवा लोंकरीचें वस्त्र) चैल, हरिणाचें कातडें व पूर्वाभिमुखदर्भाग्र यांचें आसन घालून त्यांवर पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करून बसावें. ६६ स्थावर मूर्तीचें पूजन करतेवेळीं मूर्तीच्या समोर आसन करावें. हा निर्दोष आसनविधि झाला. आतां पूजान्यासादिक हरि सांगत आहे. १६७.

कृतन्यासः कृतन्यासां मदर्चां पाणिना आमृजेत्—त्यानंतर सर्व पूज्य माणसांना नमस्कार करून शास्त्रोपदेशाप्रमाणें स्वतःच्या मूलमंत्रानें देवतांचा न्यास करून, मूलमंत्रानेंच जिच्यामध्यें न्यास केला आहे, अशा माझ्या प्रतिमेला निर्माल्य काढणें इत्यादिकांच्या योगानें धुवून स्वच्छ करावें. कलशं प्रोक्षणीयं च यथावत् उपसादयेत्—पूर्ण कुंभ व प्रोक्षणार्थ असलेलें उदकपात्र यांना यथाशास्त्र चंदन-पुष्पादिकांनीं संस्कार करावा.

विधियुक्त आसन घालून गुरूला नमस्कार करावा. नंतर परम गुरु जो प्रजापति त्यांसहि प्रेमानें वंदन करावें. ६८ आपल्याला जो मंत्र मिळाला असेल, त्यानें देहावर न्यास करावेत. मंत्राच्या मूर्तीचें ध्यान करून मानस-पूजा करावी. ६९ ज्या मूर्तीचें ध्यान धरिलें असेल, तिनें प्रतिमेंत येण्यासाठीं प्रतिमा हातांत घेऊन तिच्या अंगावर न्यास करावेत. १७० कलश आणि पंचपात्री जलानें भरून यथाविधि प्रोक्षण करून तीं दुर्वा, चंदन इत्यादि पूजाद्रव्यांनीं युक्त करावीं. १७१.

तत् अद्भिः देवयजनं द्रव्याणि आत्मानं एव च प्रोक्ष्य त्रीणि पात्राणि अद्भिः (पूरितानि) तैः तैः द्रव्यैः च साधयेत्—त्या प्रोक्षणीय जलानें देवाचें पूजास्थान द्रव्य व स्वशरीर यांचें प्रोक्षण करून पाद्य, अर्घ्य व आचमन यांसाठीं असलेलीं तीन्हीं पात्रें कलशोदकांनीं भरावीं व चंदन पुष्पादि द्रव्यांनीं त्यांना संस्कार करावा. २१.

त्या भांड्यातील जल आंत बोट न घालितां निर्मल ठेवावें. त्या जलानें पूजेच्या सगळ्या साहित्याचें दर्भाच्या अग्रानें प्रोक्षण करावें ७२ त्यानें देवघर, स्वतः आपण व देव्हारा यांचें प्रोक्षण करावें व पूजाविधान मांडावें. पाद्य-अर्घ्य-आचमन यासाठीं तीन पात्रें मांडावीं. ७३ तीं जलानें पूर्ण भरावीं त्या तिन्हीं पात्रांतील द्रव्य भिन्नभिन्न असतें. ७४ सांवे, दुर्वा, कमल, अपराजिता नांवाची वेल ही पाद्यपात्रातील शुद्ध द्रव्यें आहेत. गंध, पुष्प, फल, अक्षता

गंध पुष्प फल अक्षता । एवं कुशाग्रता अर्घ्यपात्रीं ॥ ७५ ॥ एळा वाळा जातीफळ । लवंग कर्पूर कंकाळ आचमनपात्रीं हा द्रव्यमेळ । शुद्ध जळ समायुक्त ॥ ७६ ॥

पाद्यार्घ्याचमनीयार्थं त्रीणि पात्राणि देशिकः । हृदा शीर्ष्णाऽथ शिखया गायत्र्या चाभिमन्त्रयेत् ॥ २२ ॥

गुरुमंत्रदीक्षा जैसी ज्यासी । तोचि निजमार्ग शिष्यासी । तेणें पाद्यादि तिहीं पात्रांसी । संप्रदायेंसीं मांडावें ॥ ७७ ॥ पाद्य द्यावें हृदयमंत्रें । अर्घ्य अर्पावें शिरोमंत्रें । आचमन द्यावें शिखामंत्रें । गुरुसंस्कारें आगमोक्त ॥ ७८ ॥ तेंचि तिनी पात्रें जाण । गायत्रीमंत्रें आपण । अभिमंत्रोनियां पूर्ण । देवार्पण करावीं ॥ ७९ ॥ गुरुसंप्रदायें नेटक । यालागीं त्यातें देशिक । स्वयें बोलिला यदुनायक । दीक्षाविवेक निजद्रष्टा ॥ १८० ॥ आगमशास्त्रींचा निजमार्ग । भूतशुद्धि प्राणप्रतिष्ठायोग । तेणें अन्वयें श्रीरंग । श्लोकार्थ साङ्ग सांगत ॥ ८१ ॥

पिण्डे माय्वग्निसंशुद्धे हृत्पद्मस्थां परां मम । अण्वीं जीवकलां ध्यायेन्नादान्ते सिद्धभाविताम् ॥ २३ ॥

वायुबीजें आवाहूनी । पिंगला प्राण पूरूनी । तोचि कुंभकें स्तंभूनी । मात्राधारणीं धरावा ॥ ८२ ॥ वायु जो धारणा धरावा । तो जंव फुटेना अव्हासव्हा । तंवाचिवरी निरोधावा । मग रेचावा शनैःशनैः ॥ ८३ ॥ ऐसें करितां प्राणधारण । स्वयें कल्पावें शरीरशोषण । शरीर शोषलें मानूनि जाण । देहदहन मांडावें ॥ ८४ ॥ आधारास्थित जो अग्नी । तो अग्निबीजें चेतवूनी । तो देह लावूनि दहनीं । भस्म

व दर्भाचीं अग्रें ही अर्घ्यपात्रांतील व ७५ वेलदोडा, वाळा, जायफळ, लवंग, कापुर, कंकोळ, हीं शुद्ध जलानें युक्त अशा आचमनपात्रांतील द्रव्यें आहेत. १७६.

पाद्यार्घ्याचमनीयार्थं त्रीणि पात्राणि देशिकः हृदा शीर्ष्णा अथ शिखया गायत्र्या च अभिमंत्रयेत्—पाद्य, अर्घ्य व आचमनीय यांसाठीं असलेलीं तीन पात्रें पूजकानें हृदय, शीर्ष व शिखा या मंत्रांनीं व गायत्रीनें अभिमंत्रित करावी. [पाद्यामध्यें सावें, दूर्वा, कमल, विष्णुक्रान्तादि पुष्पें घालावीं, कारण गंध, पुष्प, अक्षता, यव, कुशाग्र, तिल, मोहरी, दूर्वा हीं आठ क्रमानें अर्घ्य द्रव्यें सांगितलीं आहेत. त्याचप्रमाणें जाई, लवंग व कंकोळ यांनी आचमनीय सांगितलेलें आहे.] २२.

जशी ज्याची गुरुमंत्राची दीक्षा असेल, तसाच त्या शिष्याचा मार्ग असतो. त्यानें आपल्या संप्रदायाप्रमाणें तिन्हीं पात्रें मांडावींत ७७ गुरुसंस्काराप्रमाणें शास्त्रोक्त हृदयाचा मंत्र म्हणून पाद्य द्यावें. मस्तकाच्या मंत्रानें अर्घ्य द्यावें. शिखामंत्राने आचमन द्यावें. ७८ तीं तीन्हीं पात्रें गायत्री मंत्रानें आपण अभिमंत्रून ईश्वरार्पण करावीं. ७९ गुरुसंप्रदायानें संस्कारसंपन्न असल्यामुळें दीक्षेचा विवेक जाणणाऱ्या आत्मद्रष्ट्या श्रीकृष्णानें स्वतः त्याला 'देशिक' असें म्हटलें आहे. १८० आतां आगमशास्त्राचा मार्ग, भूतशुद्धि, प्राणप्रतिष्ठेचा योग यांविषयीं श्रीकृष्ण पुढील श्लोकांत सांगत आहे. १८१.

वाय्वग्निसंशुद्धे पिण्डे हृत्पद्मस्थां परां अण्वीं नादान्ते सिद्धभावितां मम जीवकलां ध्यायेत्—त्यानंतर कोठ्यांतील वायूनें शोषून टाकिलेल्या, आधारचक्रांतील अग्नीनें जाळिलेल्या व पुनरपि ललाटस्थ चंद्रमंडलांतील अमृतवृष्टीनें अमृतमय झालेल्या देहांतील हृदयकमलस्थ श्रेष्ठ, सूक्ष्म, प्रणवाच्या अकार उकार, मकार, बिंदु व नाद अशा पांच अंशांतील शेवटच्या नादाच्या अंतीं सिद्धानें ध्यान केलेल्या माझ्या जीवकलेचें म्ह० श्रीनारायण मूर्तीचें ध्यान करावें. [याविषयीं 'यो वेदादौ स्वरप्रोक्तः०' इत्यादि श्रुति प्रमाण आहे.] २३.

वायुबीजानें आवाहन करून पिंगला नाडीनें प्राण पूर्ण करून त्याला कुंभकानें आंवरून मात्राधारणेनें धरावा. ८२ कोंडून धरावयाचा वायु जोंवर भलत्याच मार्गानें जाणार नाहीं, तोंवरच धरून ठेवावा आणि हळूहळू बाहेर सोडावा. ८३ असा प्राणायाम करून आपलें शरीर क्षीण झालें आहे, अशी आपणच कल्पना करावी. शरीर कृश झाल्याची समजूत करून घेऊन त्याचें दहन करूं लागावें. ८४ आधारचक्रांतील अग्नीला मंत्रानें

मानूनी निजदेह ॥ ८५ ॥ देह दहनें अतिसंतप्त । तेथ चंद्रबीजें चंद्रामृत । आणोनि निववावें समस्त । नवा देह तेथ कल्पावा ॥ ८६ ॥ देह कल्पावा जो एथ । पूर्ण पाटवें इंद्रिययुक्त । त्याच्या हृदयपद्माआंत । अण्वी जीवकळा तेथ पहावी माझी ॥ ८७ ॥ माझी जीवकळा परम । सूक्ष्माहूनि अतिसूक्ष्म । यालागीं अण्वी तिचें नाम । विश्रामधाम जगाचें ॥ ८८ ॥ अकार उकार मकारस्थिती । यांतें प्रकाशे अण्वी जीवज्योती । ते तंव शब्दाहूनि परती । योगीं नादांतीं लक्षिजे ॥ ८९ ॥ ते देहीं सबाह्य परिपूर्ण । असोनि सूक्ष्मत्वें अलक्ष्य जाण । तीतें हृत्पद्मीं योगिजन । लक्षिती आसनप्राणायामें ॥ १९० ॥ ते अण्वी जीवकळा अव्यक्त । तीतें करोनियां व्यक्त । योगी निजभावयुक्त । हृदयीं चिंतित महामूर्ती ॥ ९१ ॥ नाना जीवसमूह जाण । त्याचें जें आयतन स्थान । ते महामूर्ति श्रीनारायण । हृदयीं सज्जन चिंतिती ॥ ९२ ॥

तयाऽऽत्मभूतया पिण्डे व्याप्ते संपूज्य तन्मयः । आवाह्यार्चादिषु स्थाप्य न्यस्ताङ्गं मां प्रपूजयेत् ॥ २४ ॥

जेवीं गृह प्रकाशी दीपस्थिती । तेवीं देह प्रकाशी जीवज्योती । ते सांगोपांग माझी मूर्ती । हृदयीं चिंतिती साकार ॥ ९३ जेवीं तूप तूपपणें थिजलें । तेंचि अवर्ण वर्णव्यक्ती आलें । तेंवीं चैतन्य माझें मुसावलें । लीलाविग्रहें झालें साकार ॥ ९४ ॥ ऐशी ते माझी सगुण मूर्ती । चिन्मात्रतेजें हृदयदीप्ती । तिणें व्यापूनि देहाची स्थिती । चित्तीं निजभक्ती उपजवी ॥ ९५ ॥ देह जड मूढ अचेतन । तेथ मूर्ति प्रगटोनि चिद्घन । अचेतना करोनि सचेतन । करवी निजभजन उल्हासें ॥ ९६ ॥ जेवीं हरणुलीचें सोंग जाण । हरिणीरूपें नाचे आपण । तेवीं भक्तभावें नारायण । भजनपूजन स्वयें कर्ता ॥ ९७ ॥

जागृत करावें. त्यानें देहाला जाळून भस्म केलें, अशी कल्पना करावी. ८५ देह अग्नीनें अत्यंत संतप्त झाला आहे, अशी कल्पना करून चंद्रबीजानें चंद्रांतील अमृत आणून त्याला शांत करावें व नव्या देहाची कल्पना करावी. ८६ हा नवीन कल्पिलेला देह सर्व अवयवांनीं युक्त व सुदृढ असावा. त्याच्या हृदयकमलांत माझी अण्वी म्ह० सूक्ष्म जीवनकला पहावी. ८७ माझी ती श्रेष्ठ जीवनकला सूक्ष्माहूनहि अत्यंत सूक्ष्म आहे, म्हणून तिला अण्वी म्हणतात. तीच सगळ्या जगाचें विश्रांतिस्थान आहे. ८८ अकार, उकार, मकार यांस ही अण्वी जीवज्योतीच प्रकाशित करिते. ती शब्दाहूनहि पर असल्यामुळें सगळें योगी नादाच्या शेवटीं तिला पहातात. ८९ देहामध्यें तीच अंतर्बाह्य परिपूर्ण भरलेली असून ती सूक्ष्म असल्यामुळें दिसत नाहीं. योगी तिलाच आसन प्राणायामादिकांच्या योगानें हृदयकमलांत पहातात. १९० ती अण्वी जीवनकला अदृश्य असते. योगी तिला आत्मनिष्ठेनें व्यक्त करितात व तिच्या महामूर्तीचें हृदयांत चिंतन करितात ९१ नारा म्ह० जीवसमूह. त्याचें जें अयन म्ह० स्थान त्या महामूर्ति नारायणाचें सज्जन हृदयांत चिंतन करितात. १९२.

तया आत्मभूतया पिण्डे व्याप्ते संपूज्य तन्मयः सन् अर्चादिषु आवाह्य स्थाप्य न्यस्ताङ्गं मां प्रपूजयेत्
दीपप्रभेनें जसें घर व्यापून जातें, तशा आत्मभावनेनें चिंतिलेल्या जीवकलेनें अमृतमय पिंडाला व्यापिलें असतां त्यांत अगोदर मानसोपचारांनीं पूजा करून तन्मय होऊन प्रतिमादिकांमध्यें आवाहन करून, स्थापनमुद्रेनें स्थापना करून ज्याच्या अंगामध्यें मंत्रोपन्यास केला आहे, अशा माझें पूजन करावें. २४.

दीप जसा गृहाला प्रकाशित करितो तशी जीवज्योति शरीराला प्रकाशित करिते. त्या माझ्या सांगोपांग साकार मूर्तीचें हृदयांत चिंतन करावें. ९३ तूप एकदां थिजलें म्हणजे तें मूळचें रंगरहित असूनहि त्याला जसा रंग व आकार प्राप्त होतो, त्याचप्रमाणें माझेंच चैतन्य गोठून लीलाशरीरानें साकार बनतें. ९४ अशी जी माझी सगुणमूर्ति ती ज्ञानरूपी तेजानें हृदयांत प्रकाशते. तीच सगळ्या देहाला व्यापून मनांत भक्ति उत्पन्न करिते. ९५ जड, मूढ, अचेतन देहामध्यें ज्ञानस्वरूप मूर्ति प्रकट होते व त्या अचेतनाला सजीव करून आपलें भजन मोठ्या उल्हासानें करविते. ९६ हरणाचें सोंग घेतलें म्हणजे तें जसें हरणाच्या रूपानेंच नाचत असतें, त्याप्रमाणें भक्ताच्या रूपानें भजन करणारा स्वतः नारायणच आहे. ९७ याप्रमाणें अभेदभावानें चिद्घन मूर्तीचें पूजन केलें असतां पूज्य

यापरी अभेदभजन । मूर्ति पूजितां चिद्घन । पूज्य पूजक हे आठवण । सहजें जाण मावळे ॥ ९८ ॥ माव-
ळल्या हा भजनभेद । उल्हासे भक्तीचा अभेदबोध । हा गुरुमार्ग अतिशुद्ध । प्रिय प्रसिद्ध मजलागीं ॥ ९९ ॥
जेथ माझी अभेदभक्ती । तेथ मी सर्वस्वें श्रीपती । आतुडलों भक्तांच्या हातीं । स्वानंदप्रीतीं उल्हासें ॥२००॥
जेवीं कां अफाट मेघजळा । धरण बांधोनि घालिजे तळां । तेवीं मज अनंता एकबळा । अभेद भजनाला
आतुडे ॥ १ ॥ आडवीं वर्षलें सैरा जळ । तेणें नुपजेचि उत्तम फळ । तेंचि तळां भरलिया प्रबळ । तेणें
पिकती केवळ राजागरें ॥ २ ॥ तैसें माझें स्वरूप वाडेंकोडें । अभेदभक्तीमाजीं आतुडे । तैं ब्रह्मानंदें
गोंधळ पडे । शीग चढे भक्तीची ॥ ३ ॥ अभेदभक्ताच्या द्वारापाशीं । तीर्थें येती पवित्र व्हावयासी ।
सुरनर लागती पायांसी । मी हृषीकेशी त्यांमाजीं ॥ ४ ॥ अभेदभक्तांपाशीं देख । सकळ तीर्थें होतीं
निर्दोख । भक्तीचें माहेर तें आवश्यक । मजही सुख त्यांचेनी ॥ ५ ॥ अभेद जे क्रियास्थिती । या
नांव माझी उत्तम भक्ती । ऐसा अतिउल्हासें श्रीपती । उद्धवाप्रती बोलत ॥ ६ ॥ अभेदभक्ती वाडेंकोडें ।
श्रीकृष्ण सांगे उद्धवापुढें । कथा राहिली येरीकडे । तेंही धडफुडें स्मरेना ॥ ७ ॥ देव विसरला
निरूपण । तंव उद्धवासी बाणली खूण । तोही विसरला उद्धवपण । कृष्णा कृष्णपण नाठवे ॥ ८ ॥
अभेदभजनाचा हरिख । देव भक्त झाले एक । दोघां पडोनि ठेलें ठक । परम सुख पावले ॥ ९ ॥
उद्धव निजबोधें परिपूर्ण तरी पूजाविधानप्रश्न । एथ करावया काय कारण । ऐशी आशंका मन कल्पील
॥ २१० ॥ तरी उद्धवाच्या चित्तीं । उगा राहतांचि श्रीपती । जाईल निजधामाप्रती । यालागीं प्रश्नोक्ती
तो पुसे ॥ ११ ॥ उपासनाकांडगुह्यज्ञान । आगमोक्तपूजाविधान । उद्धवमिषें श्रीकृष्ण । वेदार्थ आपण
स्वयें बोले ॥ १२ ॥ सकळ वेदार्थ शास्त्रविधि । ग्रंथीं श्रीकृष्ण प्रतिपादी । जैसी श्रद्धा तैसी सिद्धी ।
व्हावया त्रिशुद्धी साधकां ॥ १३ ॥ असो हे ग्रंथव्युत्पत्ती । ऐकतां अद्वैतभक्ती । उद्धव निवाला

पूजक ही आठवण सहजच नाहींशी होते. ९८ हा भेद मावळला, म्हणजे भक्तीचा अभेदभाव वाढत जातो. हाच अत्यंत शुद्ध, प्रसिद्ध व मला प्रिय असा गुरुमार्ग आहे. ९९ जेथें माझी अभेदभक्ति असते, तेथें मी श्रीपति स्वानंदप्रेमाच्या उल्हासानें सर्वस्वी भक्तांच्या स्वाधीन होतों. २०० अपार पावसाच्या पाण्याला धरण बांधून जसें तळें करावें, त्याप्रमाणें अभेदभजनात मज अनंताचें ऐक्य सांपडतें. १ रानांत अपार पाऊस पडला तर त्याचा कांहीं पीकाला उपयोग होत नाहीं, पण तेंच जल जर तळ्यांत सांठविलें तर त्यानें उत्तम तांदुळाचें पीक येतें. २ तसें माझें स्वरूप सप्रेम अभेद भक्तीमध्यें जेव्हां सांपडतें, तेव्हां ब्रह्मानंदाला ऊत येऊन भक्तीचा पूर वाहूं लागतो. ३ अभेद भक्तीच्या म्ह० ऐक्यभावानें तन्मय होऊन माझें पूजन करणाराच्या दारांत तीर्थें पवित्र होण्यासाठीं येतात. देव व मानव त्याच्या पायां पडतात. मी भगवान् त्याच्यापाशींच असतों. ४ अभेदभक्ताजवळ सगळीं तीर्थें निर्दोष होतात. तें भक्तीचें मांहेरघरच आहे. मलाहि त्याच्यापासून सुख होतें. ५ जी अभेदक्रिया तिलाच माझी भक्ति म्हणतात, असें श्रीपति अत्यंत उल्हासानें उद्धवाला म्हणाला. ६ अभेदभक्तीची आवड श्रीकृष्ण उद्धवाला सांगत असतां कथा एकीकडेच राहिली. तिचीहि त्याला बरोबर आठवण राहिली नाहीं. ७ देव निरूपण विसरला. तेव्हां उद्धवाला ती खूण पटली व तोहि आपला उद्धवपणा विसरला. कृष्णाला कृष्णपणा आठवेना. ८ अभेदभेदाच्या आनंदानें देव व भक्त एक झाले. दोघेहि स्तब्ध होऊन राहिले व परम सुखी झाले. ८ उद्धव जर आत्मबोधानें इतका परिपूर्ण होता तर मग त्याला पूजाविधानाचा प्रश्न करण्याचें काय कारण ! अशी कोणाच्या मनांत शंका उद्भवेल. २१० (तर याचें कारण असें-) उद्धवाला वाटलें कीं, मीं गप्प बसतांच श्रीकृष्ण निजधामाला निघून जाईल, म्हणून तो प्रश्न विचारूं लागला. ११ श्रीकृष्णानें उद्धवाच्या निमित्तानें उपासनाकांडांतील गुप्तज्ञान व शास्त्रोक्त पूजेचा प्रकार हा वेदार्थ स्वतः सांगितला. १२ साधकाची जशी श्रद्धा असेल तशी त्याला सिद्धि प्राप्त होण्यासाठीं सगळा वेदार्थ-शास्त्रविधि या ग्रंथांत श्रीकृष्णानें सांगितला. १३ पण हा ग्रंथांतील विषय राहो. अद्वैतभक्तीचें वर्णन ऐकून उद्धवाचें

निजचित्तीं । तेणें श्रीपति सुखावला ॥ १४ ॥ तेणें संतोषें म्हणे श्रीकृष्ण । उद्धवा होईं सावधान । पुढील पूजाविधान । तुज मी सांगेन यथोक्त ॥ १५ ॥ पूज्य पूजक एकात्मता ध्यान । करोनियां दृढ धारण । तेंचि बाह्य पूजेलागीं जाण । करावें आवाहन प्रतिमेमाजीं ॥ १६ ॥ प्रतिमेसंमुख आपण । आवाहनमुद्रा दाखवून । माझी चित्कळा संपूर्ण । प्रतिमेसीं जाण भावावी ॥ १७ ॥ तेव्हां मूर्तीचे जडपण । निःशेष न देखावें आपण । मूर्ति भावावी चैतन्यघन । मुख्य आवाहन या नांव ॥ १८ ॥ गुरुमुखें मंत्र निर्दोष । तेणें मंत्रें मूर्तीसी न्यास । करावे सर्वांगीं सावकाश । शास्त्रविन्यास आगमोक्त ॥ १९ ॥ एवं आवाहन संस्थापन । सन्निधि सन्निरोधन । सुमुखीकरण स्वागतन । या मुद्रा आपण दावाव्या ॥ २२० ॥ अवगुंठन संकलीकरण । या अष्टौ मुद्रा दावूनि जाण । मग होऊनि सावधान । पूजाविधान मांडावें ॥ २१ ॥

पाद्योपस्पर्शार्हणादीनुपचारान्प्रकल्पयेत् । धर्मादिभिश्च नवभिः कल्पयित्वाऽऽसनं मम ॥ २५ ॥

पद्ममष्टदलं तत्र कर्णिकाकेसरोज्ज्वलम् । उभाभ्यां वेदतन्त्राभ्यां मह्यं तूभयसिद्धये ॥ २६ ॥

स्नानमंडप कल्पूनि जाण । तेथ आणावा देव चिद्घन । पाद्य अर्घ्य आचमन । मधुपर्कविधान करावें ॥ २२ ॥ अभ्यंग अंगमर्दन । पुरुषसूक्तें यथोक्तें स्नान । पीतांबरपरिधान । स्नानमंडपीं जाण देवासी ॥ २३ ॥ इतर यथोक्त पूजन । करावें सिंहासनी संपूर्ण । तें आसन पीठावरण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ २४ ॥ सिंहासनीं आवरणक्रम । आधारप्रकृति कूर्म क्षेम । क्षीराब्धि श्वेतद्वीप कल्पद्रुम । मनो-

---

मन शांत झालें. तें पाहून श्रीपतीला आनंद वाटला. १४ त्या आनंदाच्या भरांत श्रीकृष्ण म्हणाला कीं, उद्धवा ! लक्ष दे. मी आतां तुला पुढील पूजाविधान यथार्थ सांगतों. १५ पूज्य व पूजक यांच्या एकात्मतेचें दृढ ध्यान धरून त्याचेंच बाह्य पूजेसाठीं प्रतिमेंत आवाहन करावें. १६ प्रतिमेच्या पुढें बसावें. आवाहन मुद्रा दाखवून माझी सगळी चित्कला त्या प्रतिमेंत आहे, अशी भावना करावी. १७ त्या वेळीं मूर्तीचा जडपणा मनांतहि आणूं नये. मूर्ति चैतन्यरूप आहे, असें समजावें. याचेंच नांव आवाहन. १८ गुरूच्या मुखानें कोणताहि मंत्र निर्दोष होतो; त्या मंत्रानें मूर्तीच्या सर्वांगावर न्यास व आगमोक्त शास्त्रविन्यास करावेत. १९ अशा प्रकारें आवाहन, प्रतिष्ठा, सान्निधि, सन्निरोधन, सुमुखीकरण, स्वागतन, २० अवगुंठन व संकलीकरण या आठ मुद्रा दाखवून नंतर सावधान चित्तानें पूजा आरंभावी. २२१.

—कसें पूजन करावें तें पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

धर्मादिभिः नवभिः मम आसनं कल्पयित्वा—धर्मादि नऊ पदार्थांनीं माझें आसन कल्पून, तत्र कर्णिकाकेसरोज्ज्वलं पद्मं कल्पयित्वा—त्यांत कर्णिका व केसर यांनीं उज्ज्वल अशा अष्टदल कमलाची कल्पना करून तु उभाभ्यां वेदतन्त्राभ्यां उभयसिद्धये मह्यं पाद्योपस्पर्शार्हणादीन् उपचारान् प्रकल्पयेत्—वेद व तंत्र या दोन्ही प्रकारें ऐहिक व पारलौकिक सिद्धीसाठीं माझें पाद्य, आचमन, अर्घ्य इत्यादि उपचारांनीं पूजन करावें. [धर्म, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य हे चार आग्नेयादि चतुष्कोणांतील आसनपर्यंकाचे पाय आहेत. अधर्म, अज्ञान, आसक्ति व अनैश्वर्य हीं त्या आसनाची पूर्वादि दिशांतील गात्रें आहेत; तीन गुण याच त्या आसनाच्या पट्ट्या आहेत; त्यांत पूर्वादि क्रमानें व मध्यें विमला, उत्कर्षिणी, ज्ञाना, क्रिया, योगा, प्रव्ही, सत्या, ईशाना व अनुग्रहा या नऊ शक्ती आहेत, यांच्या योगानें आसन कल्पावें, असा याचा भावार्थ.] २५-२६.

स्नानमंडपाची कल्पना करून त्यांत चित्स्वरूप देवाला आणावें. त्याला पाद्य, अर्घ्य, आचमन, मधुपर्कविधि करावेत. २२ अभ्यंग, अंगमर्दन करून पुरुषसूक्तानें शास्त्रोक्त स्नान घालावें. त्या स्नानमंडपांतच देवाला पीतांबर नेसवून इतर शास्त्रोक्त पूजन सिंहासनावर करावें. २३ तें आसन व पीठावरील आच्छादन कसें असावें याचें वर्णन आतां श्रीकृष्ण करीत आहे. २४ सिंहासनावर आच्छादन घालण्याचा क्रम असा आहे. आधाराला कूर्म

रम भावावा ॥ २५ ॥ त्या तळीं रत्नमंडप नेटक । त्यामाजीं विचित्र पर्यंक । त्या मंचकाचा विवेक । यदुनायक सांगत ॥ २६ ॥ धर्म ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । तेचि माचवे अतिवर्य । अधर्म अज्ञान अनैश्वर्य । अवैराग्येंसीं पाय गातें चारी ॥ २७ ॥ ईश्वरतत्त्व निजसुत । गुणागुणीं वळोनि तेथ । मंचक विणिला अचुंबित । योगयुक्त महामुद्रा ॥ २८ ॥ त्या मंचकावरी शेषपुटी । शोभे अतिशयेंसीं गोमटी । सहस्रफणीं मणितेज उठी । छत्राकार पृष्ठीं झळकत ॥ २९ ॥ शेषपुटीमाजीं निर्मळ । विकासलें रातोत्पळ । सकर्णिक अष्टदळ । शोभे केवळ मनोहर ॥ २३० ॥ सत्‌शक्ति कमळकंदमूळ । ज्ञाननाळ त्याचें सरळ । प्रकृति अष्टधा जे प्रबळ । तेंचि अष्टदळ कमळाचें ॥ ३१ ॥ ऐसें कमळ अतिसुंदर । षड्विकार तेचि केसर । वैराग्यकर्णिका सधर । मघमघी थोर सुवासें ॥ ३२ ॥ पूर्वादि कमळदळीं जाणा । देवता न्यासाव्या त्या त्या स्थाना । विमळा उत्कर्षिणी आणि ज्ञाना । क्रियाशक्ति जाणा चौथी पैं ॥ ३३ ॥ योग प्रव्ही सत्या ईशाना । कर्णिका योजिजे मध्यस्थाना । कल्पूनि अनुपम रचना । अनुग्रही जाणा स्थापाहा ॥ ३४ ॥ आत्मा अंतरात्मा परमात्मा । हा सन्मुखभाग देवोत्तमा । सत्व रज आणि मोह तमा । पुरुषोत्तमा पृष्ठिभाग ॥ ३५ ॥ ऐशापरी पीठन्यास । आगमोक्त सावकाश । करूनियां हृषीकेश । सिंहासना आणावा ॥ ३६ ॥ छत्र आणि युग्म चामर । नाना वाद्यें जयजयकार । दावूनि पीठ मुद्रा सधर । आसनीं श्रीधर बैसवावा ॥ ३७ ॥ मज सर्वगतासी आवाहन । मज अधिष्ठानासी आसन । मज निर्विकारासी जाण । दाविती आपण विकारमुद्रा ॥ ३८ ॥ मज चिद्रूपालागीं लोचन । निःशब्दा कल्पिती श्रवण । मज विश्वमुखासीं वदन । निमासुरे जाण भाविती ॥ ३९ ॥ मी विश्वांघ्री दों पायीं चालत मज विश्वबाहूसी चारी हात । मज सर्वगतातें एथ । स्थान भावित एकदेशी ॥ २४० ॥ मज निर्विकारासी उपचार । मज विदेहासी अळंकार । सर्वसमाना अरिमित्र । भावना विचित्र भाविती ॥ ४१ ॥

आणि क्षीरसागरस्थ श्वेतद्वीपांतील मनोरम कल्पवृक्ष, यांची भावना करावी. २५ त्याच्या खालीं उत्तम रत्नजडित मंडप व त्यांत रंगींबेरंगी नक्षीदार पलंग कल्पावा. त्या पलंगाचें विवेचन श्रीकृष्ण आतां करीत आहे. २६ धर्म, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य हे त्या पलंगाचे चार श्रेष्ठ खुर; अधर्म, अज्ञान, अनैश्वर्य व अवैराग्य हीं त्यावरील चौकटीची चार आडवी लांकडें; २७ ईश्वरतत्त्वाची दोरी गुणगुणांनीं वळून योगयुक्त महामुद्रेनें तो पलंग मजबूत विणावा. २८ त्या पलंगावर शेषाचें सुंदर वेटाळें शोभत असतें. त्याच्या पाठीमागें छत्राप्रमाणें असलेल्या हजार फणा, त्यांतील मण्यांच्या दिव्य तेजानें झळकत असतात. २९ त्या शेषाच्या वेटाळ्यांत आठ पाकळ्याचें उमललेलें सुंदर तांबडें कमल पानासह शोभतें. २३० सच्छक्ति हेंच त्या कमलाचें मूळ, ज्ञान हाच देंठ, अष्टधा प्रकृति याच त्याच्या आठ पाकळ्या. ३१ अशा त्या अतिशय सुंदर कमलामध्यें षड्विकार हेंच केंसर, त्यांतील सुवास दरवळणारी तीव्र वैराग्य हीच कर्णिका कल्पावी. ३२ वर वर्णिलेल्या या कमलाच्या आठ पाकळ्यांवर त्या त्या देवतेचा न्यास करावा. विमला, उत्कर्षिणी, ज्ञाना आणि चौथी क्रियाशक्ति; ३३ योगी, प्रव्ही, सत्या व ईशाना या देवता कर्णिकेच्या मध्यभागीं योजाव्या. अशी निरुपम रचना कल्पून आपल्या अनुग्रहासाठीं तेथें स्थापना करावी. ३४ आत्मा, अंतरात्मा आणि परमात्मा हा भगवानाचा पुढला भाग आहे व सत्त्व-रज-तम हा त्याचा मागचा भाग होय. ३५ याप्रमाणें विस्तीर्ण शास्त्रोक्त पीठन्यास करून देवाधिदेवाला सिंहासनावर बसवावें. ३६ छत्र, दोन चवऱ्या, नानाप्रकारचीं वाद्यें यांच्या जयजयकारयुक्त गजरांत पीठ व मुद्रा दाखवून श्रीकृष्णाला आसनावर बसवावें. ३७ भक्त मज सर्वव्यापकाला आवाहन, अनधिष्ठानाला आसन आणि निर्विकाराला विकारमुद्रा दाखवितात. ३८ मज ज्ञानस्वरूपाला नेत्र, निःशब्दाला श्रोत्र, विश्वतोमुखाला सुंदर मुख अशी कल्पना करितात. ३९ मी विश्वपाद दोन पायांनीं चालतों. मज विश्वबाहूला चार हात व मज सर्वगतास एकदेशी स्थान कल्पितात. २४० मज निर्विकाराला उपचार, विदेहाला अलंकार, सर्वत्र समदर्शी असणारास शत्रु-मित्र, अशी विचित्र भावना करितात,

मज अकर्त्या कर्मबंधन । अजासी जन्मनिधन । नित्यतृप्तासी भोजन । निर्गुणा सगुण भाविती ॥ ४२ ॥ या अवघियांचा अभिप्रावो । उपासनाकांडनिर्वाहो । जैसजैसा भक्तिभावो । तैसा मी देवो तयांसी ॥ ४३ ॥ मी अवाप्तसकळकाम । परी भक्तप्रेमालागीं सकाम । जैसा भक्तांचा मनोधर्म । तैसा पुरुषोत्तम मी तयां ॥ ४४ ॥ भक्त जैसा भावी मातें । मी तैसाचि होयें त्यातें । तो जें जें अर्पी भावार्थें । तें अर्पे माते सहजचि ॥ ४५ ॥ मी सर्वत्र भरलों असें । तेथ जो जेथ मज उद्देशें । भक्त भावार्थें अर्पू बैसे । तें अर्पे अनायासें सहजें मज ॥ ४६ ॥ मी सर्वत्र देवाधिदेव । तैसा प्राणियांचा नव्हे भाव । यालागीं भक्तांचा तेथ सद्भाव । तेथ मी देव सहजेंचि ॥ ४७ ॥ यालागीं वाडेंकोडें । भक्तभावार्थ मज आवडे । भक्तभावाहूनि पुढें । वैकुंठ नावडे क्षीराब्धीही ॥ ४८ ॥ भक्तभावार्थाची भूषणें । अंगीं बाणावया श्रीकृष्णें । म्यां निर्गुणेंही सगुण होणें । भावार्थगुणें भक्तांच्या ॥ ४९ ॥ यालागीं मी अजन्मा जन्म । अकर्मही करीं कर्म । अनामाही धरीं नामें । भक्त मनोधर्में तरावया ॥ २५० ॥ निर्गुणीं लागल्या मन । मनचि होय चैतन्यघन । सगुणीं ठसावल्या मन । साधक श्रीकृष्ण स्वयें होती ॥ ५१ ॥ निर्गुणाचा बोध अटक । यालागीं उपासनाविवेक । सगुणमूर्ति भावूनि देख । तरले साधक अनायासें ॥ ५२ ॥ हे आगमोक्त उपासनाविधी । येणें भोगमोक्ष उभयसिद्धी । साधक पावती त्रिशुद्धी । मी कृपानिधि संतुष्टें ॥ ५३ ॥ तेंचि उपासनाविधिविधान । मागां सांगतां पूजन । देव सिंहासनी बैसल्या पूर्ण । पुढें आवरणपूजा ऐक ॥ ५४ ॥

सुदर्शनं पाञ्चजन्यं गदासीषुधनुर्हलान् । मुसलं कौस्तुभं मालां श्रीवत्सं चानु पूजयेत् ॥ २७ ॥

---

४१ मज अकर्त्याला कर्मबंधन, जन्मरहिताला जन्म-मरण, नित्यतृप्ताला भोजन, निर्गुणाला सगुण अशी कल्पना करितात. ४२ या सर्वांचें तात्पर्य एवढेंच कीं, उपासनाकांडाचा मार्ग चोखाळलेला असावा. जसा ज्याचा भक्तिभाव तसा मी त्यास देव होतों. ४३ मी जरी पूर्णकाम आहें तरी भक्ताच्या प्रेमासाठीं सकाम आहें. भक्ताचा जसा भाव असेल, तसा मी भगवान् त्यास दिसतों. ४४ भक्त माझी जशी भावना करितो, तसा मी त्यास होतों. तो जें कांहीं मला भावार्थानें अर्पण करितो ते मला सहज प्राप्त होतें. ४५ मी सर्वत्र व्यापून राहिलेला आहें. जो ज्या ठिकाणीं मला उद्देशून जें कांहीं अर्पण करितो तें मला येऊन पोंचतें. ४६ मी देवाधिदेव सर्वत्र भरलेला आहें. पण लोक तें जाणत नाहींत, वास्तव ज्याची जशी श्रद्धा असते, त्याला मी देव सहजच तसा होतों. ४७ वास्तव भक्तांचा भक्तिभाव मला अतिशय आवडतो. भक्तांच्या भावापुढें मला वैकुंठ व क्षीरसागरहि आवडत नाहीं. ४८ भक्तांच्या भावार्थाचीं भूषणें स्वीकारण्यासाठीं मी निर्गुण असलेला श्रीकृष्ण सगुण होतों. भक्तांच्या भावार्थासाठीं मी हें रूप घेतों. ४९ म्हणून मी जन्मरहित असून जन्मतों. कर्मरहित असून कर्म करितों. नामरहित असून भक्तांना तारण्यासाठीं नाम धारण करितों. २५० निर्गुणांत मन लागलें असतां मन चैतन्यरूपच होतें व सगुणमूर्ति मनावर ठसली असतां साधक स्वतःच श्रीकृष्ण होतो. ५१ निर्गुणाचें ज्ञान कठिण असल्यामुळें उपासनामार्गाचा विचार सांगितला आहे. सगुण मूर्तीची भक्ति करून कितीतरी साधक अनायासें तरून गेले आहेत. ५२ हा शास्त्रोक्त उपासनाविधि सांगितला. यानें साधकाला भोग व मोक्ष या दोहोंची सिद्धि होते व मी दयाळु श्रीकृष्ण संतुष्ट होतों. ५३ या उपासनाविधींतील देह 'सिंहासनावर बसवावा' येथवर पूजेचा प्रकार सांगितला. आतां पुढल्या आवरण पूजेचा प्रकार ऐक. २५४.

—आतां आयुधादिकांची पूजा सांगतात—

सुदर्शनं०...... श्रीवत्सं च अनु पूजयेत्—सुदर्शन, पांचजन्य, गदा, खड्ग, बाण, धनुष्य, नांगर, मुसळ, कौस्तुभ, माला व श्रीवत्स यांची पूजा करावी. ['न्यस्तांगं' या पूर्वोक्त पदानें आवरण पूजा सूचविली; आसनानेंच शक्त्यावरण सांगितलें. सुदर्शनापासून मुसळापर्यंत आयुधें आठ दिशांमध्यें आणि कौस्तुभमाला व श्रीवत्स हीं उरःस्थलीं कल्पावी. २७.

अणवी जीवकळेसी देहावरण । सिंहासनीं शक्त्यावरण । सुदर्शनादि आयुधावरण । आपुलीं आपण हरी सांगे ॥ ५५ ॥ सतेज धार सुदर्शन । शंख शोभे पांचजन्य । नंदक तो खड्ग जाण । गदा गहन कौमोदकी ॥ ५६ ॥ शार्ङ्ग धनुष्य अतिसबळ । सुवर्णपुंख बाण सरळ । हल आणि मुसळ । आयुधें प्रबळ पूजावीं ॥ ५७ ॥ या आठही भुजा सायुधा सरळा । कंठीं कौस्तुभ वनमाळा । कांसे कशिला पीतांबर पिंवळा । घनश्याम सांवळा शोभत ॥ ५८ ॥ ब्रह्मण्यदेव रमानाथ । ब्राह्मणाचा चरणघात । हृदयीं अळंकार मिरवत । शोभा अद्भुत तेणें शोभे ॥ ५९ ॥ चिद्रत्नांच्या अळंकारीं । गुण काढोनियां बाहेरी । वोविली वैजयंती कुसरी । ते हृदयावरी रुळत ॥ २६० ॥ यापरी साळंकार सायुध । शंखचक्र-पद्मेंसीं अगाध । ऐसा शोभला स्वयंबोध । नारदादि संनिध तिष्ठती सदा ॥ ६१ ॥ यापरी साळंकार सायुध । पूज्य पूजोनियां गोविंद । मग पूजावे पार्षद । ऐक विशद सांगेन ॥ ६२ ॥

नन्दं सुनन्दं गरुडं प्रचण्डं चण्डमेव च । महाबलं बलं चैव कुमुदं कुमुदेक्षणम् ॥ २८ ॥

दुर्गां विनायकं व्यासं विष्वक्सेनं गुरून् सुरान् । स्वे स्वे स्थाने त्वभिमुखान् पूजयेत्प्रोक्षणादिभिः ॥२९॥

नंद सुनंद देवापाशीं । गरुड सदा तिष्ठे दृष्टीसी । चंड प्रचंड दोहीं बाहींसी । अहर्निशीं तिष्ठती ॥ ६३ ॥ बळ आणि महाबळ । सुमुखसंज्ञे अवधानशीळ । कुमुद कुमुदाक्ष केवळ । पाठीसी प्रबळ बळे उभे ॥ ६४ ॥ गरुड दृष्टीं तिष्ठे आपण । येर नंदादि जे अष्टौ जन । ते अष्टौ दिशांप्रति जाण । पार्षदावरण हरिनिकटीं ॥ ६५ ॥

दुर्गा विनायक जाण । व्यास आणि विष्वक्सेन । चहूं कोनी चारी स्थापन । करावें पूजन देवाभिमुख ॥ ६६ ॥ मूळमूर्तीसी अभिन्नाकारू । गुरु आणि परमगुरु । परमेष्ठिगुरूसी एकाकारू । पूजाप्रकारू

सूक्ष्म जीवनकलेवर देहाचें आवरण व सिंहासनावर शक्तींचें आवरण सांगितलें. आतां श्रीकृष्ण आपलीं सुदर्शनादि आयुधावरणें आपणच सांगत आहे. ५५ तीक्ष्ण धारेचें सुदर्शन चक्र; पांचजन्य नांवाचा शोभिवंत शंख; नंदक खड्ग; कौमोदकी प्रचंड गदा; ५६ (शार्ङ्ग नांवाचें) अत्यंत विशाल धनुष्य; सुवर्णमय बुंधाचे सरळ बाण; नांगर, मुसळ या प्रबल आयुधांचें पूजन करावें. ५७ त्याचे आठहि हात आयुधांनीं युक्त असावेत, गळ्यांत कौस्तुभ, वनमाला, कमरेला पिंवळा पीतांबर यानें शोभणारी शामसुंदर सांवळी मूर्ति कल्पावी. ५८ ब्राह्मणाच्या चरण-आघाताची खूण भूषण मानून आपल्या हृदयावर धारण करणारा, ब्राह्मणप्रिय रमानाथ त्यानें विलक्षण शोभतो. ५९ चिद्रत्नांच्या अलंकारांतून गुण बाहेर काढून त्यांत मोठ्या कुशलतेनें ओंवलेली वैजयंतीमाला त्याच्या हृदयावर रुळत असते. २६० याप्रमाणें शंख-चक्र-पद्मासह सालंकार व सायुध असा अगाध स्वयंबोध शोभतो. ६१ नारदादि सदा त्याच्या सन्निध उभे असतात. याप्रमाणें अलंकार व आयुधें यांसह पूज्य गोविंदाचा पूजा करून मग त्याच्या परिवाराची पूजा करावी. तेंहि स्पष्ट सांगतों, ऐक. २६२.

नन्दं०......सुरान्–नंद, सुनंद, प्रचंड, चंड, महाबल, बल, कुमुद, कुमुदेक्षण या पार्षदांची आठ दिशामध्यें व गरुडाची पुढें, दुर्गा, विनायक, व्यास, विष्वक्सेन यांची कोनामध्यें, गुरूंची डाव्या बाजूला व इंद्रादि लोकपालांची पूर्वादि दिशांमध्यें याप्रमाणें स्वे स्वे स्थाने अभिमुखान् प्रोक्षणादिभिः पूजयेत्–या सर्वांची स्व-स्व-स्थानीं देवाच्या संमुख अर्घ्यादिकांनीं पूजा करावी. २८-२९.

देवाजवळ नंद आणि सुनंद हे दोघे सतत असतात. गरुड तर निरंतर त्याच्या समोरच उभा असतो. ६३ चंड व प्रचंड हे दोघे दोन बाजूला रात्रंदिवस उभे असतात. बळ आणि महाबळ समोर उभे राहून आज्ञेंत तत्पर असतात. कुमुद व कुमुदाक्ष पाठीमागें उभे असतात. ६४ गरुड स्वतः सतत डोळ्यापुढेंच उभा असतो व इतर आठजण आठ दिशांत उभे असतात. हें हरिसन्निध पार्षदावरण आहे. २६५.

दुर्गा, विनायक, व्यास आणि विष्वक्सेन या चौघांना चार कोपऱ्यांत स्थापन करून देवाच्या पुढ्यांतच त्यांचेंहि पूजन करावें. ६६ मूळ मूर्तीशीं एकरूप असलेले गुरु व परम गुरु यांचें परमेष्ठी गुरूशीं ऐक्य करून त्यांचें

करावा ॥ ६७ ॥ इंद्रादि अष्टौ लोकपाळ । आव्हानूनियां सकळ । स्थापूनि अष्टौ दिशा केवळ । तेही तत्काळ पूजावे ॥ ६८ ॥ गुरुदुर्गादिक लोकपाळ । पूजावे सांगोपांग सकळ । प्रोक्षणपाद्यादि अविकळ । पूजा निश्चळ करावी ॥ ६९ ॥ तेचि पूजेचे पूजोपचार । कोण कोण पैं प्रकार । तो ये श्लोकी शार्ङ्गधर संक्षेपाकार सांगत ॥ २७० ॥

चन्दनोशीरकर्पूरकुङ्कुमागरुवासितैः । सलिलैः स्नापयेन्मन्त्रैर्नित्यदा विभवे सति ॥ ३० ॥

स्वर्णघर्मानुवाकेन महापुरुषविद्यया । पौरुषेणापि सूक्तेन सामभीराजनादिभिः ॥ ३१ ॥

एळा वाळा कर्पुर । चंदन कुंकुम केशर । त्यांमाजीं मेळवूनि अगर । धूपिलें नीर स्नपनासी ॥ ७१ ॥ सुवासित सकरिकर । गंगाजळ अतिपवित्र । शंखमुद्रापुरस्कर । शंखीं तें [सपूर] भरावें ॥ ७२ ॥ ऐसें जळ घेऊनि शुद्ध । आपस्तंबशाखेचें प्रसिद्ध । सुवर्णघर्मानुवाकपद । तेणें अभिषेक विशद मज करवा ॥ ७३ ॥ अथवा केवळ पूरुषसूक्त । रुद्राभिषेक विष्णुसूक्त । ईहीं मंत्रीं मंत्रोक्त । देवासी यथोक्त स्नान द्यावें ॥ ७४ ॥ कां सामवेदींचें गायन । त्यामाजीं सामनीराजन । तेणें करूनियां जाण । देवासी स्नान करावें ॥ ७५ ॥ असल्या वैभवसंपन्न । नित्य द्यावें हें स्नान । नातरी पूर्वविशेषें जाण । करावें आपण जयंत्यादिकीं ॥ ७६ ॥ आगमोक्त सुलक्षण । महापुरुषविद्या पूर्ण । तेणें करूनि आपण । देवासी स्नान करावें ॥ ७७ ॥ देवासी पूर्ण झालिया स्नान । करावें मंगळनीराजन । मग वस्त्रें अळंकार भूषण । देवासी आपण अर्पावीं ॥ ७८ ॥

पूजन करावें. ६७ तसेंच, इंद्रादि अष्ट लोकपालांचें आवाहन करून त्यांचीहि आठ दिशांत स्थापना करावी. व तत्काल त्यांचीहि पूजा करावी. ६८ गुरु व दुर्गादि लोकपाल यांचीहि प्रोक्षण, पाद्य इत्यादिकांनीं सांगोपांग पूजा करावी. ६९ त्या पूजेचा उपचार व प्रकार पुढील श्लोकांत श्रीकृष्ण संक्षेपानें सांगत आहे. २७०.

—पाद्यादि उपचारांची कल्पना करावी, असें वर सांगितलें आहे. आतां त्यांचाच गुणविधीनें पुढील सहा श्लोकांनीं विस्तार करितात—

विभवे सति नित्यदा चन्दनोशीरकर्पूरकुङ्कुमागरुवासितैः सलिलैः मन्त्रैः स्नापयेत्—सामर्थ्य असल्यास नेहमीं चंदन, वाळा, कापूर, केशर व अगरु यांनीं सुवासिक केलेल्या जलानें मंत्र म्हणून स्नान घालावें (आतां ते मंत्रच सांगतात—) **स्वर्णघर्मानुवाकेन**—' सुवर्णं घर्मं परिवेद वेनं ' इत्यादि अनुवाकानें, **महापुरुष विद्यया**—' जीतं ते पुंडरीकाक्ष, नमस्ते विश्वभावन सुब्रह्मण्य नमस्तेस्तु महापुरुष पूर्वज । या महापुरुषविद्येनें, **पौरुषेण अपि सूक्तेन**—' सहस्रशीर्षा ' इत्यादि पुरुषसूक्तानें व **राजनादिभिः सामभिः**—राजनादि सामांनीं स्नान घालावें. [इंद्रं नरो नेमधिता हवन्तेः० .' या ऋचेमध्यें गाइलेल्या व रौहिणादि सामांनीं] ३०–३१.

वेलदोडे, वाळा, कापूर, चंदन, कुंकुम, केशर त्यांत अगरू मिळवून सुवासिक केलेलें जल स्नानाला द्यावें. ७१ सुवासिक अत्यंत पवित्र जल शंखाचें मुख पुढें करून त्यांत भरावें. ७२ असें शुद्ध जल घेऊन आपस्तंभ शाखेचा ' सुवर्णं घर्मं परिवेद वेनम् ' हा प्रसिद्ध अनुवाक म्हणावा व त्यानें अभिषेक करावा. ७३ किंवा केवल पुरुषसूक्त, रुद्राभिषेक, विष्णुसूक्त या मंत्रांनीं देवाला मंत्रोक्त स्नान घालावें. ७४ किंवा सामवेदाचें गायन, ' इंद्रं नरो नेमधिता हवंते ' यांचें गायन करीत देवाला स्नान घालावें. वैभवसंपन्न असणारांनीं अशा प्रकारचें स्नान नित्य घालावें. ७५ सामान्य जनांनीं विशेष पर्वकाळीं व जयंतीच्या दिवशीं घालावें, ७६ आगमोक्त महापुरुषविद्या पूर्ण सुलक्षण आहे. तिच्या योगानें आपण स्नान करून देवाला स्नान घालावें, ७७ देवाचें स्नान झाल्यानंतर देवाला मंगलार्ति करावी. नंतर वस्त्रें, अलंकार, भूषणें अर्पण करावींत. २७८.

वस्त्रोपवीताभरणपत्रस्रग्गन्धलेपनैः । अलङ्कुर्वीत सप्रेम मद्भक्तो मां यथोचितम् ॥ ३२ ॥

देवो स्वरूपें घनसांवळा । कांसे कसावा सोनसळा । हेमसूत्र अर्पूनि गळां । रत्नमेखळा बाणावी ॥ ७९ ॥ वांकीअंदुवांचा गजर । चरणीं नूपुरांचा झणत्कार । मुकुटकुंडलें मनोहर । हृदयीं गंभीर महा-पदक ॥ २८० ॥ जडित मोतीलग पत्रवेली । अतिशोभित दिसे निढळीं । तिलक पिंवळा तयातळीं । कंठीं झळाळी कौस्तुभ ॥ ८१ ॥ बाहीं बहुवटे वीरकंकणें । करमुद्रिका रत्नखेवणें । पीतांबर झळके कोणें मानें । रविबिंब तेणें लाजविलें ॥ ८२ ॥ सांवळें अंगी गोमटी । शुभ्र चंदनाची शोभे उटी । सुमनमाळावीरगुंठी । होत घरटी मधुकरां ॥ ८३ ॥ वैजयंती वनमाळा । आपाद रुळे गळां । घवघवीत दिसे डोळां । घनसांवळा शोभत ॥ ८४ ॥ एवं वस्त्रालंकारभूषणीं स्वयें । पूजावा शार्ङ्गपाणी । पूजेहूनियां मनीं । श्रद्धा कोटिगुणीं असावी ॥ ८५ ॥ भक्त असो अतिसंपन्न । अथवा हो कां अतिनिर्धन । जेथ शुद्ध श्रद्धा संपूर्ण । तेथ नारायण संतुष्टे ॥ ८६ ॥ सकळ पूजेचें कारण । मुख्य श्रद्धाचि गा प्रमाण । अत्यंत श्रद्धें जो संपन्न । तो देवाचा पूर्ण पढियंता ॥ ८७ ॥

पाद्यमाचमनीयं च गन्धं सुमनसोऽक्षतान् । धूपदीपोपहार्याणि दद्यान्मे श्रद्धयार्चकः ॥ ३३ ॥

एवं मूर्ति शृंगारिल्या पूर्ण । द्यावें पाद्य अर्घ्य आचमन । देऊनि मधुपर्कविधान । करावें पूजन श्रद्धायुक्त ॥ ८८ ॥ गंधाक्षता शुद्ध सुमन । धूप दशांग दीपदान । दीरावली नीरांजन । श्रद्धा मदर्चन साधकां ॥ ८९ ॥

—वस्त्रादि–उपचारांमध्यें अलंकाररूप गुणाचें विधान करितात—

मद्भक्तः वस्त्रोपवीताभरण-पत्र-स्रक्-गंधलेपनैः सप्रेम मां यथोचितं अलंकुर्वीत–माझ्या भक्तानें वस्त्र, उपवीत, अलंकार, पत्रे म्ह० गाल, वक्षःस्थल इत्यादि स्थानीं वाढलेली रंगाची रचना, माला व गंधाचा लेप-उटी, यांच्या योगानें मला मोठ्या प्रेमानें यथायोग्य रीतीने अलंकृत करावें. ३२.

देवाचा वर्ण घन सांवळा आहे. त्याला पिंवळा पितांबर नेसवावा, गळ्यांत सोन्याचें यज्ञोपवीत घालावें. कमरेला रत्नांची मेखला घालावी. ७९ वाकी इत्यादि बाहुभूषणें, पायांत रुणझण नाद करणारीं नुपुरें, मस्तकावर मुकुट, कानांत कुंडलें, हृदयांवर विशाल महापदक, २८० रत्नजडित मोत्यांचा हार, कपाळावर केशरी तिलक, गळ्यांत झळकणारा कौस्तुभ, ८१ बाहुभूषणें, वीरकंकणें, बोटांत रत्नजडित अंगठ्या, सूर्यालाहि लाजविणारी पीतांबराची कांति, ८२ त्याच्या सांवळ्या देहावर शुभ्र चंदनाची शोभणारी उटी, केंसांच्या झुबक्यांत भ्रमरांनीं घरटीं करावीं अशा पुष्पांच्या माळा, ८३ पायापर्यंत रुळणारी वैजयंती वनमाला, यांनीं शोभणाऱ्या सांवळ्या मूर्तीची वस्त्रालंकारांनीं पूजा करावी. ८४ त्या पूजेपेक्षां कोट्यवधि पटीनें अधिक श्रद्धा असावी. ८५ भक्त अत्यंत संपत्तिमान् असो कीं दरिद्री असो, जेथें शुद्ध व परिपूर्ण श्रद्धा असते तेथे नारायण संतुष्ट होतो. ८६ सगळ्या पूजेंत श्रद्धाच मुख्य प्रमाण आहे. जो श्रद्धावान् असतो तोच देवाला अतिशय आवडतो. २८७.

—'यथायोग्य रीतीनें अलंकृत करावें' असें जें वर म्हटलें आहे त्यासाठीं सर्वसाधारण श्रद्धारूप गुणाचें विधान करितात—

अर्चकः पाद्यं आचमनीयं गंधं सुमनसः अक्षतान् धूप-दीपोपहार्याणि मे श्रद्धया दद्यात्–पूजकानें पाद्य, आचमन, गंध, फुलें, अक्षता, धूप, दीप व नैवेद्य ही मला श्रद्धेनें समर्पण करावीं.

अशाप्रकारें मूर्ति पूर्णपणें शृंगारावी. मग पाद्य, अर्घ्य व आचमन द्यावें. मधुपर्क करून श्रद्धायुक्त पूजा करावी. गंध, अक्षता, सुवासिक फुलें, धूप, दशांग दीपदान, नीरांजन, दीपावली इत्यादि साहित्यानें साधकानें श्रद्धेनें माझें पूजन करावें. २८९.

गुडपायससर्पींषि शष्कुल्याऽपूपमोदकान् । संयावदधिसूपांश्च नैवेद्यं सति कल्पयेत् ॥ ३४ ॥

झाल्या धूप दीप नीरांजन । देवासी वोगरावें भोजन । नानापरींचें पक्वान्न । अन्न सदन्न रसयुक्त ॥ २९० ॥ मांडा साकरमांडा गुळवरी । शष्कुल्या अमृतफळें क्षीरधारी । दुधामाजीं आळिली क्षीरी । वाढिली परी वळिवट ॥ ९१ ॥ मधुवडा कोरवडा । लाडू तिळवयांचा जोडा । रुची आला अंबवडा । ठायापुढां वाढिन्नला ॥ ९२ ॥ पत्रशाकांची प्रभावळी । भात अरुवार जिरेसाळी । शुभ्र सोलींव मुगदाळी । गोघृत परिमळी सद्यस्तप्त ॥ ९३ ॥ सांजा सडीव गुळयुक्त । एळा मिरें घालूनि आंत । पाक केला घृतमिश्रित । सेवितां मुखांत अरुवार ॥ ९४ ॥ कथिका तक्राची गोमटी । आम्ररसें भरली वाटी । शिखरणी केळ्यांची वाढिली ताटीं । देखोनि लाळ घोटी अमरेंद्र ॥ ९५ ॥ दधि दुग्ध साय साकर । नैवेद्या वाढिले परिकर । देव न पाहे उपचार । श्रद्धा श्रीधर तृप्त होय ॥ ९६ ॥ सामर्थ्य असलें करावयासी । तरी हे परवडी प्रतिदिवसीं । नैवेद्य अर्पावें देवासी । नातरीं पर्वविशेषीं अर्पावे ॥ ९७ ॥ उपास्यमूर्ति जे साचार । ते जयंतीस सविस्तर । पर्वविशेषीं उपचार । पूजा अपार हरि सांगे ॥ ९८ ॥

अभ्यङ्गोन्मर्दनादर्शदन्तधावाभिषेचनम् । अन्नाद्यं गीतनृत्यानि पर्वाणि स्युरुतान्वहम् ॥ ३५ ॥

पर्वें बोलिलीं आगमोक्तीं । अथवा वार्षिक पर्वें येती । कां निजमूर्तींची जयंती । ते पूजा श्रीपति स्वयें सांगे ॥ ९९ ॥ दंतधावन उद्वर्तन । मूर्तीसी द्यावें अभ्यंजन । पंचामृतें करूनि स्नान । विचित्राभरण पूजावी ॥ ३०० ॥ पूजोनि साळंकृत देवासी । नैवेद्य अर्पावे षड्रसीं । देऊनि करोद्वर्तनासी ।

—नैवेद्यांत वैभवरूप गुणाचें विधान करितात—

(विभवे) सति गुड-पायस-सर्पींषि शष्कुल्यापूपमोदकान् संयाव-दधि-सूपान् च नैवेद्यं कल्पयेत्—वैभव असल्यास गुळाची खीर, किंवा गूळ, खीर, तूप, अनारसे, लाडू, खिचडी, दही, भाज्या वगैरे तोंडी लावणीं, यांचा नैवेद्य तयार करावा. ३४.

धूप, दीप, नीरांजन ओवाळून देवाला नैवेद्य दाखवावा. नानाप्रकारचीं मिष्टान्नें व अनेक षड्रसांनीं युक्त भोजन वाढावें. २९० मांडा, साखरमांडा, गुरवळी, करंजी, अमृतफळ, बासुंदी, आटीव दुधाची खीर, ९१ घारगे कोरवडा, लाडू, तिळवया, अंबवडा हे पदार्थ एका बाजूला वाढावे. ९२ पालेभाज्या ओळीनें दुसऱ्या बाजूला, बारीक शुभ्र जिरेसाळीची मृद मध्यें, तिच्यावर डोळ काढलेल्या मुगाच्या डाळीचें पिंवळें जर्द वरण व त्यावर गायीचें ताजें साजुक तूप. ९३ वेलदोडा व मिरें घालून केलेला गुळाचा सांजा, पण तो तुपांत परतून चांगल्या पाकांत केलेला असावा. तोंडांत घालतांच खमंग लागावा. ९४ रुचकर ताकाची कढी, वाटी भरून आंबरस, जी पहातांच इंद्राच्या तोंडाला पाणी सुटेल ९५ अशी केळ्याची शिखरण ताटांत वाढावी दहीं, दूध, साय, साखर, अशा अनेक प्रकारच्या पदार्थांचा नैवेद्य दाखवावा. देव उपचाराकडे पहात नाहीं. तो श्रद्धेनेंच तृप्त होतो. ९६ ज्याला सामर्थ्य असेल त्यानें अशा प्रकारचा नैवेद्य देवाला नित्य अर्पण करावा. नाहीं तर विशेष पर्वकाळींच अर्पावा. ९७ आतां उपास्य मूर्तीच्या जयंतीच्या दिवशीं व विशेष पर्वकाळीं करावयाचे पूजेचे अगणित उपचार श्रीहरि सांगत आहे. २९८.

—कालभेदानें गुणाचें विधान करितात—

अभ्यङ्गोन्मर्दनादर्शदन्तधावाभिषेचनं । अन्नाद्यं गीत-नृत्यानि पर्वाणि स्युः उत अन्वहं-अभ्यंग म्ह० तैलादि लावणें, उन्मर्दन म्ह० उटण्यानें अंग रगडणें, आरसा दाखविणें, दांत घांसणें पंचामृत स्नान, भोज्य, भक्ष्य, गीत, नृत्य इत्यादि एकादश्यादि पर्वदिवशीं समर्पण करावें. सामर्थ्य असल्यास रोजहि हे सर्व उपचार समर्पण करावे. ३५.

शास्त्रांत सांगितलेलीं पर्वें किंवा वार्षिक पर्वें किंवा आपल्या उपास्य मूर्तींच्या जयंत्या या दिवसांचा पूजाविधि श्रीहरि स्वतः सांगत आहे. ९९ मूर्तीला दंतधावन, उद्वर्त्तन, अभ्यंजन द्यावें. पंचामृतानें स्नान घालावें आणि नानाप्रकारच्या आभरणांनीं पूजा करावी. ३०० देवाचें अलंकारयुक्त पूजन झाल्यावर षड्रसांचा नैवेद्य

मुखवासासी अर्पावें ॥ १ ॥ देव विसरला देवपणासी । तें देवपण भेटे देवासी । ऐशिया दाखवावें आदर्शासी । तेणें देवदेवासी उल्हासू ॥ २ ॥ पर्वविशेषीं जयंतीसी । मेळवूनि संतवैष्णवांसी । करावें गीतनृत्यकीर्तनासी । अतिप्रेमेंसीं अहोरात्र ॥ ३ ॥ आगमोक्त दीक्षा हवन । करितां तत्काळ देव प्रसन्न । त्या होमाचें विधिविधान । ऐक सावधान उद्धवा ॥ ४ ॥

विधिना विहिते कुण्डे मेखलागर्तवेदिभिः । अग्निमाधाय परितः समूहेत्पाणिनोदितम् ॥ ३६ ॥
परिस्तीर्याथ पर्युक्षेदन्वाधाय यथाविधी । प्रोक्षण्यासाद्य द्रव्याणि प्रोक्ष्याग्नौ भावयेत माम् ॥ ३७ ॥

आगमोक्त कुंडविधान । लांबी रुंदी खोली कोण । गणूनि उंचीचें प्रमाण । कुंड संपूर्ण साधावें ॥ ५ ॥ स्वशाखा जें वेदप्रोक्त । मेखळायुक्त साधावी गर्त । योनी सकट वेदी तेथ । लक्षणोक्त साधावी ॥६॥ तेथ करूनि आवाहन । प्रतिष्ठिला जो हुताशन । त्यासी करूनि करस्पर्शन । परिसमूहन करावें ॥ ७ ॥ दर्भीं करावें परिस्तरण । मग करावें पर्युक्षण । इध्माबर्हिविसर्जन । त्रिसंधान ठेवावें ॥ ८ ॥ करूनि बर्हीचें आस्तरण । करावें आज्यस्थालीस्थापन । व्याहृतीं समिधाहोम जाण । अन्वाधान त्या नांव ॥ ९ ॥ प्रोक्षणीपात्रींचें विधान । करूनि भरावें जळ पूर्ण । तेणें कुशाग्रजळें आपण । होमद्रव्यें जाण प्रोक्षावीं ॥ ३१० ॥ कुंडीं प्रदिप्त हुताशन । तेथ करावें माझें ध्यान । तें ध्यानमूर्तीचें लक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ११ ॥

तप्तजाम्बूनदप्रख्यं शङ्खचक्रगदाम्बुजैः । लसच्चतुर्भुजं शान्तं पद्मकिञ्जल्कवाससम् ॥ ३८ ॥
स्फुरत्किरीटकटककटिसूत्रवराङ्गदम् । श्रीवत्सवक्षसं भ्राजत्कौस्तुभं वनमालिनम् ॥ ३९ ॥

अर्पण करावा. १ हात धुण्यास सुवासिक पाणी द्यावें. नंतर मुखशुद्धीला विडा अर्पावा. देव आपलें देवपण विसरला होता, तें त्याला परत भेटलें असें आरशांतून त्याला दाखवावें म्हणजे देवाधिदेवाला आनंद होतो. २ पर्वकाळीं व जयंतीला संत विष्णुभक्तांना जमवून रात्रभर प्रेमानें गायन, नृत्य, कीर्तन करावें. ३ शास्त्रोक्त दीक्षा घेऊन हवन केलें असतां देव तत्काल प्रसन्न होतो. त्या होमाचें विधान, हे उद्धवा ! लक्षपूर्वक ऐक, ३०४.

—आतां अधिक फळाची इच्छा करणाऱ्या पुरुषाच्या अग्नींतील पूजेचा प्रकार सांगतात—

विधिना मेखलागर्तवेदिभिः विहिते कुण्डे उदितं अग्निं आधाय पाणिना परितः समूहेत्–स्वगृह्योक्त प्रकारानें मेखला, गर्त व वेदी यांनीं उपलक्षित, अशा केलेल्या कुंडामध्यें प्रज्वलित अग्नीचें आधान करून हातानें त्याचें सभोंवार एकत्र मीलन करावें. अथ परिस्तीर्य पर्युक्षेत्–दर्भांनीं परिस्तरणें घालून सर्वतः प्रोक्षण करावें. यथाविधि अन्वाधाय–यथाशास्त्र व्याहृतींनीं समित्प्रक्षेपणादिरूप अन्वाधाननामक कर्म करून, द्रव्याणि आसाद्य प्रोक्ष्य अग्नौ मां भावयेत–अग्नीच्या उत्तरेला होमोपयोगीं द्रव्यें ठेवून प्रोक्षणीपात्रांतील उदकानें प्रोक्षण करून अग्नीमध्यें माझें ध्यान करावें. ३६–३७.

शास्त्रोक्त विधानाप्रमाणें यज्ञकुंडाची लांबी, रुंदी खोली, कोपरे यांचें प्रमाणयुक्त कुंड तयार करावें. ५ आपल्या शाखेच्या वेदांत सांगितल्याप्रमाणें मेखला, गर्त, योनी व वेदी यांनीं युक्त असलेलें प्रमाणशीर कुंड घालावें. ६ तेथें अग्नीची प्रतिष्ठा करून त्या अग्नीला हातानें स्पर्श करून त्याच्या भोंवतीं तीन वेळां ओला हात फिरवावा. ७ त्याच्या सभोंवार चारी दिशांत चार चार दर्भ टाकावे. नंतर सभोंवार जल शिंपावें व इध्मा, बर्हि व विसर्जन या तीहींचें त्रिसंधान ठेवावें. ८ दर्भांचें आस्तरण घालून त्यावर आज्यस्थाली स्थापावी. व्याहृतींनीं समिधा-होम करणें यालाच अन्वाधान म्हणतात. ९ प्रोक्षणीपात्राचा विधि करून त्यांत जल भरावें व त्या जलांत दर्भांचें अग्र बुडवून होमद्रव्यांचें प्रोक्षण करावें ३०० कुंडांतील प्रदीप्त अग्नीपुढें माझें ध्यान करावें. त्या ध्यानाच्या मूर्तीचें लक्षण स्वतः श्रीकृष्ण सांगत आहे. ३११.

तप्तजाम्बूनदप्रख्यं–तापलेल्या सुवर्णाप्रमाणें ज्याची कांति आहे, शङ्खचक्रगदाम्बुजैः लसच्चतुर्भुजं–शंख, चक्र, गदा व कमल यांनीं ज्याचे चार भुज शोभत आहेत, शान्तं–शांत, पद्मकिञ्जल्कवाससं–कमलांतील परागाप्रमाणें ज्याचें वस्त्र आहे, स्फुरत्किरीट-कटक-कटिसूत्रवराङ्गदं–ज्याचा किरीट, कडीं मेखला व श्रेष्ठ बहुभूषणें चमकत आहेत, श्रीवत्सवक्षसं–ज्याच्या वक्षःस्थलीं श्रीवत्सलांछन आहे, भ्राजत्कौस्तुभं–ज्याचा कौस्तुभमणि सूर्याप्रमाणें तळपत आहे, वनमालिनं ज्याच्या कंठात वनमाला आहे. ३८-३९.

जैसी तप्तस्वर्णभा । तैसी मूर्तीची अंगप्रभा । चतुर्भुज साजिरी शोभा । चिन्मात्रगाभा साकार ॥ १२ ॥ शंखचक्रगदाकमळ । कांसे पीतांबर सोज्ज्वळ । लोपूनि अग्निप्रभाजाळ । मूर्तिप्रभाबळप्रकाश ॥ १३ ॥ मुकुट कुंडलें मेखळा । श्रीवत्स शोभे वक्षस्थळां । आपाद रुळे वनमाळा । झळके गळां कौस्तुभ ॥ १४ ॥

ध्यायन्नभ्यर्च्य दारूणि हविषाभिघृतानि च । प्रास्याज्यभागावाघारौ दत्त्वा चाज्यप्लुतं हविः ॥ ४० ॥

जुहुयान्मूलमंत्रेण षोडशर्चाऽवदानतः । धर्मादिभ्यो यथान्यायं मन्त्रैः स्विष्टकृतं बुधः ॥ ४१ ॥

ऐसें साङ्ग माझें ध्यान । अग्निमाजीं भावूंनि जाण । करूनि आवाहन पूजन । विध्युक्त हवन मांडावें ॥ १५ ॥ अग्नि विधियुक्त आव्हानूनी । समिधाहोम घृतें अभिघारूनीं । आज्यभाग दों अवदानी । प्रथमहवनीं होमावा ॥ १६ ॥ तेथ तिलाज्य हविर्द्रव्य पूर्ण । घृतप्लुत अवदान । आगमोक्त होमविधान । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ १७ ॥

लक्षूनि मुखबोध देवाचा । मूलमंत्रें होम साधकांचा । कां पुरुषसूक्त सोळा ऋचा । हा होमाचा विधिमार्ग ॥ १८ ॥ धर्मादिक पीठार्चन । इतर देवता आवरण । त्यांसीही एकएक अवदान । नाममंत्रें जाण होमावें ॥ १९ ॥ मग स्विष्टकृताचें अवदान । साधकें द्यावें सविधान । ऐसें हें माझें निजभजन । भक्त सज्ञान जाणती ॥ ३२० ॥ होमादि मूर्तिभजनविधी । येणें तत्काळ साधकां सिद्धी । भक्त पावती निजपदीं । जाण त्रिशुद्धि उद्धवा ॥ २१ ॥

तापविलेल्या सोन्याप्रमाणें मूर्तीची अंगकांति असावी. ती चतुर्भुज व देखणी असावी. ती चैतन्यरूप असून साकार असावी. १२ शंख, चक्र, गदा, पद्म या आयुधांनीं युक्त, कंबरेला पिंवळा पीतांबर व अग्नीच्या प्रभेलाहि लोपविणारी त्या मूर्तीची कांति असावी. १३ मुकुट, कुंडलें, मेखला, वक्षःस्थलावर शोभणारें श्रीवत्स, पायापर्यंत रुळणारी वनमाला, गळ्यांत झळकणारा कौस्तुभ अशी मूर्ति कल्पावी. १४.

ध्यायन् अभ्यर्च्य–अशा माझें ध्यान करीत पूजन करून, हविषा अभिघृतानि दारूणि च प्रास्य–आणि घृतानें भिजलेल्या शुष्क समिधा अग्नींत टाकून, आज्यभागौ आघारौ दत्त्वा–आधारसंज्ञक आज्यभाग देऊन, आज्यप्लुतं हविः मूलमंत्रेण जुहुयात्–घृतानें माखलेला हवि मूलमंत्रानें होमावा, षोडशर्चा अवदानतः धर्मादिभ्यः मंत्रैः यथान्यायं स्विष्टकृतं बुधः जुहुयात्–ज्यामध्यें सोळा ऋचा आहेत, अशा पुरुषसूक्तानें प्रत्येक ऋचेनें धर्मादिकांच्या उद्देशानें आहुतिग्रहण करून शेवटीं 'स्वाहा' हा मंत्र योजून विद्वानानें यथाशास्त्र 'अग्नये स्विष्टकृते स्वाहा' असा स्विष्टकृत् होम करावा. ४०–४१.

अग्नीमध्यें अशा माझ्या साङ्ग ध्यानाची कल्पना करावी. आवाहन व पूजन करावें आणि विधियुक्त होमाला आरंभ करावा. १५ अग्नीचें विधियुक्त आवाहन करावें. समिधाहोम, घृतानें अभिघार व पाहिल्या हवनांत घृतानें दोन आज्यभाग-अवदानें द्यावीं. १६ मग त्या आज्यभागावदानामध्यें तीळ, तूप इत्यादि होमद्रव्यांचा शास्त्रोक्त होमविधि करावा; असें स्वतः श्रीकृष्ण सांगत आहे. ३१७.

देवाच्या मुखाचें ध्यान धरून साधकानें अष्टाक्षरी मूळ मंत्रानें होम करावा. किंवा पुरुषसूक्ताच्या सोळा ऋचा म्हणणें हाहि होमाचा विधि आहे. १८ धर्मादिक पीठार्चन, किंवा पूजा केलेल्या इतर देवतांनाहि नाम-मंत्रानें एकेक अवदान द्यावें. १९ नंतर साधकानें स्विष्टकृताचेंहि विधियुक्त अवदान द्यावें. असें हें माझें भजन ज्ञात्यांना ठाऊकच आहे. ३२० या होमादि मूर्तिभजनाच्या विधीनें साधकाला तत्काल सिद्धि मिळते आणि हे उद्धवा! भक्त ब्रह्मपदाला प्राप्त होतात, हें अगदीं खरें समज. ३२१.

अभ्यर्च्याथ नमस्कृत्य पार्षदेभ्यो बलिं हरेत् । मूलमन्त्रं जपेद्ब्रह्म स्मरन्नारायणात्मकम् ॥ ४२ ॥

यापरी होम विधियुक्त अर्चन । करूनि करावें साष्टांग नमन । मग देवाचे पार्षद्गण । त्यांसी बळिहरण कल्पावें ॥ २२ ॥ मग बाह्यप्रतिमापूजास्थान । तेथें येवोनियां आपण । मूलमंत्राचें स्मरण । ध्यानयुक्त जाण करावें ॥ २३ ॥ पूज्य पूजक अभिन्न । परात्पर जो कां नारायण । ते परब्रह्मीं लावूनि मन । घालावें आसन सावधानवृत्तीं ॥ २४ ॥ ध्यानीं जंव स्थिरावे मन । तंव स्थिर राखावें आसन । तेथूनि उपरमल्या मन । पुढें पूजाविधान हरि सांगे ॥ २५ ॥

दत्त्वाऽऽचमनमुच्छेषं विष्वक्सेनाय कल्पयेत् । मुखवासं सुरभिमत्ताम्बूलाद्यमथार्हयेत् ॥ ४३ ॥

एवं विसर्जिलिया ध्यान । झालें देवाचें भोजन । ऐसें भावूनि आपण । शुद्धाचमन अर्पावें ॥ २६ ॥ अग्नीमाजील मूर्तिध्यान । प्रतिमा पूजिली जे आपण । दोहीं ठायीं शुद्धाचमन । यथोक्त जाण करावें ॥ २७ ॥ देवाचिया भुक्तशेषासी । भाग द्यावा विष्वक्सेनासी । मग काढूनि उच्छिष्टासी । द्यावें देवासी करोद्वर्तन ॥ २८ ॥ कापुरें घोळिवा सुपारीफोडी । सुवर्णवर्णा पानांची विडी । काथ सुवासिला परवडी । अभिनव गोडी तांबूला ॥ २९ ॥ एळा लवंगा कंकोळ । अल्प अर्पिलें जातीफळ । सुरंग रंगलें तांबूल । दिसे मुखकमळ साजिरें ॥ ३३० ॥ चूवा कस्तूरी बुका सधर । अर्पूनि पुष्पांजळी-संभार । जेणें शीघ्र संतोषे श्रीधर । तें प्रेम साचार हरि सांगे ॥ ३१ ॥

उपगायन्गृणन्नृत्यन्कर्माण्यभिनयन्मम । मत्कथाः श्रावयन् शृण्वन् मुहूर्तं क्षणिको भवेत् ॥ ४४ ॥

अभ्यर्च्य अथ नमस्कृत्य पार्षदेभ्यः बलिं हरेत्—त्यानंतर अग्निस्थ भगवान् अंतर्यामीची पुष्पादिकांनीं पूजा व नमस्कार करून नंदादिपार्षदांना आठ दिशांमध्यें बलि समर्पण करावा. [त्यानंतर पूजास्थानीं येऊन देवाच्या पुढें बसून] **नारायणात्मकं ब्रह्म स्मरन्**—नारायणात्मक ब्रह्माचें स्मरण करून, **मूलमंत्रं जपेत्**—मूलमंत्राचा यथाशक्ति जप करावा. ४२.

याप्रमाणें विधियुक्त होम व पूजन करून मग देवाला साष्टांग नमस्कार करावा. देवाच्या परिवाराला बलिहरण द्यावें. २२ नंतर बाह्य प्रतिमेच्या पूजास्थानाजवळ येऊन ध्यानानें मूल मंत्राचें स्मरण करावें. २३ पूज्य व पूजक यांहून भिन्न असलेला परात्पर नारायण जें परब्रह्म त्याच्याकडे मन लावून समाधान वृत्तीनें आसन घालावें. मन जोंवर ध्यानांत स्थिर होई, तोंवर आसन स्थिर ठेवावें. २४ मन तेथून परत फिरलें कीं, पुढला पूजाविधि कसा करावा हेंच आतां श्रीहरि सांगत आहे. ३२५.

आचमनं दत्त्वा उच्छेषं विष्वक्सेनाय कल्पयेत्—भगवानाचें भोजन संपलें आहे, असें चिंतन करून आचमन देऊन अवशिष्ट राहिलेला भाग विष्वक्सेनाला अर्पण करून त्याच्या अनुज्ञेनें मागून स्वतः तो खावा, **सुराभिमत् तांबूलाद्यं मुखवासं (दत्त्वा) अथ अर्हयेत्**—सुगंधयुक्त तांबुलादि मुखवास देऊन पुनः पुष्पांजलीनें पूजा करावी. ४३.

याप्रमाणें ध्यानाचें विसर्जन करून, देवाचें भोजन झालें अशी कल्पना करून शुद्ध आचमन अर्पण करावें. २६ अग्नींतील मूर्तीचें ध्यान व आपण पूजिलेली प्रतिमा या दोहोंना उद्देशून शुद्ध आचमन टाकावें. २७ देवाच्या अवशिष्ट नैवेद्याचा भाग विष्वक्सेनाला द्यावा. नंतर उष्टें काढून देवाला हाताला चोळण्यास चंदन द्यावें. २८ कापुरांत घोळलेल्या सुपारीचें खांड, पिकलेल्या पानांचा विडा, सुवासिक केलेला कात, यांनीं युक्त असलेला सुवासिक विडा द्यावा. २९ वेलदोडे, लवंग, कंकोळ, थोडेंसें जायफळ यांनीं युक्त असलेल्या तांबुलानें तांबडे झालेले ओंठ देवाच्या मुखकमलाला शोभा आणितात. ३३० चुवा, कस्तुरी, बुका व पुष्पांजली अर्पण करावी. ज्या योगें श्रीकृष्ण सत्त्वर संतुष्ट होतो, तें प्रेमच आतां श्रीहरि सांगत आहे.

उपगायन् गृणन् नृत्यन् मम कर्माणि अभिनयन् मत्कथाः श्रावयान् शृण्वन् मुहूर्तं क्षणिकः भवेत्—भगवानाच्या समीप गायन करणारा, नृत्य करणारा, माझ्या कर्मांचें आपल्या ठिकाणीं आविष्करण करणारा, माझ्या कथा ऐकणारा व ऐकविणारा असा होऊन कांहीं काल सर्व व्यग्रता टाकून भगवदेकपरायण व्हावें. ४४.

ज्ञान ध्यान उपासकता । हे गौण जाण सर्वथा । देव भावाचा भोक्ता । भावें तत्त्वतां देव भेटे ॥ ३२ ॥ ध्यानीं तुटलिया निजमन । करावें माझें नामस्मरण । कां माझ्या गुणांचें श्रवण । आदरें जाण करावें ॥ ३३ ॥ करितां हरिगुणांचें श्रवण । तेणें सुखावे अंतःकरण । सुखें सुखावोनि आपण । स्वयें हरिकीर्तन करावें ॥ ३४ ॥ निर्लज्ज नटाचे परी । हरिरंगणीं नृत्य करी । हावभावकटाक्षकुसरी । अभिनयो धरी कर्माचा ॥ ३५ ॥ गोवर्धनउद्धरण । अंगें दावावें आपण । कां मांडूनिया दृढ ठाण । त्र्यंबकभंजन दावावें ॥ ३६ ॥ पुतनाप्राणशोषण । कुवलयाचें निर्दळण । दावूनि मल्लमर्दन । हरिकीर्तन करावें ॥ ३७॥ नवल प्रेमाचा उद्‌बोध । गद्यपद्यनामप्रबंध । भुजंगप्रयातादि अगाध । गाती स्वानंद स्तुतिस्तोत्रें ॥ ३८॥

स्तवैरुच्चावचैः स्तोत्रैः पौराणैः प्राकृतैरपि । स्तुत्वा प्रसीद भगवन्निति वन्देत दण्डवत् ॥ ४५ ॥

माझीं स्तुतिस्तोत्रें पुराण । सादरें करावीं श्रवण । श्रोता मिळालिया आपण । कथानिरूपण सांगावें ॥ ३९ ॥ शुद्ध न ये स्तोत्रपठण । करितां अबद्ध गायन । पाठक दोष न लागे जाण । तेणें होय निर्दळण महादोषां ॥ ३४० ॥ वेदींचें उपनिषत्पठण । कां ऋचामंत्रें हरीचें स्तवन । ये लौकिकीं उच्चावचें जाण । देवासी समान निजभावें ॥ ४१ ॥ पुराणींचें श्रेष्ठ स्तोत्र । अथवा पठतां नाममात्र । अर्थें भावार्थें साचार । समान श्रीधर मी मानीं ॥ ४२ ॥ नेणे वेद शास्त्र पुराण । केवळ भाळाभोळा जाण । तेणें करितां प्राकृत स्तवन । मी जनार्दन संतोषें ॥ ४३ ॥ वेदीं चुकल्या स्वर-वर्ण । पाठका दोष बाधी गहन । प्राकृत करितां हरीचें स्तवन । दोषनिर्दळण तेणें होय ॥ ४४ ॥ शास्त्र-

---

ज्ञान, ध्यान, उपासना हें सगळें गौण आहे. देव भावाचा भोक्ता आहे. केवळ भक्तीनेंच देव भेटतो. ३२ मन ध्यानापासून परत फिरलें कीं, माझें नामस्मरण करावें किंवा माझ्या गुणांचें आदरानें श्रवण करावें. ३३ हरीच्या गुणांचें श्रवण केलें असतां अंतःकरणाला सुख होतें. आपण त्या सुखानें संतुष्ट होऊन स्वतः हरिकीर्तन करावें. ३४ निर्लज्ज नटाप्रमाणें हावभाव करून हरीच्या सभामंडपांत नृत्य करावें व अभिनयचातुर्य दाखवावें. ३५ गोवर्धन पर्वत उचलून धरण्याचा अभिनय करावा. किंवा दृढ आसन घालून रामाची भूमिका घ्यावी व शिवधनुष्यभंग करण्याचा अभिनय दाखवावा. ३६ पूतनेचें प्राणशोषण, कुवलय हत्तीचें निर्दालन, मल्लमर्दन दाखवावें. अशाप्रकारें हरिकीर्तन करावें. ३७ प्रेमाचा आविर्भाव विलक्षण आहे. त्यांत गद्य, पद्य, नामप्रबंध, भुजंगप्रयातादि छंद इत्यादिकांच्या योगें भक्त आनंदानें स्तुतिस्तोत्रें गातात. ३३८.

—आतां स्तव-स्तोत्रांचा प्रकार दाखवितात—

पौराणैः प्राकृतैः अपि उच्चावचैः स्तवैः स्तोत्रैः स्तुत्वा हे भगवन् प्रसीद इति दण्डवत् वन्देत—पुराणांतील व प्राकृत भाषेंतीलहि उच्चनीच स्तवांनीं व स्तोत्रांनीं स्तुति करून ' हे भगवन् ! प्रसन्न हो,' असें म्हणून साष्टांग दंडवत घालावा. ४५.

माझीं स्तुति-स्तोत्रें व पुराणें यांचें आदरानें श्रवण करावें. कोणी श्रोता मिळाल्यास आपण कथा सांगावी. ३९ स्तुति-स्तोत्रें जर शुद्ध गातां आलीं नाहींत व अशास्त्रीय बेसुर गायन केलें तरी त्यांत भक्ताला दोष लागत नाहीं. उलट त्यायोगें महादोषांचा नाश होतो. ३४० वेदांच्या उपनिषदांचें पठण किंवा ऋग्वेदाच्या मंत्रानें हरीचें स्तवन, यांतील उच्चनीच भाव लौकिकांत आहे. परंतु देवाला भक्तिभावानें तीं दोन्हीं समानच आहेत. ४१ पुराणांतील श्रेष्ठ स्तोत्र किंवा केवल माझ्या नांवाचें पठण हीं दोन्हीं मला अर्थानें व भावानें सारखींच आहेत. ४२ जो वेद-शास्त्र-पुराण कांहीं जाणत नाहीं, बिचारा केवल भाळाभोळा असतो त्यानें आपल्या अडाणी भाषेंत जरी माझें स्तवन केलें तरी त्यानेंहि मी जनार्दन संतुष्ट होतों. ४३ वेद म्हणण्यांत एखादा स्वर-वर्ण जर चुकला तर त्या पठण करणाराला भयंकर दोष लागतो. पण प्राकृत भाषेंत हरिस्मरण केलें असतां सगळे दोष नाहींसे होतात. ४४ शास्त्राच्या व पुराणाच्या श्रवणाला पंचमी, सप्तमी, इत्यादि विभक्त्यांचें व्याकरणज्ञान पाहिजे. परंतु नामाचें अशुद्ध पठण जरी

श्रवण पुराणस्थिति । पाहिजे पंचमीसप्तमीव्युत्पत्ती । पढतां अबद्ध नामकीर्ती । भगवत्प्राप्तिप्रापक ॥ ४५ ॥ संस्कृत वाणी देवें केली । प्राकृत का चोरापासून झाली । असोत या पक्षाभिमानी बोली । देवाची चाली निरभिमान ॥ ४६ ॥ वेद शास्त्र हो कां पुराण । कां प्राकृत भाषास्तवन । एथें भावचि श्रेष्ठ जाण । तेणें नारायण संतोषे ॥ ४७ ॥ देवासी प्रेमाचें पढियें कोड । न पाहे व्युत्पत्तीचें काबाड । भावार्थ भाविकांचा गोड । तेणें भक्तांची भीड तुळंघी देवो ॥ ४८ ॥ भावार्थें करितां स्तवन । देव होय भक्तांअधीन । तेणें भावार्थें करूनि नमन । हरिचरण वंदावे ॥ ४९ ॥ मुहूर्त निमेष क्षणेंक्षण । हरिचरणीं सुखावल्या मन । इतर व्यापार तेणें जाण । सहजें आपण वोसरती ॥ ३५० ॥ जेणें तुटे माझें अनुसंधान । तें कर्म त्यागावें आपण । जेणें स्वरूपनिष्ठ होय मन । तें समाधान राखावें ॥ ५१ ॥ सप्रेम करितां नमन । नित्य नूतन सावधान । त्या नमनाचें लक्षण । लोटांगण दंडवत ॥ ५२ ॥ सुटल्या दंड सत्राणें । संमुख विमुख पाहों नेणें । तैशीं घाली लोटांगणें । देहाभिमानें अहेतुक ॥ ५३ ॥ असतां देहाचें अनुसंधान । जो परमार्थें करी नमन । त्या नमस्काराचें लक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ५४ ॥

शिरो मत्पादयोः कृत्वा बाहुभ्यां च परस्परम् । प्रपन्नं पाहि मामीश भीतं मृत्युग्रहार्णवात् ॥ ४६ ॥

मस्तक माझ्या चरणांवरी । उभय बाहु परस्परीं । दोनी चरण दोहीं करीं । धरीं निर्धारीं भावार्थें ॥ ५५ ॥ संसारसागराच्या पोटीं । मृत्युग्रहें घातली मिठी । चरणीं लागलों उठाउठीं । मज जगजेठी सोडवीं ॥ ५६ ॥ भवभयें भ्यालों दारुण । यालागीं तुज आलों शरण । निवारीं माझें जन्ममरण । भावें श्रीचरण दृढ धरिले ॥ ५७ ॥ तूं स्वामी असतां शिरीं । मज मृत्यु बापुडें केवीं मारी । भावें

केलें तरी तें भगवत्प्राप्ति करून देतें. ४५ संस्कृत भाषा देवानें केली आणि प्राकृत काय चोरानें केली ! या पक्षाभिमानाच्या गोष्टी राहोत. देवाचें वागणें निरभिमानच आहे. ४६ वेद, शास्त्र, पुराणें किंवा प्राकृत भाषेंतील स्तवन या सर्वांतील भक्तीच देवाला प्रिय आहे. त्यानेंच नारायणाला संतोष होतो. ४७ देवाला भक्तीचीच आवड अधिक आहे. तो भाषेच्या अवडंबराकडे पहात नसतो. भविकांची भक्तीच त्याला प्रिय वाटते. ४८ वास्तव भक्तिभावानें नमस्कार करून हरिचरणांना वंदन करावें. ४९ मुहूर्त, निमेष किंबहुना एक क्षणभर जरी मन सुखी झालें तरी, त्यानें इतर व्यवसाय सहजच सुटतात. ३५० ज्यायोगें माझ्या ध्यानांत व्यत्यय येतो, तें कर्म अवश्य टाकावें. ज्यायोगें मन आत्मस्वरूपांत तल्लीन होईल, तेंच समाधान ठेवावें. ५१ भगवंताला सप्रेम नमस्कार केला असतां नित्य नवें समाधान प्राप्त होतें. त्या नमनाचें लक्षण असें—लोटांगण, दंडवत घालणें, ५२ काठी हातांतून खालीं पडली असतां ती 'मी समोर पडत आहे कीं वाकडी,' हें जसें पहात नाहीं त्याप्रमाणें देहाभिमान टाकून निष्काम होऊन लोटांगण घालावें. ५३ देहाकडे लक्ष ठेवून जो परमार्थासाठीं नमन करितो त्याच्या नमनाचा प्रकार श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ३५४.

—आतां प्रणाम कसा करावा, अशी अपेक्षा झाली असतां सांगतात—

मत्पादयोः शिरः कृत्वा—माझ्या दोन्ही पायांवर मस्तक ठेवून, बाहुभ्यां च परस्परं (गृहीत्वा)—आणि आपल्या दक्षिणोत्तर बाहूंनीं भगवानाचे दक्षिणोत्तर पाय धरून (किंवा एखाद्या अपराध्याप्रमाणें आपल्या पाठीवर दोन्ही हात जोडून धरून), हे ईश प्रपन्नं मां मृत्युग्रहार्णवात् पाहि—हे ईश्वरा, शरण आलेल्या मला मृत्युरूपी ग्रहयुक्त सागरांतून तार. (अशी प्रार्थना करून प्रणाम करावा.) ४६.

भक्त माझ्या चरणांवर मस्तक ठेवून, आपल्या दोन्ही हातांनीं माझे पाय भक्तिभावानें धरितो ५५ व म्हणतो कीं, संसारसागरांतील मृत्युरूपी मगरानें मला ग्रासलें आहे. हे जगजेठी ! मी तुझ्या पायांना शरण आलों आहें. मला सोडवावें. ५६ संसारभयाला अतिशय घाबरून मी तुला शरण आलों आहें. माझ्या जन्म-मरणांचें निवारण करावें. मी भक्तिभावानें तुझे पूज्य चरण दृढ धरिले आहेत. ५७ तूं माझा स्वामी रक्षण करण्यास समर्थ असतां

लोटांगण चरणांवरी । कृपा उद्धरीं कृपाळुवा ॥ ५८ ॥ देखोनि साष्टांग नमन । ऐकोनि भयभीत स्तवन । मज तुष्टला नारायण । ऐसें आपण भावावें ॥ ५९ ॥

इति शेषां मया दत्तां शिरस्याधाय सादरम् । उद्वासयेच्चेदुद्वास्यं ज्योतिज्योंतिषि तत्पुनः ॥ ४७ ॥

म्यां दीधला शेषप्रसाद । तो शिरीं धरोनि स्वानंद । स्थावरमूर्ति जेथ प्रसिद्ध । तेथ उद्वाससंबंध न करावा ॥ ३६० ॥ जंगम जे प्रतिमामूर्ती । तेथ आवाहिली निजात्मज्योती । ते उद्वासूनियां मागुती । निजात्मस्थितीं ठेवावी ॥ ६१ ॥ मूर्तिमाझारील ज्योती । आणोनियां हृदयस्थितीं । मग निजात्मज्योतीसी ज्योती । यथास्थितीं मेळवावी ॥ ६२ ॥ विसर्जनांत पूजास्थिती । ऐकोनि उद्धवाचे चित्तीं । साधकां पूज्य कोण मूर्ती । देव तें अर्थीं स्वयें सांगे ॥ ६३ ॥

अर्चादिषु यदा यत्र श्रद्धा मां तत्र चार्चयेत् । सर्वभूतेष्वात्मनि च सर्वात्माऽहमवस्थितः ॥ ४८ ॥

उद्धवा जे मूर्ति ज्या पढियंती । तेचि त्यासी पूज्य मूर्ती । तुवांही अणुमात्र चित्तीं । संदेह ये अर्थीं न धरावा ॥ ६४ ॥ विष्णु विरंचि सविता जाण । शिव शक्ति कां गजवदन । या मूर्तींमाजीं मी आपण । सर्वीं समान सर्वात्मा ॥ ६५ ॥ सर्व प्रतिमांचें पूजन । करितां मज पूजा समान । भक्तांची जेथ प्रीति गहन । तियेअधीन मी परमात्मा ॥ ६६ ॥ जेवीं बाळकाचेनि मेळें । माता तदनुकूल खेळे । तेवीं भक्तप्रेमाचिये लीळें । म्यां चित्कल्लोळें क्रीडिजे ॥ ६७ ॥ या सर्व भूतांच्या ठायीं । आणि

मला मृत्यु विचारा कसा मारणार ! हे कृपासागरा ! मी तुझ्या चरणांवर लोटांगण घालितों. माझा उद्धार कर. ५८ तो साष्टांग नमस्कार पाहून व मी भयभीत होऊन केलेलें स्तवन ऐकून नारायण प्रसन्न झाला आहे, अशी भावना करावी. ३५९.

त्यानंतर निर्माल्यग्रहणपूर्वक वैकल्पिक विसर्जनप्रकार सांगतात—

इति मया दत्तां शेषां शिरसि सादरं आधाय उद्वासयेत् चेत् (प्रतिमायां न्यस्तं) यत् ज्योतिः तत् पुनः ज्योतिषि उद्वास्यम्—याच प्रार्थनेनें, भगवानानें निर्माल्य दिला आहे, अशी कल्पना करून, तो आपल्या मस्तकावर मोठ्या आदरानें ठेवून भगवानाचें जर विसर्जन करावयाचें असेल तर प्रतिमेमध्यें जिचा न्यास केला आहे, अशा ज्योतीचें पुनरपि हृदयकमलस्थ ज्योतीमध्येंच विसर्जन करावें. ४७.

मी दिलेला शेषप्रसाद आनंदानें शिरसावंद्य करावा. अचल मूर्तीचें विसर्जन करूं नये. ३६० ज्या चल प्रतिमेमध्यें आत्मज्योतीनें आवाहन केलें असेल, त्या मूर्तीचें विसर्जन करून पुनः पूर्वींच्या स्थानीं तिची स्थापना करावी. ६१ मूर्तीमध्यें असलेली आत्मज्योति हृदयांत आणून ती आपल्या आत्मज्योतींत मिळवावी. ६२ विसर्जनापर्यंतचा पूजाविधि ऐकून उद्धव मनांत म्हणाला कीं, साधकानें सर्वांत श्रेष्ठ मूर्ति कोठची ? याचा हा आशय जाणून देव आतां त्याविषयीं सांगत आहे. ३६३.

—या अधिष्ठानांतील अत्यंत मुख्य अधिष्ठान कोठचें ! अशी शंका आली असतां सांगतात—

अर्चादिषु यदा यत्र श्रद्धा तत्र च मां अर्चयेत्—पूर्वोक्त अर्चादिकांतील जेव्हां ज्या अधिष्ठानामध्यें आपली श्रद्धा असेल तेव्हां तेथेंच माझें पूजन करावें (अधिष्ठानांध्यें मुख्य-अमुख्य हा भेद नाहीं. कारण) सर्वभूतेषु आत्मनि च अहं सर्वात्मा अवस्थितः—सर्व भूतांमध्यें आणि स्वतः पूजकाच्या हृदयांत मी सर्वात्मा अवस्थित आहें. ४८.

हे उद्धवा ! ज्याला जी मूर्ति आवडत असेल, तीच त्याला पूज्य आहे, याविषयीं तूं मनांत यत्किंचित्‌हि संशय धरूं नकोस. ६४ विष्णु, ब्रह्मदेव, सूर्य, शिव, शक्ति, गजानन या सर्व मूर्तींमध्यें मी समान आहें. सगळ्या प्रतिमांचें पूजन केलें असतां ती पूजा मला समानच आहे. ६५ ज्यावर भक्ताचें अतोनात प्रेम असतें त्याच्या अधीन मी परमात्मा असतों. ६६ माता जशी आपल्या तान्हुल्याच्या अनुरोधानें खेळत असते, त्याप्रमाणें मी भक्तांवरील प्रेमामुळें त्यांच्या अनुसार क्रीडा करितो. ६७ या सर्व प्राणिमात्रांत आणि अवतारादि लीलाशरीरांत मी सर्वांस

अवतारादि लीलादेहीं । मी सर्वांसीं समान पाहीं । ये अर्थीं नाहीं संदेहो ॥ ६८ ॥ उद्धवा मी नाहीं ऐसें । कोणीही ठिकाण रितें न दिसे । परी प्राण्यांचें भाग्य कैसें । त्या मज विश्वासें न भजती ॥ ६९ ॥ जो जेथ मज भजों बैसे । त्या मी तेथ तैसाचि असें । हें उपासनाकांड विशेषें । गुप्त अनायासें प्रकाशिलें ॥ ३७० ॥ उपासनाकांडींचा निर्वाहो । मी सर्वांभूतीं देवाधिदेवो । हा ज्यासी न कळे मुख्य भावो । त्यासी मूर्तिनिर्वाहो द्योतिला ॥ ७१ ॥ हो कां माझी प्रतिमामूर्ति । तेही मी चिदात्मा निश्चितीं । तेथ करितां भावें भक्ती । भक्त उद्धरती उद्धवा ॥ ७२ ॥

एवं क्रियायोगपथैः पुमान्वैदिकतान्त्रिकैः । अर्चन्नुभयतः सिद्धिं मत्तो विन्दत्यभीप्सिताम् ॥ ४९ ॥

एवं क्रियायोगलक्षण । वैदिक तांत्रिक मिश्र जाण । आगमनिगमीं विस्तार गहन । तो मुख्यार्थ पूर्ण सांगीतला ॥ ७३ ॥ येणें क्रियायोग भजनमार्गें । भक्त जैं भोगमोक्ष मागे । तैं उभय सिद्धीलागीं वेगें । म्यां श्रीरंगें अर्पिजे ॥ ७४ ॥ भक्त निष्काम अनन्यभक्ती । तैं भोगमोक्षादि संपत्ती । घेऊनियां मी श्रीपती । त्यांच्या द्वाराप्रती सदा तिष्ठें ॥ ७५ ॥

मदर्चां सम्प्रतिष्ठाप्य मन्दिरं कारयेद्दृढम् । पुष्पोद्यानानि रम्याणि पूजायात्रोत्सवाश्रितान् ॥ ५० ॥

सांग माझी प्रतिमामूर्ती । करूनि जे प्रतिष्ठा करिती । दृढ देवालय उभारिती । अतिप्रीतीं मद्भावें ॥ ७६ ॥ वन उपवन उद्यान । पुष्पवाटिका लावाव्या पूर्ण । नित्यपूजेचें विधान । उत्साहीं जाण महापूजा

समान आहें. यांत मुळींच संशय नाहीं. ६८ उद्धवा ! माझ्यावांचून रेंसभरहि जागा रिकामी सांपडणार नाहीं. पण लोकांचें दैव पहा कसें विचित्र आहे कीं, अशा मजवर विश्वास ठेवून ते भजन करीत नाहींत. जो मला जेथें जसा भजतो, तेथें मी त्याला तसाच दिसतों, हें उपासनाकांडांतील गूढ रहस्य अनायासानें प्रकट झालें. ३७० उपासना कांडाचे मुख्य तत्त्व हेंच आहे कीं, सर्व प्राण्यांत मी देवाधिदेव आहें. हा मुख्य अभिप्राय ज्यांस कळत नाहीं, त्यांच्यासाठीं मूर्तिपूजेची सगुण उपासना सांगितली आहे. ७१ उद्धवा ! माझी प्रतिमामूर्ति कां होईना, त्यांतहि मी चिदात्माच आहें. त्याची श्रद्धेनें भक्ति करितांच माझे भक्त उद्धरून जातात. ३७२.

एवं वैदिकतांत्रिकैः क्रियायोगपथैः अर्चन् पुमान् मत्तः अभीप्सितां उभयतः सिद्धिं विन्दति–याप्राणें वैदिक व तांत्रिक कर्मयोग मार्गांनीं पूजा करणारा पुरुष माझ्यापासून अत्यंत अभीष्ट असलेल्या ऐहिक पारलौकिक सिद्धीला प्राप्त होतो. ४९.

याप्रमाणें क्रियायोगाचें लक्षण, वैदिक व तांत्रिक मिळून मिश्र झालेलें आहे. त्याचा वेद-शास्त्रांत फार मोठा विस्तार आहे. त्याचा मुख्य अर्थ मीं तुला सांगितला. ७३ या क्रियायोगाच्या भजनमार्गानें भोग व मोक्ष हीं भक्तानें मागितल्यास तीं दोन्हीं मी त्यास तत्काल देतों. ७४ भक्त जर निष्कामबुद्धीनें माझी अनन्य भक्ति करीत असला तर मी श्रीपति स्वतः भोग-मोक्षासह सगळें वैभव घेऊन त्याच्या दारांत तिष्ठत असतों. ३७५.

—आतां संपन्न असलेल्या भक्ताला उद्देशून पुढील तीन श्लोकांनीं सांगतात—

मदर्चां सम्प्रतिष्ठाप्य दृढं मंदिरं कारयेत्–माझ्या प्रतिमेची प्रतिष्ठा करून दृढ मंदिर करवावें. रम्याणि पुष्पोद्यानानि–फुलझाडांच्या बागा करवाव्या. पूजायात्रोत्सवाश्रितान्–प्रत्यहीं पूजा, विशिष्ट यात्रेच्या पर्वदिवशीं बहुजन समागम, वसंतादि महोत्सव व त्यासाठींच क्षेत्रादिकांचा उत्सर्ग करावा. [हें सर्व चालण्यासाठीं शेतें, मळे इत्यादिकांचें उत्पन्न त्याकडे लावून द्यावें.] ५०.

माझे भक्त माझ्या प्रतिमेची सांग मूर्ति करून तिची प्रतिष्ठा करितात व अत्यंत प्रेमानें मद्भावानें देवालयें बांधितात. ७६ वन, उपवन, उद्यान, फुलझाडांचे ताटवे करितात. नित्य पूजेच्या विधानाप्रमाणें मोठ्या उत्साहानें

॥ ७७ ॥ यात्रा बहुजनसमाजा । वार्षिक पर्व महापूजा । चालावया अधोक्षजा । उपाय सहजा हरि सांगे ॥ ७८ ॥

पूजादीनां प्रवाहार्थं महापर्वस्वथान्वहम् । क्षेत्रापणपुरग्रामान् दत्त्वा मत्सार्ष्टितामियात् ॥ ५१ ॥

नित्यपूजा महापूजा । वार्षिकी पर्वें चालावया वोजा । नित्यनिर्वाह करी राजा । ग्रामसमाजा अर्पूनी ॥ ७९ ॥ क्षेत्र म्हणिजे शेत गहन । हाटउत्पन्नद्रव्य आपण । हाटेंवीण तो ग्राम जाण । ऐक लक्षण पुराचें ॥ ३८० ॥ हाटयुक्त तें पुर पाहीं । जे अर्पिती देवालयीं । ते माझें ऐश्वर्य पाहीं । सर्वां ठायीं पावती ॥ ८१ ॥ मूर्तिप्रतिष्ठा पूजाविधान । देवालयीं केलिया जाण । कर्त्यासी फळ कोण कोण । तेही श्रीकृष्ण सांगत ॥ ८२ ॥

प्रतिष्ठया सार्वभौमं दानेन भुवनत्रयम् । पूजादिना ब्रह्मलोकं त्रिभिर्मत्साम्यतामियात् ॥ ५२ ॥

जो मूर्तिप्रतिष्ठा करूनि ठाये । तो सार्वभौम राज्य लाहे । जो देवालय करी स्वयें । तो स्वामी होये तिहीं लोकीं ॥ ८३ ॥ जो करी पूजाविधान । तो पावे ब्रह्मसदन । ये तीनी जो करी आपण । तो मजसमान ऐश्वर्य पावे ॥ ८४ ॥ ऐसे हे तिघे साधक । पोटींहूनि सकामुक । कामनेसारखे लोक । ते आवश्यक पावती ॥ ८५ ॥ ज्यासी माझें निष्काम भजन । त्याचे प्राप्तीचें निजलक्षण । तें अत्यादरें श्रीकृष्ण । स्वानंदें पूर्ण सांगत ॥ ८६ ॥

महापूजा बांधितात. ७७ त्या देवस्थानाची यात्रा चालावी, जनसमाज जमावा, वार्षिक पर्वांत महापूजा अव्याहत चालावी म्हणून श्रीकृष्ण सहज उपाय सांगत आहे. ३७८.

'पूजायात्रोत्सवाश्रितान्' असें जें वर म्हटलें आहे, त्याचेंच विवरण—

महापर्वसु अथ अन्वहं पूजादीनां प्रवाहार्थं क्षेत्रापणपुरग्रामान् दत्त्वा मत्साष्टितां इयात्—महापर्वप्रसंगीं व प्रत्यहीं पूजादिकांचा अविच्छन्न प्रवाह चालावा (म्ह० त्यांत खंड पडूं नये) म्हणून शेतें, दुकानें, नगरें व गांव देऊन पुरुष माझ्या समान ऐश्वर्याला प्राप्त होतो. ५१.

नित्यपूजा, महापूजा किंवा वार्षिकोत्सव व्यवस्थित चालावेत म्हणून राजा ग्रामांतील लोकांस कांहीं वर्षासनें बांधून देऊन त्यांच्या निर्वाहाची सोय करून ठेवितो. ७९ क्षेत्र म्हणजे लहान शेत किंवा बाजारांत होणारें उत्पन्न देतो. जेथें बाजार नसतो तें गांव. आतां शहरांचें लक्षण ऐक. ३८० शहरांत बाजारपेठा असतात. त्या बाजाराचें उत्पन्न जे देवालयाच्या खर्चासाठीं अर्पण करितात, ते सर्व ठिकाणीं माझें ऐश्वर्य भोगितात. ८१ देवालयांत मूर्तीची प्रतिष्ठा व पूजा केली असतां ते करणारास कोणतें फल मिळतें तेंहि श्रीकृष्ण सांगत आहे. ३८२.

—या प्रतिष्ठादिकांतील एकेकाचें व समस्तांचें फल सांगतात—

प्रतिष्ठया सार्वभौमं—माझ्या प्रतिमेची स्थापना केल्यानें सार्वभौम पद प्राप्त होते. **दानेन भुवनत्रयं**—दानानें त्रिभुवनाची प्राप्ति होते, **पूजादिना ब्रह्मलोकं**—पूजादिकनीं ब्रह्मलोकाप्राप्ति होते. **त्रिभिः मत्साम्यतां इयात्**—व हीं तीन्हीं केल्यानें पुरुष माझ्या साम्याला प्राप्त होतो. (एकनाथांनीं 'दानेन' या ऐवजीं 'सद्मना' हा पाठ घेतला आहे.) ५२.

जो मूर्तीची प्रतिष्ठा करितो, तो सार्वभौम राजा होतो. जो देवालय बांधितो, तो त्रिभुवनांचा स्वामी होतो. ८३ जो पूजा बांधितो, तो सत्यलोकीं जातो आणि या तीन्ही गोष्टी जो करितो, त्याला माझ्यासारखें ऐश्वर्य प्राप्त होतें. ८४ असे हे तीन प्रकारचे साधक मनांतून सकाम असतात, म्हणून ते इच्छिलेल्या लोकीं अवश्य जातात. ८५ जें माझें निष्काम भजन करितात, त्याला कसली प्राप्ति होते, त्याचें वर्णन श्रीकृष्ण मोठ्या आदरानें व अत्यानंदानें करीत आहे. ३८६.

मामेव नैरपेक्ष्येण भक्तियोगेन विन्दति । भक्तियोगं स लभते एवं यः पूजयेत माम् ॥ ५३ ॥

मज मुख्यत्वें जीवीं धरून । ज्यासी माझें निष्काम भजन । निष्कामता जे अनन्य । ते पुरुष जाण मी होती ॥ ८७ ॥ तो वर्तमानदेहीं असतां । माझें निजरूप होय तत्त्वतां । त्या आम्हां आंतौता । भेद सर्वथा असेना ॥ ८८ ॥ करितां निष्काम भजन । भक्त झाला मजसमान । समान म्हणावया जाण । वेगळेपण असेना ॥ ८९ ॥ एवं भक्त तो मजभीतरीं । मी भक्ता आंतबाहेरी । ऐसे मिळाले परस्परीं । निजभजनावरी नांदत ॥ ३९० ॥ गूळ जेवीं गोडियेसी । कां कल्लोळ जैसा सागरासी । ऐशिया निजभक्तीपाशीं । आम्हां तयांसी रहिवासू ॥ ९१ ॥ ऐशी निष्काम जो भक्ति करी । तो धन्य धन्य चराचरीं । जो देवांद्विजांची वृत्ति हरी । तो पचे अघोरीं तें ऐक ॥ ९२ ॥

यः स्वदत्तां परैर्दत्तां हरेत सुरविप्रयोः । वृत्तिं स जायते विड्भुग्वर्षाणामयुतायुतम् ॥ ५४ ॥
कर्तुश्च सारथेर्हेतोरनुमोदितुरेव च । कर्मणां भागिनः प्रेत्य भूयो भूयसि तत्फलम् ॥ ५५ ॥

जो देवालयाची वृत्ति हरी । जो ब्राह्मणवृत्तीचा लोप करी । तो अयुतायुतवर्षसहस्रीं । योनी सूकरी विष्ठा भोगी ॥ ९३ ॥ जो द्विजदेवांची वृत्ति हरी । त्यासी जो होय साहाकारी । जो कां अनुमोदन करी । ते तिघे अघोरीं पचिजेती ॥ ९४ ॥ ते जन्ममरणांच्या आवर्ती । तेंचि फळ पुढतपुढतीं ।

—सकाम भक्ताला कोणतें फल मिळतें, तें सांगितलें. आतां निष्काम भक्ताला माझीच प्राप्ति होते, असें सांगतात—

नैरपेक्ष्येण भक्तियोगेन मां एव विन्दन्ति—कोणत्याहि फळाची अपेक्षा न करितां केलेल्या भक्तियोगानें पुरुष मलाच प्राप्त होतो. (पण अहेतुक भक्तियोगच कसा होतो ! उत्तर—) **यः एवं मां पूजयेत सः भक्तियोगं लभते**—जो याप्रमाणें माझी पूजा करितो तो भक्तियोगाला प्राप्त होतो. ५३.

मुख्यत्वेंकरून अंतःकरणांत माझेंच चिंतन करून जे निष्काम भजन करितात व जे निरिच्छ व अनन्य असतात ते भक्त मद्रूप होतात. ८७ ते या देहांत असूनहि आत्मस्वरूपानें मला येऊन मिळतात. त्यांच्यांत व मज भगवंतामध्यें तिळभरहि भेद रहात नाहीं. ८८ निष्काम भजन केल्यानें भक्त माझ्यासारखा होतो. 'समान' म्हणण्याचें कारण त्याच्यांत व माझ्यांत भेद नसतो. ८९ याप्रमाणें भक्त माझ्यामध्यें असतो व मी भक्ताच्या आंत बाहेर व्यापून रहातों. याप्रमाणें परस्परांत मिसळून आम्ही आत्मभजनांत नांदत असतों. ३९० गूळ जसा आपल्या गोडपणाला धरून रहातो, किंवा लाटा जशा समुद्राच्या आधारावर नाचतात, त्याप्रमाणें आम्ही दोघे भक्तीच्या जवळ राहतों. ९१ जो अशी निष्काम भक्ति करितो, तो चराचरांत धन्य होय. परंतु देव-ब्राह्मणांच्या व्यवस्थेकडे तोडून दिलेल्या उत्पन्नाचा जो अपहार करितो तो घोर नरकांत पडतो. आतां तोच वृत्तान्त ऐक. ३९२.

—दात्याला कोणतें फल मिळतें, तें सांगितलें आतां त्याचा अपहार करणाराची निंदा करितात—

यः सुरविप्रयोः स्वदत्तां परैः दत्तां वृत्तिं हरेत—जो देव व ब्राह्मण यांना स्वतः दिलेल्या किंवा दुसऱ्यानें दिलेल्या वृत्तीचा अपहार करितो, **सः वर्षाणां अयुतायुतं विड्भुक् जायते**—तो असंख्य वर्षें विष्ठा भक्षण करणारा कृमि होतो. ('कर्त्याला जें फल तेंच इतरांनाहि मिळतें असें आतां सांगतात—) **कर्तुःच सारथेः हेतोः अनुमोदितुः एव च**—कर्ता, त्याला साह्य करणारा, प्रेरणा करणारा व अनुमोदन देणारा, यांनाहि मरणोत्तर हेंच फल प्राप्त होतें. कारण **कर्मणां भागिनः प्रेत्य भूयसि भूयः तत्फलम्**—ते कर्मांचे भागीदार आहेत, त्यामुळें हें साह्यादि कर्म अधिक केल्यास त्याचें परलोकीं अधिक फल मिळतें. ५४–५५.

जो देवालयाच्या उत्पन्नाचा अपहार करितो व ब्राह्मणांचीं वेतनें बंद करितो, तो असंख्य वर्षें डुकराच्या जन्माला जाऊन विष्ठा भक्षण करितो. ९३ देव-ब्राह्मणांच्या वृत्तीचा अपहार करणारांस जो साह्य करितो व जो संमति देतो ते तिघेहि घोर नरकांत पडतात. ९४ उद्धवा ! ते जन्म-मरणाच्या भोंवऱ्यांत सांपडतात व तेंच फळ

मरमरोनि गा भोगिती । जाण निश्चितीं उद्धवा ।। ९५ ।। माझें प्राप्तीची चाड चित्ता । तरी नातळावी अधर्मता । अधर्मवंताची कथा । स्वभावें सर्वथा न करावी ।। ९६ ।। न देखावें दोषदर्शन । न बोलावें मर्मस्पर्शन । भूतमात्रांचा द्वेष जाण । सर्वथा आपण न करावा ।। ९७ ।। नायकावी परनिंदा । न बोलावें परापवादा । अधर्माचिया संवादा । कोणासी कदा न मिळावें ।। ९८ ।। त्रिलोकींचें पाप असकें । ज्यास घेणें असेल आवश्यकें । तें साधुनिंदा निजमुखें । यथासुखें करावी ।। ९९ ।। सकळ दुःखांचिया राशी । अवश्य याव्या मजपाशीं । ऐसी आवडी ज्याचे मानसीं । तेणें ब्रह्मद्वेषासी करावें ।। ४०० ।। सकळ काळ वृथा जावा । ऐसें आवडे ज्याचे जीवा । तेणें सारिपटादि आघवा । खेळ मांडावा अहर्निशीं ।। १ ।। मी हृदयस्थ आत्माराम । स्वतःसिद्ध परब्रह्म । तो मी व्हावया दुर्गम । अधर्म कर्म जगासी ।। २ ।। तें निर्दाळावया कर्माकर्म । वर्म आहे गा अतिसुगम । अखंड स्मरावें रामनाम । पुरुषोत्तम अच्युत ।। ३ ।। जेथें हरिनामाचा गजर । ते कर्माकर्माचे संभार । जाळूनि नुरवी भस्मसार । ऐसें नाम पवित्र हरीचें ।। ४ ।। नाम निर्दळीं पाप समस्त । हें सकळशास्त्रसंमत । जो विकल्प मानी एथ । तो जाण निश्चित वज्रपापी ।। ५ ।। वज्र पापाचे पर्वत । निर्दळी श्रीमहाभागवत । तें जनार्दनकृपा एथ । झालों प्राप्त अनायासें ।। ६ ।। ते भागवतींचा पाहतां अर्थ । हरीचें नाम अतिसमर्थ । वर्णिलेंसे परमाद्भुत । स्वमुखें अच्युत बोलिला ।। ७ ।। एथही जो विकल्प धरी । तो अतिअभाग्य संसारीं । महादुःखदोषसागरीं । विकल्पकरीं बुडाला ।। ८ ।। संकल्पविकल्पेंकरी जाण । जनांसी झालें दृढ बंधन । त्या भवबंधाचें छेदन । जनार्दननिजमान ।। ९ ।। जनार्दनाचें निजनाम । निर्दळी भवभय परम । तें नाम स्मरे जो सप्रेम । तो पुरुषोत्तम स्वयें होय ।। ४१० ।। स्वयें होणें ब्रह्म पूर्ण । ये अर्थीचें गोड निरूपण । अठ्ठाविसावे अध्यायीं जाण । उद्धवा श्रीकृष्ण सांगत ।। ११ ।। ते कथा जैं श्रवणीं पडे ।

पुनः पुनः जन्म घेऊन भोगितात. ९५ माझ्या प्राप्तीची जर आवड असेल तर मनाला अधर्माचा स्पर्शहि होऊं देऊं नये. अधर्मवानाचा सहज उच्चारहि करूं नये. ९६ कोणाचे दोष पाहूं नयेत. कोणाला मर्मभेदक शब्द बोलूं नयेत. प्राणिमात्रांचा द्वेष कदापि करूं नये. ९७ दुसऱ्याची निंदा ऐकूं नये. परक्याचे दोष बोलूं नयेत. अधर्माच्या वाद-विवादांत कधीं सामिल होऊं नये. ९८ सगळ्या त्रैलोक्याचें पातक ज्याला आपल्या माथीं घ्यावयाचें असेल त्यानें आपल्या मुखानें यथेच्छ साधुनिंदा करावी. ९९ सगळ्या दुःखाच्या राशी मजपाशीं याव्या, अशी ज्याच्या मनाला आवड असेल त्यानें अवश्य ब्राह्मणांचा द्वेष करावा. ४०० आपला सगळा काळ व्यर्थ घालवावासें ज्याला वाटत असेल त्यानें रात्रंदिवस सोंगट्यांचा डाव मांडावा. १ मी जो हृदयस्थ आत्माराम, स्वतःसिद्ध परब्रह्म, तो मी जगाला दुष्प्राप्य होण्याचें कारण हा अधर्मच आहे. २ त्या कर्म-अकर्मांचा नाश करावयाचें एक सोपें साधन आहे. पुरुषोत्तम अच्युताचें किंवा रामनामाचें अखंड स्मरण करावें. ३ जेथें हरिनामाचा गजर चालतो तेथें कर्माकर्मांच्या राशी साफ जळून जातात. त्याचें भस्महि उरत नाहीं. हरीचें नांव इतकें पवित्र आहे. ४ हरिनामानें सगळ्या पातकांचा नाश होतो, हें सर्व शास्त्रांना संमत आहे. याविषयीं जो संशय घेईल तो महापातकी समजावा. ५ त्या महापातकाच्या पर्वताचा श्रीमहाभागवत चक्काचूर करून टाकितें. जनार्दनस्वामींच्या कृपेनें तें मला प्राप्त झालें. ६ भागवताचा अर्थ पाहूं गेल्यास त्यांत हरीच्या नामाचें अतिशय अद्भुत सामर्थ्य वर्णिलें आहे. तेंच श्रीहरीनें स्वमुखानें सांगितलें आहे. ७ याविषयींहि जो विकल्प धरितो तो संसारांत अत्यंत अभागी समजावा. विकल्पामुळें तो दुःखरूपी दोषांच्या महासागरांतच बुडतो. ८ संकल्प-विकल्पामुळेंच लोकांना दृढ बंधन प्राप्त झालें आहे. त्या संसारबंधाचा छेद करण्यास जनार्दनाचें नांवच समर्थ आहे. ९ जनार्दनाचे नांव दारुण भवभय नाहींसें करितें, त्या नांवाचें जो नित्य स्मरण करितो तो स्वतःच पुरुषोत्तम रूप होतो. ४१० भक्त स्वतःच पूर्ण ब्रह्म कसा होतो, त्याचें गोड वर्णन करून श्रीकृष्ण अठ्ठाविसाव्या अध्यायांत उद्धवाला सांगणार आहे. ११ ती कथा कानीं पडली असतां जीवाला निरुपाधिक सुख होतें व

तें जीवीं स्वयंभ सुख वाढे । मग आंत बाहेर दोहींकडे । करी वाडेंकोडें समसाम्य ॥ १२ ॥ जें कथेचें गोडपण । जीव गेल्या न सोडी जाण । ऐसें रसाळ निरूपण । उद्धवासी श्रीकृष्ण सांगेल ॥ १३ ॥ श्रवणें उपजे ब्रह्मभावो । तो हा अठ्ठावीसावा अध्यावो । उद्धवासी देवाधिदेवो । निजकृपें पहा हो सांगेल ॥ १४ ॥ अक्षरें भरोनि अक्षररसीं । देव सांगेल उद्धवासी । तें निरूपण अठ्ठाविसाव्यासी । ब्रह्मसुखेंसी उलगडेल ॥ १५ ॥ ब्रह्मसुखाची सांठवण । तो हा अठ्ठाविसावा जाण । ते उघडूनियां उणखूण । उद्धवासी श्रीकृष्ण सांगेल ॥ १६ ॥ कृष्णउद्धवनिजज्ञान । एका विनवी जनार्दन । तुमचे कृपेंकरूनि पूर्ण । श्रोतां अवधान मज द्यावें ॥ १७ ॥ श्रोतां दीधल्या अवधान । ग्रंथीं उल्हासे निरूपण । एका जनार्दना शरण । शिरीं श्रीचरण वंदिले ॥ ४१८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥

अध्याय अठ्ठाविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्गुरु परमा । जय जय सद्गुरु पुरुषोत्तमा । जय जय सद्गुरु परब्रह्मा । ब्रह्म ब्रह्मनामा तुझेनी ॥ १ ॥ जय सद्गुरु चिदैक्यस्फूर्ती । जय सद्गुरु चिदात्मज्योती । जय सद्गुरु चिन्मूर्ती । मूर्तामूर्तीं चिद्रूप ॥ २ ॥ जय जय सद्गुरु सत्क्षेत्रा । जय जय सद्गुरु सत्पात्रा । जय जय सद्गुरु सन्मात्रा । सदैकाक्षरा सद्रूपा ॥ ३ ॥ जय जय सद्गुरु स्वानंदमान । जय जय

आंत बाहेर तें साम्यानें भरून रहातें. १२ ज्या कथेची गोडी जीव गेला तरी सोडवत नाहीं, असें रसाळ निरूपण श्रीकृष्ण करणार आहे. १३ त्याच्या श्रवणानें मनांत ब्रह्मभाव उद्भवतो. तो अठ्ठाविसावा अध्याय श्रीकृष्ण उद्धवाला मोठ्या कृपेनें सांगणार आहे. १४ प्रत्येक अक्षर अक्षररसानेंच भरून देव उद्धवाला सांगणार आहे. तें अठ्ठाविसाव्या अध्यायाचें निरूपण ब्रह्मसुखानें परि र्ण होईल. १५ हा अठ्ठाविसावा अध्याय ब्रह्मसुखाचा सांठाच आहे. तो उघडून त्यांतील अर्थ श्रीकृष्ण उद्धवाला सांगेल,१६ हे श्रीकृष्ण-उद्धवाचें आत्मज्ञान आहे. एकनाथ जनार्दनस्वामींना विनवीत आहे कीं, तुमच्या कृपेनें श्रोत्यांनीं मजकडे लक्ष द्यावें, १७ कारण श्रोत्यांनीं सावधान चित्तानें श्रवण केल्यास ग्रंथाच्या निरूपणांत उल्हास वाढतो. एकनाथ जनार्दनास शरण जाऊन त्याच्या चरणांना शिरसा वंदन करीत आहे. ४१८.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित

टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील क्रियायोग

नांवाचा सत्ताविसावा अध्याय समाप्त झाला.

परम सद्गुरूंना नमस्कार असो. पुरुषोत्तम, परब्रह्म सद्गुरूचा जयजयकार असो. हे गुरो ! ब्रह्माला 'ब्रह्म' हें नांव तुझ्यामुळेंच प्राप्त झालें. चिदैक्य स्फूर्तिरूप सद्गुरूचा जयजयकार असो. हें ज्ञानात्मज्योति, ज्ञानमूर्ति, मूर्त अमूर्तांतील चिद्रूप, २ सत्क्षेत्र, सत्पात्र, सन्मात्र, सदैकाक्षर, सद्रूप, स्वानंदघन, जय सद्गुरो ! तुझ्यामुळेंच आनंदाला